

# श्रीज्ञानेश्वरी
# अधयाय 13 वा

''अध्यायात अध्यायो प्रसवे '' या उक्तिला अपवाद म्हणून हा अध्याय आहे. 12 व्या अध्यायात भगवंतानी भक्तियोगाचे विवरण केले पण अध्यायाचे शेवटी ना अर्जुनाने ,ना भगवंतानी पुढे येणाऱ्या गोष्टीचे सुतोवाच केले आहे . या अध्यायाचे सुरवातीसच भगवंत क्षेत्र क्षेत्रज्ञ विवरण सुरु करतात. काही गीतेच्या प्रतीत खालील श्लोक सुरवातीला घातला आहे व तो श्लोक असला की विवेचन संगती बरोबर लागते. टिळकांनी हा श्लोक प्रक्षिप्त ठरवला आहे. तो केवळ येथे माहितीकरिता नमुद केला आहेः

**अर्जुन उवाच ः**

**प्रकृतिं पुरुषं चैव क्षेत्रं क्षेत्रज्ञमेव च ।**

**एतद्वेदितुमिच्छामि ज्ञानं ज्ञेयं च केशव ।।**

यापूर्वी क्षराक्षरविवेक, भावदर्शन, विभुतीदर्शन हे सर्व होऊन गेले आहे आणि त्याचाच पुढचा भाग म्हणून क्षेत्रक्षेत्रज्ञयोग हा आहे. यात क्षेत्र म्हणजे काय, क्षेत्रज्ञ म्हणजे कोण याचे विवेचन केले आहे म्हणून याला क्षेत्रक्षेत्रज्ञ योग असे नांव आहे.

यात 34 श्लोक असून त्यावर 1170 ओव्या आहेत. 181,246 ते 249,263,340, 481,552,721,722,888, या ओव्या व श्लोक 27 आणि 28 फारच सुंदर आहेत. श्लोक 7 व्याचे विवरण फारच सुंदर आहे.

**श्रीज्ञानेश्वरी**
**अध्याय 13 वा**

आत्मरुप गणेशु , केलिया स्मरण , । सकळ विद्यांचे अधिकरण [1] । 1 आश्रयस्थान
तेचि वंदूं श्रीचरण । श्रीगुरुंचे ।।+1।।
जयाचेनि आठवे । शब्दसृष्टी आंगवे [2] । 2 स्वाधीन होणे
सारस्वत आघवे । जिव्हेसि ये ।।+2।।
वक्तृत्वा गोडपणे । अमृताते पारुखे [3] म्हणे । 3 पलिकडे सर
रस होती वोळंगणे [4] । अक्षरासी ।।+4।। 4 सेवेकरी
भावाचे अवतरण । अवतरविती खूण ।
हाता चढे संपूर्ण । तत्त्वभेद ।।+4।।
श्रीगुरुंचे पाय । जै हृदय गिवसूनि ठाय ।
तै येवढे भाग्य होय । उन्मेखासी [5] ।।+5।। 5 ज्ञानाला
ते नमस्कारुनि आतां । जो पितामहाच पिता ।
लक्ष्मीयेचा भर्ता । ऐसे म्हणे ।।+6।।

**श्रीभगवानुवाच**
**इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधीयते ।**
**एतद्यो वेत्ति तं प्राहु ः क्षेत्रज्ञ इति तद्विद ः ।।1।।**
**श्रीभगवान म्हणाले ः हे कौन्तेया ! या शरीरासच क्षेत्र असे म्हंटले आहे. हे शरीर जो जाणितो त्यास तद्विद म्हणजे या शास्त्रातील ज्ञाते पुरुष म्हणतात.**

तरी पार्था परिसिजे । देह हे क्षेत्र म्हणिजे ।
जो हे जाणे तो बोलिजे । क्षेत्रज्ञु एथे ।।7।।

**क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत ।**
**क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम ।।2।।**
**सर्व क्षेत्रांमध्ये हे भारता ! क्षेत्रज्ञ सुद्धा मीच असे समज. क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांचे जे ज्ञान तेच माझे परमेश्वराचे ज्ञान मानिले आहे .**

तरि क्षेत्रज्ञु जो एथे । तो मीचि जाण निरुते [6] । 6 खरोखर
जो सर्व क्षेत्रांते । संगोपोनि [7] असे ।।8।। 7 पालन करतो
क्षेत्र आणि क्षेत्रज्ञाते । जाणणे जे निरुते , ।
ज्ञान ऐसे तयाते । मानू आम्ही ।।9।।

**तत्क्षेत्रं यच्च यादृक् च यद्विकारि यतश्च यत् ।**
**स च यो यत्प्रभावश्च तत्समासेन मे श्रृणु ।।3।।**
**क्षेत्र म्हणजे काय, ते कशा प्रकारचे आहे, त्याचे विकार कोणते, आणि त्यातहि कशापासून काय होते; तसेच तो म्हणजे क्षेत्रज्ञ कोण व त्याचा प्रभाव काय, हे मी संक्षेपाने सांगतो ऐक.**

तरि , क्षेत्र येणे नांवे । हे शरीर जेणे भावे ।
म्हणितले , ते आघवे । सांगो आता ।।10।।
हे क्षेत्र कां म्हणिजे ?। कैसे , के , हे उपजे ? ।
कवणकवणी वाढविजे । विकारी एथ ? ।।11।।
हे औट [1] हात मोटके , । कीं , केवढे , पां केतुके ? ।
बरड [2] कीं , पिके ? । कोणाचे हे ? ।।12।।
इत्यादि सर्व । जे , जे , याचे भाव ।
ते बोलिजती सावेव [3] । अवधान देई ।।13।।
पै , याचि स्थळाकारणे । श्रुति सदा बोबाणे [4] ।
तर्कु येणेचि ठी करणें [5] । तोंडाळु केला ।।14।।
चाळिता [6] , हेचि बोली । दर्शने शेवटा आली ।
तेवीचि , नाही बुझविली । अझुनी द्वंद्वे ।।15।।
शास्त्रांचिये सोयरिके , । विचळिजें [7] येणेचि एके ।
याचेनि एकवंके [8] । जगासि वादु ।।16।।
तोंडेसी तोंडा न पडे । बोला बोलेसी न घडे ।
इया युक्ति , बडबडे ,। त्राय जाहली [9] ।।17।।
नेणो , कोणाचे हे स्थळ ! । परि , कैसे अभिलाषाचे बळ ![10] ।
जे घरोघरी कपाळ । पिटवीत असे ।।+18।।
नास्तिका द्यावया तोंड । वेदांचे गाढे बंड ।
ते देखोनि पाखांड । आनचि वाजे ।।19।।
म्हणती, ' तुम्ही निर्मुळ [11] ,।लटिके हे वाग्जाळ ' ।
ना म्हणसी , तरी पोफळ । घातले [12] आहे ।।20।।
पाखांडाचे कडे । नागवी , लुंचिती मुंडे [13] ।
नियोजिली वितंडे । ताळासि येती [14] ।।+21।।
मृत्युबळाचेनि माजे । हे ,जाईल वीण काजे [15] ।
ते देखोनिया व्याजें [16] । निघाले योगी ।।22।।
मृत्युनी आधाधिले [17] । तिही निरंजन सेविले [18] ।
यमनियमाचे केले । मेळावे पुरे ।।23।।
येणेचि क्षेत्राभिमाने[19] ,। राज्य त्यजिले ईशाने ।
गुंति जाणोनि [20], स्मशाने । वासु केला ।।24।।

1 साडेतीन
2 ओसाड
3 सर्व
4 बडबड करते
5 व्यवस्था लावण्याचे प्रयत्नाने
6 चर्वितचर्वण करता
7 मोडणे
8 एकवाक्यता
9 गोंधळ उडाला आहे
10 अहंपणाचा मोह
11 आधार नाही
12 पैजेचा विडा मांडला आहे.
13 केस उपटून बोडके होतात
14 ताळ्यावर येतात
15 निरर्थक होईल
16 कारणाने
17 घाबरलेले 18 वनाचा आश्रय केला
19 देहरूपी क्षेत्राचा अहंकार
20 अडथळा होतो म्हणून

ऐसिया पैजा , महेशा । पांघरुणे , दाही दिशा [1]। — 1.दिगंबर होऊन
लांचकरु [2] म्हणौनि , कोळसा । कामु केला ।।25।। — 2 लाचखाऊ
पै , सत्यलोकनाथा [3] । वदने आली बळार्थी [4]। — 3 ब्रह्मदेव 4 जोर यावा म्हणून
तरि तो सर्वथा , । जाणेचिना ।।26।।

**ऋषिभिर्बहुधा गीतं छंन्दोभिर्विविधै : पृथक् ।**
**ब्रह्मसूत्रपदैश्चैव हेतुमद्धिर्विनिश्चितै : ।।4।।**

**बहुत प्रकारे, विविध छंदानी, पृथक् , पृथक् अनेक ऋषींनी आणि कार्यकारणरुप हेतु दाखवून पूर्ण निश्चित केलेल्या ब्रह्मसूत्रातील पदांनीहि हे म्हणजे हा विषय गाइला आहे.**

एक म्हणती , हे स्थळ । जीवाचेचि समूळ ।
मग प्राण हे कूळ । तयाचे एथ ।।27।।
जया प्राणाचे घरी । अंगे ,राबती भाऊ चारी , ।
आणि , मना ऐसा आवरी , । कुळवाडीकरु [5] ।।28।। — 5 शेतकरी
तयाते इंद्रियबैलाची पेटी [6] । न म्हणे , अंवसी [7] पाहाटी । — 6 मेळावा 7 संध्याकाळ
विषयक्षेत्री आटी । काढी [8] भली ।।29।। — 8 मेहनत करतात
मग , विधीची वाफ चुकवी । आणि अन्यायाचे बीज वाफवी ।
कुकर्माचा करवी । राबु [9] जरी ।।30।। — 9 मेहनत
तरी , तयाचिसारिखे । असंभड [10] पाप पिके । — 10 बेसुमार
मग , जन्मकोटी दुःखे । भोगी जीवु ।।31।।
नातरी , विधीचिये वाफे । सत्क्रिया बीज आरोपे ।
तरी , जन्मशताची मापे । सुखचि मवीजें [11] ।।32।। — 11 मोजणे
तंव , आणिक म्हणती , हे नव्हे ; । हे जीवाचेचि न म्हणावे , ।
आमुते पुसा आघवे , । क्षेत्राचे या ।।33।।
अहो ! जीवु एथ उखिता [12] । वस्तीकरु , वाटे जाता । — 12 पाहुणा
आणि , प्राणु हा बलौता [13] । म्हणौनि , जागे ।।34।। — 13 बलुतेदार
अनादि हे प्रकृती । सांख्य जियेते गाती , ।
क्षेत्र हे वृत्ती , । तियेची जाणा ।।35।।
आणि इयेतेचि आघवा । आथी [14] घरमेळावा । — 14 आहे
म्हणौनि , ते वाहिवा [15] । घरी वाहे ।।36।। — 15 लागवड
वाह्याचिये राहटी [16] । जे कां मुद्दल तिघे , इये सृष्टी , । — 16 लागवडीच्या कार्यामुळे
ते , इयेच्याचि पोटी । जहाले गुण ।।37।।
रजोगुण पेरी , ।तेतुले , सत्त्व सोकरी [17] । — 17 रक्षण करते
मग एकले तम करी । संवगणी [18] ।।38।। — 18 काढणी

रचूनि महत्तत्त्वाचे खळे , । मळी एके काळुगेनि पोळे [1] ।
तेथ अव्यक्ताची मिळे । सांज [2] भली ।।39।।
तंव , एकी मतिवंती [3] । या बोलाचिया खंती [4] ।
म्हणितले , या ज्ञप्ती [5] । अर्वाचीना [6] ।।40।।
हां,हो, परतत्त्वाआंतु [7] । के प्रकृतीची मातु [8] ? ।
हा क्षेत्र वृत्तांतु , । उगेचि आइका ।।41।।
शून्यसेजेशालिये [9] । सुलीनतेचिये [10] तुळिये [11] ।
िनिद्रा केली होती बळिये , । संकल्पे , येणे ।।42।।
तो अवसांत चेइला , । उद्दमी ,सदैव भला ।
म्हणौनि ठेवा जोडला । इच्छावशे ।।43।।
निरालंबीची [12] वाडी । होती त्रिभुवनायेवढी ।
हे तयाचिये जोडी । रुपा आली ।।44।।
मग महाभूतांचे एकवाट [13] । सैरा वेटाळूनि [14] भाट [15] ।
भूतग्रामांचे आघाट [16] । चिरिले [17] , चारी ।।45।।
यावरी , आदी । पांचभूतिकांची मांदी [18] ।
बांधली प्रभेदी [19] । पंचभूतिकी ।।46।।
कर्माकर्माचे गुंडे । बांध घातले दोहीकडे ।
नपुसके , बरडे, । राने केली ।।47।।
तेथ , येरझारेलागी । जन्ममृत्युची सुरंगी [20] ।
सुहाविली [21] निलागी [22] । संकल्पे येणे ।।48।।
मग अहंकारासि एकलाधी [23] । करुनि ,जीवितावधी ।
वहाविले [24] , बुद्धि । चराचर ।।49।।
यापरी निराळी । वाढे संकल्पाची डाहाळी ।
म्हणौनि , तो मुळी, । प्रपंचा यया ।।50।।
यापरी मतमुगुतकीं [25] । तेथ पडिघायिले [26] आणिकी ।
म्हणती , हां , हो ! विवेकी । कैसे तुम्ही ? ।।51।।
परतत्त्वाचिया गावी । संकल्पसेज देखावी , ।
तरी कां पां , न मनावी । प्रकृति तयाची ? ।।52।।
परी असो ; हे नव्हे , । तुम्ही या न लगावे , ।
आतांचि , हे आघवे । सांगिजैल ।।53।।
तरी आकाशी कवणे । केली मेघाची भरणे ? ।
अंतरिक्ष तारांगणे । धरी कवण ? ।।54।।
गगनाचा तडावा [27] । कोणे वेढिला ? केधवां ? ।
पवनु हिंडतु असावा । हे कवणाचे मत ? ।।55।।

1 काळ नांवाचा बैल
2 सृष्टी लय पावते
3 विद्वान 4 दोषाने
5 ज्ञान 6 अपूर्ण
7 परब्रह्म 8 गोष्ट
9 शय्यागृह 10 पूर्णपणे लीन होण्याची स्थिती
11 गादीवर
12 निराधार परब्रह्माची
13 एक गट 14 जमीन सारखी करणे 15 पडीत जमीन 16 हद्द 17 कायम केले
18 मूळ पंचमहाभूतांचा समुदाय
19 वेगवेगळी केली
20 भुयार
21 तयार केली 22 निराश्रय ब्रह्म
23 एकमत
24 राबवले
25 संकल्पवाद्यांची मते
26 सरसावले
27 छत

रोमां कवण पेरी ? । सिंधु कवण भरी ? ।
पर्जन्याचिया करी । धारा कवण ? ।।56।।
तैसें , क्षेत्र हे स्वभावे , । हे वृत्ती कवणाची नव्हे , ।
हे वाहे तया फावे [1] , । येरा , तुटे ।।57।।
तंव , आणिके एके । क्षोभे , म्हणितले निके [2] , ।
तरी भोगिजे एके । काळे , केवी हे ? । ।।58।।
तरी , ययाचा मारु । देखताति अनिवारु , ।
परी , स्वमती भरु , । अभिमानिया ।।59।।
हे जाणो मृत्यु रागिटा [3] । सिंहाडयाचा दरकुटा [3] ।
परी काय कीजें , वांजटा [5] । पुरिजत [6] असे ।।60।।
महाकल्पापरौती [7] । कव घालूनि अवचिती , ।
सत्यलोकभद्रजाती [8] । आंगी वाजे ।।61।।
लोकपाल नित्य नवे । दिग्गजांचे मेळावे।
स्वर्गिचिये आडवे [9] । रिगोनि मोडी ।।62।।
येर , ययाचेनि अंगवाते । जन्मृत्युचिये गर्ते ।
निर्जिवे होऊनि भ्रमते ,। जीवमृगे ।।63।।
न्याहाळी पां ! केव्हडा । पसरलासे चवडा ?।
करुन्यिां माजिवडा [10] । आकारगजु ।।64।।
म्हणौनि , काळाची सत्ता । हाचि बोलु निरुता [11] , ।
ऐसे वाद , पंडुसुता ! । क्षेत्रालागी ।।65।।
हे बहु उखिविखी [12] । ऋषी केली नैमिषी ।
पुराणे , इयेविषी । मतपत्रिका [13] ।।66।।
अनुष्टुभादि छंदे । प्रबंधी , जे विविधे ।
ते पत्रावलंबन [14] , मदे । करिती अझुनि ।।+67।।
वेदीचे बृहत्सामसूत्र । जे देखणेपणे पवित्र ।
परी तयाही हे क्षेत्र , । नेणवेचि ।।+68।।
आणीक आणिकीही बहुती । महाकवी , हेतुमंती [15] ,।
ययालागी मती । वेचिलिया ।।69।।
परी ऐसे हे एवढे , । की अमुकेयाचेचि फुडे ।
हे कोणाही वरपडे [16] । होयचिना ।।70।।
आतां , यावरी जैसे । क्षेत्र हे असे , ।
तुज सांगो तैसे । साद्यंतु गा ! ।।71।।

1 प्राप्त होते
2 छान !
3 आसक्त 4 उग्र सिंह ची दरी
5 व्यर्थ बडबड कराणाऱ्यांना 6 पुरे पडणे 7 महाकल्पाच्या पलीकडे
8 ब्रह्मलोकरुपी हत्ती
9 अरण्य
10 मध्ये
11 खरोखर
12 चर्चा
13 साक्षीभूत आधारभूत असा लेख
14 ग्रंथांचा आश्रय
15 युक्तीमान
16 स्वाधीन

**महाभूतान्यहंकारो बुद्धिरव्यक्तमेव च ।**
**इंद्रियाणि दशैकं च पञ्च चेन्द्रियगोचरा ः। ।।5।।**
**इच्छा द्वेष ः सुखं दुःखं संघातश्चेनता धृति ः ।**
**एतत्क्षेत्रं समासेन सविकारमुदाहृतम् ।।6 ।।**

**पृथिव्यादि पांच स्थूल महाभूते, अहंकार, बुद्धि (महान) आणि अव्यक्त प्रकृति , तसेच दहा सूक्ष्म इंद्रिये व एक मन; आणि पांच इंद्रियांचे पांच शब्द,स्पर्श,रुप,रस,गंध विषय ,इच्छा,द्वेष,सुख,दुःख संघात,चेतना म्हणजे प्राणादिकांचा व्यक्त व्यापार, आणि धृति म्हणजे धैर्य या 31 तत्त्वांच्या समुदायास सविकार क्षेत्र असे म्हंटले आहे.**

तरि , महाभूतपंचकु । आणि अहंकारु एकु ।
बुद्धि , अव्यक्त दशकु ।इंद्रियांचा ।।72।।
मन आणीकही एकु । विषयांचा दशकु ।
सुख , दु ःख , द्वेषु । संघात , इच्छा ।।73।।
आणि चेतना , धृती । एवं क्षेत्रव्यक्ती ।
सांगितली तुजप्रती । आघवीची ।।74।।
आतां महाभूते कवणे ? । कवण विषयो कैसी करणे ? ।
हे वेगळालेपणे । एकैक सांगो ।।75।।
तरी पृथ्वी , आप , तेज । वायु ,व्योम इये तुज ।
सांगितली बुझ [1] । महाभूते पांचे ।।76।। 1 समज
आणि जागतिये दशे , । स्वप्न लपाले असे ।
नातरी अंवसे , । चंद्र गुढु ।।77।।
नाना , अप्रौढबाळकीं , । तारुण्य राहे थोकीं [2] । 2 गुप्त
कां , न फुलता कळीकीं , । अमोदु जैसा ।।79।।
किंबहुना , काष्टी । वन्ही जेवी किरीटी ! ।
तेवी , प्रकृतीचिया पोटी । गोप्यु जो असे ।।79।।
जैसा , ज्वरु धातुगतु [3] , । अपथ्याचे मिष पहातु । 3 हाडीज्वर
मग जालिया , आंतु-। बाहेरी व्यापी ।।80।।
तैसी , पांचाही गांठी पडे , । जै देहाकरु उघडे [4]। 4 आकार घेतो
तै , नाचवी चहूकडे , । तो अहंकारु गा ! ।।81।।
नवल अहंकाराची गोठी ! । विशेषे न लगे अज्ञाना पाठी ।
सज्ञानाचे झोंबे कंठी । नाना संकटी नाचवी ।।82।।
आतां , बुद्धि जे म्हणिजे , । ते ऐशिया चिन्ही जाणिजे , ।
बोलिले यदुराजे । ते आइके , सांगो ।।83।।
तरी कंदर्पाचेनि [5] बळे । इंद्रियवृत्तीचेनि मेळे । 5 काम
विभांडूनि [6] येती पाळे [7] । विषयांचे ।।84।। 6 युद्धात जिंकून 7 समुदाय
तो सुखदःखांचा नागोवा [8] । जेथ उगाणो [9] लागे जीवा । 8 लुट 9 अर्पण करतात
तेथ दोहीसी , बरवा । पाडु [10] , जें धरी ।।85।। 10 योग्य तुलना करून

हे सुख , हे दुःख , ।हे पुण्य , हे दोष , ।
कां , हे मैळ , हे चोख ।ऐसे जे निवडी ।।86।।
जिये अधमोत्तम सुझे [1] । जिये साने थोर बुझे [1] । 1 समजते
जिया दिठी , पारखिजे । विषो , जीवे ।।87।।
जे तेजतत्त्वाची आदी [2] । जे सत्त्वगुणाची वृध्दी [3] । 2 ज्ञानाचे मूळ 3 वाढ
जे , आत्मया , जीवाची , संधी । वसवीत असे जे ।।88।।
अर्जुना ! ते गा जाण । बुद्धि तूं संपूर्ण ।
आतां आइके वोळखण । अव्यक्ताची ।।89।।
पै , सांख्यांचिया सिद्धांती । प्रकृती जे महामती ! ।
तेचि एथे प्रस्तुती । अव्यक्त गा ।।90।।
आणि सांख्ययोगमते । प्रकृती परिसविली तूते ।
ऐसी दोही परी जेथे । विंवंचिली ।।91।।
तेथ दुजी [4] जे जीवदशा । तिये नांव वीरेशा ! । 4 दुसरी (अ.7,ओ.19
येथे अव्यक्त ऐसा । पर्यावो [5] हा ।।92।। पराप्रकृती) 5 पर्याय
तऱ्ही पाहालया रजनी [6] , ।तारा लोपती गगनी । 6 रात्र उजाडल्यावर
कां , हारपे अस्तमानी । भूतक्रिया ।।93।।
नातरी , देहो गेलिया पाठी । देहादिक , किरीटी ! ।
उपाधि [7] , लपे पोटी । कृतकर्माच्या ।।94।। 7 देहादि प्रपंच
कां , बीजमुद्रेआंतु । थोके [8] तरु समस्तु । 8 असतो
कां , वस्त्रपणे तंतु-। दशे राहे ।।95।।
तैसें , सांडूनियां स्थूळधर्म । महाभूते भूतग्राम ।
लया जाती सूक्ष्म । होऊनि जेथे ।।96।।
अर्जुना ! तया नांवे । अव्यक्त हे जाणावे ।
आतां आइके आघवे । इंद्रियभेद ।।97।।
तरी श्रवण , नयन , । त्वचा , घ्राण , रसन ।
इये जाणे ज्ञान-। करणे पांचे ।।98।।
इये तत्त्वमेळापंकी , । सुखदुःखाची उखिविखी [9] । 9 चर्चा
बुद्धि करिते , मुखीं । पांचे इही [10] ।।99।। 10 या पांच इंद्रियाद्वारा
मग वाचा आणि कर । चरण आणि अधोद्वार ।
पायु हे प्रकार । पांच आणिक ।।100।।
कर्मेंद्रिय म्हणिपती । ती इये जाणिजती ।
आइके कैवल्यपती । सांगतसे ।।101।।
पै , प्राणाची अंतौरी [11] , । क्रियाशक्ति जे शरीरी । 11 प्राणाची प्रिय सखी
तियेची रिगिनिगी [12] द्वारी । पांचे इही ।।102।। 12 ये जा

एवं दाहाही करणे । सांगितली देवो म्हणे ।
परिस आतां फुडेपणे [1] । मन ते ऐसे ।।103।। 1 निश्‍चयाने
जे , इंद्रियां आणि बुद्धि । माझारिलिये , संधी , ।
रजोगुणाच्या खांदी । तरळत [2] असे ।।104।। 2 चंचळपणे भासणे
नीळिमा अंबरी । कां , मृगतृष्णालहरी ।
तैसे वायांचि फरारी [3] । वावो जाहले[4] ।।105।। 3 भास 4 व्यर्थ झाले
आणि शुक्रशोणिताचा [5] सांधा । मिळता पांचांचा बांधा [6] । 5 स्त्रीपुरुष बीज 6 आकार
वायुतत्त्व दशधा [6] । एकचि जाहले ।।106।। 6 पंच प्राण आणि पाच उपप्राण
मग तिही दाहे भागी । देहधर्माच्या खैवंगी [7] । 7 बळ
अधिष्ठिले आंगी । आपुलाल्या ।।107।।
तेथ चांचल्य निखळ । एकले ठेले निढाळ [8] । 8 केवळ
म्हणौनि , रजाचे बळ । धरिले तेणे ।।108।।
ते , बुद्धीसि बाहेरी , । अहंकाराच्या उरावरी , ।
ऐसा ठायी माझारी । बळियावले ।।109।।
वायां , मन हे नांव । एऱ्हवी , कल्पनाचि सावेव ।
जयाचेनि संगे जीव-। दशा वस्तु ।।110।।
जे प्रवृत्ततीसि मूळ । कामा जयाचे बळ ।
जे , अखंड सूये [9] छळ । अहंकारासी ।।111।। 9 घालते
जे इच्छेते वाढवी , । आशेते चढवी , ।
जे पाठी पुरवी । भयासि गा ! ।।112।।
द्वैत जेथे उठी । अविद्या जेणे लाठी [10] । 10 बळकट
जे इंद्रियाते लोटी । विषयामाजी ।।113।।
संकल्पे , सृष्टी घडी । सवेचि , विकल्पूनि मोडी ।
मनोरथांच्या उतरडी । उतरी , रची ।।114।।
जे भुलीचे कुहर [11] । वायुतत्त्वाचे अंतर [12] । 11 कोठार 12 सार
बुद्धीचे द्वार । झांकविले जेणे ।।115।।
ते गा किरीटी ! मन , । या बोला नाही आन ।
आतां , विषयभिधान-[13] । भेदू आइके ।।116।। 13 विषयांचे प्रकार
तरी स्पर्शु आणि शब्दु । रुप ,रसु , गंधु ।
हा विषयो पंचविधु । ज्ञानेंद्रियांचा ।।117।।
इही पांचै द्वारी । ज्ञानासि धांव बाहेरी ।
जैसा कां , हिरवे चारी । भांबावे , पशु ।।118।।
मग स्वर ,वर्ण , विसर्गु [14] ।अथवा स्वीकार ,त्यागु । 14 स्वर ,व्यंजन व विसर्ग यांचा
संक्रमण , उत्सर्गु । विण्मूत्राचा [15]।।119।। उच्चार करणे 15 मलोत्सर्जन

| | |
|---|---|
| हे कर्मेंद्रियांचे पांच । विषय गा साच । | |
| जे बांधोनियां मांच [1] । क्रिया धांवे ।।120।। | 1 मांडव |
| ऐसे हे दाही । विषय गा इये देही । | |
| आतां इच्छा तेही । सांगिजैल ।।121।। | |
| तरि भूतले [2] आठवे । कां बोले कान झांकावे [3] । | 2 मागील 3 टवकारतात |
| ऐसियावरि चेतवे [4] । जे गा वृत्ती ।।122।। | 4 प्रक्षुब्ध होते |
| इंद्रियाविषयांचिये भेटी-। सरसीच जे गा उठी । | |
| कामाची बाहुटी [5] । धरुनियां ।।123।। | 5 खांदा |
| जियेचेनि उठिलेपणे । मना सैंध [6] धांवणे । | 6 सैरावैरा |
| न रिगावे तेथ करणे । तोंडे सुती [7] ।।124।। | 7 घालते |
| जिये वृत्तीचिया आवडी । बुद्धी होय वेडी । | |
| विषयां जिया गोडी । ते गा ! इच्छा ।।125।। | |
| आणि इच्छिलिया सांगडे [8] । इंद्रिया आमिष न जोडे [9] ,। | 8 सारखे 9 मिळाले नाही |
| तेथ , जोडे ऐसा जो डावो पडे [10] ,। तोचि द्वेषु ।।126।। | 10 स्थिती घडुन येणे |
| आतां , यावरी सुख ।ते एवंविध देख । | |
| जेणे एकेचि अशेख । विसरे जीवु ।।127।। | |
| मना , वाचे , काये , । जे आपुली आण वाये , । | |
| देहस्मृतीची त्राये [11] । मोडित , जे ये ।।128।। | 11 बळ |
| जयाचेनि जालेपणे । पांगुळा होइजे प्राणे । | |
| सात्त्विकासी दुणे-। वरीही , लाभु ।।129।। | |
| कां , आघवियाचि इंद्रयवृत्ती । हृदयाचिया एकांती । | |
| थापटूनि , सुषुप्ती [12] । आणि जे गा ! ।।130।। | 12 गाढ निद्रा |
| किंबहुना , सोये [13] । जीव अत्मयाची , लाहे [14] । | 13 जीव व आत्मा यांच्या संयोगाने |
| तेथ जे होये । तया नाम सुख ।।131।। | प्राप्त होणारे सुख 14 प्राप्त होते |
| आणि ऐसी हे अवस्था । न जोडता पार्था !। | |
| जे जीजें [14] , तेचि सर्वथा । दुःख जाणे ।।132।। | 14 जगणे |
| ते मनोरथसंगे नव्हे , । एऱ्हवी सिद्धि गेलेचि आहे , । | |
| हे दोनीचि उपाये , । सुखदुःखासी ।।+133।। | |
| आतां, असंगा , साक्षिभूता । देही , चैतन्याची जे सत्ता । | |
| तिये नाम पंडुसुता ! । चेतना येथे ।।134।। | |
| जे नखौनि केशवरी । उभी जागे शरीरी । | |
| जे तिही अवस्थांतरी । पालटेना ।।135।। | |
| मनबुद्ध्यादि आघवी । जियेचेनि टवटवी । | |
| प्रकृतिवनमाधवी[15] । सदांचि जे ।।136।। | 15 प्रकृतीरुपी वनाला टवटवी आणणारा वसंत |

जडाजडी अंशी । राहाटे जे सरिसी ।
ते चेतना गा ! तुजसी । लटिके नाही ।।137।।
पै , रावो परिवारु नेणे[1] ,। आज्ञाचि परचक्र जिणे । 1 आपल्या सैनिकांबरोबर जात नाही
कां , चंद्राचेनि पूर्णपणे । सिंधु भरती ।।138।।
नाना , भ्रामकाचे [2] सन्निधान । लोहो करी सचेतन । 2 चुंबक
कां , सूर्यसंगु जन । चेष्टवी [3] गा ! ।।139।। 3 व्यवहार करितात
अगा ! मुख मेळेवीण । पिलियाचे पोषण ,।
करी , नीरीक्षण [4] । कूर्मी जेवी ।।140।। 4 केवळ पाहून
पार्था ! तियापरी । आत्मसंगती , इये शरीरी , ।
सजीवत्वाचा करी । उपेगु जडा [5] ।।141।। 5 जड शरीराला
मग तियेते चेतना । म्हणिपे पै , अर्जुना ! ।
आतां , धृतिविवंचना-। भेदु आइक ।।142।।
तरी , भूतां परस्परे । उघड , जाति स्वभाववैरे [6] । 6 जन्मजात स्वाभाविक वैर
नव्हे , पृथ्वीते नीरे । न नाशिजे ? ।।143।।
नीराते आटी तेज , । तेजा वायूसि झुंज , ।
आणि गगन तंव सहज । वायू भक्षी ।।144।।
तेवीचि , कोणेही वेळे , । आपण कायिसयाही न मिळे , ।
आंतु रिगोनि , वेगळे । आकाश हे ।।145।।
ऐसी पांचही भूते । न साहती एकमेकाते ।
कीं , तियेही ऐक्याते । देहासी येती ।।146।।
द्वंद्वाची [7] उखिविखी [8] । सोडूनि , वसती एकी , । 7 वेगळेपणा 8 चर्चा
एकेकाते पोखी [9] । निजगुणे गा ! ।।147।। 9 परस्परास पोसते
ऐसे न मिळे , तया साजणे [10] । चळे धैर्ये जेणे [11] । 10 मैत्री 11 ज्या धैर्याने घडते
तयां नांव म्हणे ।' धृती ' मी गा ! ।।148।।
आणि जीवेसी पांडवा ! । या छत्तिसांचा मेळावा ।
तो हा एथ जाणावा । संघातु , पै , गा ! ।।149।।
एवं , छत्तीसही भेद । सांगितले तुज विशद ।
यया येतुलेयाते प्रसिद्ध । क्षेत्र म्हणिजे ।।150।।
रथांगांचा मेळावा , । जेवी रथु म्हणिजे , पांडवा ! ।
कां , अधोर्ध्व अवेवां , । नांव देहो ।।151।।
करीतुरंगसमाजे , । सेना नाम निफजे ।
कां , वाक्ये म्हणिपती , पुंजे । अक्षरांचे ।।152।।
कां , जळधरांचा मेळा । वाच्य होय आभाळा ।
नाना , लोकां सकळां , ।नाम जग ।।153।।

कां , स्नेहसूत्रवन्ही । मेळु एकिचि स्थानी ।
धरिजें , तो जनी । दीपु होय ।। 154।।
तैसी , छत्तीसही इये तत्त्वे । मिळती जेणे एकत्वे , ।
तेणे समूह , परत्वे [1] । क्षेत्र म्हणिपे ।।155।।
आणि वाहतेनि भोतिके [2] । पाप , पुण्य येथे पिके , ।
म्हणौनि , आम्ही कौतुके । क्षेत्र म्हणो ।।156।।
आणि एकाचेनि मते , । देह म्हणती ययाते ।
परि असो हें ; अनंते । नामे यया ।।157।।
पै , परतत्त्वाआरौते [3] । स्थवराआंतौते [4] ।
जे काही होते , जाते । क्षेत्रचि हे ।।158।।
परि सुर , नर , ऊरगी [5] ,। घडत आहे योनिविभागी ।
ते गुणकर्मसंगी । पडिले साते [6] ।।159।।
हेचि गुणविवंचना । पुढा म्हणिपैल [7] अर्जुना ! ।
प्रस्तुत आंता , तुज ज्ञाना । रूप दावूं ।।160।।
क्षेत्र तंव सविस्तर । सांगितले सविकार ।
म्हणौनि , आता उदार । ज्ञान आइके ।।161।।
जया ज्ञाना लागी , । गगन गिळिताती योगी ।
स्वर्गाची आडवंगी [8] । उमरोडोनि [9] ।।162।।
न करिती सिद्धीची चाड , । न धरिती ऋद्धीची भीड , ।
योगा ऐसे दुवाड [10] । हेळसिती [11] ।।163।।
तपोदुर्गे वोलांडित , । क्रतुकोटी वोवांडित [12] ।
उलथूनि सांडित । कर्मवल्ली ।।164।।
नाना , भजनमार्गी । धावत उघडिया आंगी ।
एक रिगताती सुरंगी [13] । सुषुम्नेचिये [14] ।।165।।
ऐसी , जिये ज्ञानी । मुनीश्वरांची उतान्ही [15] , ।
वेदतरुच्या पानोवानी । हिंडताती ।।166।।
देईल गुरसेवा । इया बुद्धि , पांडवा ! ।
जन्मशतांचा सांडोवा [16] । टाकित जे ।।167।।
जया ज्ञानाची रिगवणी [17] । अविद्ये उणे आणी ।
जीवा आत्मया बुझावणी [18] । मांडूनि दे ।।168।।
जे इंद्रियांची द्वारे आडी । प्रवृत्तीचे पाय मोडी ।
जे दैन्यचि फेडी । मानसाचे ।।169।।
द्वैताचा दुकाळु [19] पाहे । साम्याचे सुयाणे [20] होये।
जया ज्ञानाची सोये [21]। ऐसे करी ।।170।।

1 अलंकारीक दृष्टिने
2 पंचमहाभूतांच्या राबणूकींमुळे
3 परब्रह्माअलिकडे
4 स्थावर,जडा पर्यंत
5 साप
6 पडतात
7 पुढे सांगितली जाईल
8 अडथळा 9 ओलांडुन
10 कठीण 11 तुच्छ मानतात
12 कोट्यावधी यज्ञ ओवाळून टाकींत
13 बोगदा 14 इडा व पिंगळा या दोन नाड्यामधली नाडी
15 इच्छा
16 ओवाळून टाकतात
17 प्रवेश
18 एकवाक्यता
19 दुष्काळ 20 सुकाळ
21 प्राप्ती

मदाचा ठावोचि पुसी , । जे ,महामोहाते ग्रासी , ।
नेदी , आपपरु ऐसी , । भाष उरो ।।171।।
जे संसाराते ऊन्मूळी । संकल्पपंकु [1] पाखाळी [2] । — 1 वासनारुपी चिखल 2 धुते
अनावराते वेटाळी [3] । ज्ञेयाते जे ।।172।। — 3 व्यापते
जयाचेनि जालेपणे , । पांगुळा होइजे प्राणे ।
जयाचेनि विंदाणे [4] । जग हे चेष्टे ।।173।। — 4 कौशल्याने
जयाचेनि उजाळे , । उघडती बुद्धीचे डोळे ।
जीवु दोंदावरी [5] लोळे , । आनंदाचिया ।।174।। — 5 राशीवर
ऐसे जे ज्ञान । पवित्रैकनिधान ।
जेथ विटाळले मन । चोख कीजे ।।175।।
आत्मया जीवबुद्धी , । जे लागली होती क्षयव्याधी ।
ते जयाचिये सन्निधी । निरुजा [6] कीजे ।।176।। — 6 निरोगी
ते अनिरुप्य, की निरुपिजे , । ऐकता , बुद्धी आणिजे [7] । — 7 ऐकून बुद्धिनेच जाणावे
वाचूनि [8] , डोळा देखिजे । ऐसे नाही ।।177।। — 8 बुद्धि शिवाय
मग तेचि इये शरीरी । जै , आपुला प्रभावो करी ।
तै , इंद्रियांचिया व्यापारी [9] , । डोळाहि दिसे ।।178।। — 9 कार्याने
पै , वसंताचे रिगवणे [10] । झाडांचेनि साजेपणे [11] । — 10 प्रवेशाने 11 टवटवीतपणा
जाणिजे , तेवी करणें [12] , । सांगती ज्ञान ।।179।। — 12 इंद्रिये
अगा ! वृक्षासि पाताळी । जळ सांपडे मुळी , ।
ते , शाखांचिये बाहाळी [13] । बाहेर दिसे ।।180।। — 13 विस्तारातून
**कां , भूमीचे मार्दव । सांगे कोंभाची लवलव ।**
**नाना , आचारगौरव । सुकुलीनाचे ।।181।।**
अथवा,संभ्रमाचिया आयती [14],। स्नेहो ,जैसा ये व्यक्ती । — 14 आदरातिथ्याची तयारी
का , दर्शनाचिये प्रशस्ती [15] । पुण्यपुरुष ।।182।। — 15 समाधान
नातरी,केळी कापूर जाहला,। जेवी , परिमळे जाणो आला ।
कीं , भिंगारी [16] दीपु ठेविला,। बाहेरि फाके ।।183।। — 16 काचेच्या कंदीलात
तैसें , हृदयीचेनि ज्ञाने , । जिये , देही उमटती चिन्हे , ।
तिये सांगो आतां , अवधाने । चांगे आइक ।।184।।

**अमानित्वमदंभित्वमहिंसा क्षांतिरार्जवम् ।**
**आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रह ः ।।7 ।।**

**मान नसणे,दंभ नसणे, अहिंसा ,क्षमा, सरळपणा, गुरुसेवा, शुचिर्भूतपणा, स्थैर्य, मनोनिग्रह**

तरी कवणेही विषयीचे । साम्य [17] होणे न रुचे । — 17विषयांत समरस होणे
संभावितपणाचे [18] । वोझे जया ।।185।। — 18 प्रतिष्ठितपणाचे

आथिलेचि गुण वानिता , । मान्यपणे  मानितां , ।
योग्यतेचे येतां । रुप आंगा ।।186।।
तै , गजबजो लागे , कैसा ! । व्याधे रुंधला ,[1] मृगु जैसा ।     1 वेढला
कां , बाही तरतां , वळसा । दाटला[2] , जेवी ।।187।।     2 भोवऱ्यात अडकला
पार्था ! तेणे पाडे , । सन्माने जो सांकडे , ।
गरिमेते [3] आंगाकडे । येवोचि नेदी ।।188।।     3 मोठेपणा
पूज्यता डोळा न देखावी , । स्वकीर्ती कानी नायकावी , ।
हा अमुका , ऐसी नोहावी । सेचि [4] लोका ।।189।।     4 आठवण
तेथ सत्काराची के गोठी ! । के आदरा देईल भेटी ! ।
मरणेसी साटी [5] । नमस्कारिता ।।190।।     5 मरणासारखे वाटते
वाचस्पतीचेनि पाडे । सर्वज्ञता तरी जोडे ।
परि वेडिवेमाजी दडे । महिमे  [6]  भेणे ।।191।।     6 मोठेपणा
चातुर्य लपवी , । महत्त्व हारवी , ।
पिसेपण मिरवी । आवडोनि ।।192।।
लौकिकाचा उद्वेगु । शास्त्रावरी उबगु [7] ।     7 कंटाळा
उगेपणी , चांगु। आथी भरु  [8]  ।।193।।     8 चांगला जोर
जगे अवज्ञाचि करावी , । संबंधी सोयचि न धरावी , ।
ऐसी , ऐसी जीवी । चाड बहु ।।194।।
तळौटेपण [9] बाणे । आंगी हिणावो खेवणे [10] ।     9 नम्रता 10 भूषण
ते , तेचि करणे । बहुतकरूनी ।।195।।
हा जीतु , ना नोहे ! । लोक कल्पी येणे भावे ,।
तैसें , जिणे होआवे । ऐसी आशा ।।196।।
पै , चालतु कां नोहे ! । की वारेंनि जातु आहे ! ।
जना ऐसा भ्रमु जाये । तैसे होईजे ।।197।।
माझे असतेपण लोपो , । नामरुप हारपो , ।
मज झणे वासिपो [11] । भूतजात ।।198।।     11 कदाचित भीतील
ऐसी जयाची नवसिये [12] । जो नित्य एकांता जातु जाये ।     12 नवस
नामेचि जो जिये । विजनाचेनि [13] ।।199।।     13 एकांत
वायु आणि तया पडे [14] । गगनेसी बोलो आवडे ।     14 पटते
जीवे प्राणे , झाडे । पढियंती जया ।।200।।
किंबहुना , ऐसी । चिन्हे जया देखसी , ।
जाण , तया ज्ञानेसी । शेज जाहली ।।201।।
पै , अमानित्व पुरुषी , । ते जाणावे इही मिषी ।
आतां , अदंभाचिया वोळखीसी । सौरसु [15] देवो ।।202।।     15 अभिप्राय

| | |
|---|---|
| तरी अदंभित्व [1] ऐसे । लोभियाचे मन जैसे । | 1 ढोंगीपणाचा अभाव |
| जीवु जावो , परी नुमसे [2] । ठेविला ठावो ।।203।। | 2 सांगत नाही |
| तयापरी किरीटी ! । पडिलाही प्राणसंकटी । | |
| तरी सकृत न प्रकटी । आंगे बोले [3] ।।204।। | 3 स्वतः हुन |
| खडाणे [4] आला पान्हा , । पळवी , जेवी अर्जुना ! । | 4 अल्पदुधी |
| कां , लपवी , पण्यांगना[5] , । वडिलपण ।।205।। | 5 वैश्या |
| आढ्यु आतुडे आडवी [6] । मग आढ्यता जेवी हारवी । | 6 श्रीमंत रानात अडकला |
| नातरी , कुळवधू लपवी । अवेवांते ।।206।। | असता |
| नाना , कृषीवळु , आपुले । पांघुरवी पेरिले , । | |
| तैसें , झाकी निपजले । दानपुण्य ।।207।। | |
| वरिवरी देहो न पूजी , । लोकांते न रंजी [7] । | 7 रमणे |
| स्वधर्मु वाग्ध्वजी । बांधो नेणे ।।208।। | |
| परोपकारु न बोले । न मिरवी अभ्यासिले । | |
| न शके विकूं जोडले । स्फीतीसाठी [8] ।।209।। | 8 कीर्तीसाठी |
| शरीर भोगाकडे । पाहतां , कृपणु आवडे । | |
| एऱ्हवी , धर्मविषयी, थोडे,। बहु, न म्हणे ।।210।। | |
| घरी दिसे सांकड [9] । देहीची आयती [10] रोड । | 9 कठीण स्थिती 10 आकृती |
| परी दानी जया होड [11] । सुरतरुसी [12] ।।211।। | 11 पैज 12 कल्पवृक्ष |
| किंबहुना , स्वधर्मी थोरु , । अवसरी उदारु , । | |
| आत्मचर्चे चतुरु , । एऱ्हवी वेडा ।।212।। | |
| केळीचे दळवाडे [13] । हळु [14] पोकळ आवडे । | 13 अंग 14 हलके |
| परी , फळोनिया गाढे । रसाळ जैसे ।।213।। | |
| कां , मेघांचे आंग झील [15] । दिसे ,वारेनि जैसे जाईल । | 15 हलके |
| परी वर्षती , नवल ,। घनवट ते ।।214।। | |
| तैसा , जो पूर्णपणी । पाहतां , धाती आयणी [16] । | 16 ब्रह्मदेवाइतके चातुर्य |
| एऱ्हवी , तरी वाणी [17] । तोचि ठावो ।।215।। | 17 कमतरता |
| हे असो , या चिन्हांचा । नटनाचु [18] ठायी जयाच्या , । | 18 उत्कर्ष |
| जाण , ज्ञान तयाच्या । हाता चढे ।।216।। | |
| पै गा ! अदंभपण । म्हणितले , ते हे जाण । | |
| आता आईक खूण । अहिंसेची ।।217।। | |
| तरि , अहिंसा बहुती परी । बोलिली असे , अवधारी । | |
| आपुलालिया मतांतरी । निरुपिली ।। 218।। | |
| परी , ते ऐसी देखा , । जैशा , खांडुनिया शाखा । | |
| मग , तयाचिया बुडखा [19] । कूंप कीजे ।।219।। | 19 बुंधा |

| | |
|---|---|
| कां , बाहू तोडोनि पचविजे , । मग भुकेची पीडा राखिजे , । | |
| नाना , देऊळ मोडोनि कीजे । पौळी [1] , देवा ।।220।। | 1 कोट |
| तैसी , हिंसाचि करूनि , अहिंसा ।निफजविजे [2] , हा ऐसा । | 2 उत्पन्न करणे |
| पै , ' पूर्वमीमांसा ' , । निर्णो [3] केला ।।221।। | 3 निर्णय केला |
| जें , अवृष्टीचेनि उपद्रवे , । गादले [4] विश्व आघवे । | 4 त्रासले |
| म्हणौनि , पर्जन्येष्टी करावे । नाना याग ।। 222।। | |
| तंव , तिये इष्टीचिया बुडी । पशुहिंसा रोकडी । | |
| मग , अहिंसेची थडी [5] , । कैची दिसे ? ।।223।। | 5 तीर |
| पेरिजे नुसधी हिंसा , । तेथ उगवैल काय अहिंसा ? । | |
| परी नवला बापा ! धिवसा [6] । या याज्ञिकांचा ! ।।224।। | 6 धाडस |
| आणि आयुर्वेदु आघवा । तो याच मोहोरा [7] पांडवा । | 7 मार्ग |
| जें , जीवाकारणे करावा । जीवघातु ।।225।। | |
| नानारोगे आहाळली [8] । लोळती भूते देखिली , । | 8 पोळलेली |
| ते हिंसा निवारावया , केली । चिकित्सा कां ! ।।226।। | |
| तंव , ते चिकित्से पहिले , । एकाचे कंद खणविले । | |
| एका , उपडविले । समूळी , सपत्री ।।227।। | |
| एके आड मोडविली [9] । अजंगमाची [10] खाल काढविली । | 9 मध्येच मोडली 10 झाडांची |
| एके गर्भिणी उकडविली । पुटामाजी ।।228।। | |
| अजातशत्रु तरुवरां , । सर्वांगी देवविल्या शिरा । | |
| एसे जीव घेऊनि , धनुर्धरा ! । कोरडे केले ।।229।। | |
| आणि जंगमाही [11] हात । लाऊनि , काढिले पित्त । | 11 सचेतन |
| मग राखिले , शिणत । आणिक जीव ।।230।। | |
| अहो ! वसती धवळारे [12] । मोडूनि केली देव्हारे ! । | 12 घरे |
| नागवूनि वेव्हारे [13] । गवांदी [14] घातली ।।231।। | 13 सावकारीत लुटून 14 अन्नछत्र |
| मस्तक पांघुरविले , ।तंव , तळवटी उघडे पडले । | |
| घर मोडोनि केले । मांडव पुढे ।।232।। | |
| नाना , पांघुरणे । जाळूनि , जैसे तापणे , । | |
| कां , जाले आंगधुणे । कुंजराचे [15] ।।233।। | 15 हत्ती |
| नातरी,बैल विकूनि गोठा । पुंसा लावोनि [16] बांधिजे गांठा [17] । | 16 पोपट हाकलुन 17 पिंजरा |
| इया करणी , की चेष्टा । काई ! हसो ! ।।324।। | |
| एका , धर्माचिया वाहणी [18] । गाळू आदरिले [19] पाणी । | 18 धर्माज्ञेने 19 सुरवात केली |
| तंव गाळितया आहाळणी [20] । जीव मेले ।।235।। | 20 पीडेने |
| एक , न पचवितीचि [21] कण । इये हिंसेचे भेण [22] , । | 21 शिजवणे 22 घाबरले |
| तेथ कदर्थले [23] प्राण , । तेचि हिंसा ।।236।। | 23 कासावीस झाले |

एवं , हिंसाचि , अहिंसा , । कर्मकांडी , हा ऐसा ।
सिद्धांतु , सुमनसा । वोळखे तूं ।।237।।
पहिले अहिंसेचे नांव । आम्ही केले जंव , ।
तंव , स्फुर्ती बांधली हांव [1] । इये मती ।।238।। 1 इच्छा
तरी कैसेनि इयेते गाळावे [2] ? । म्हणौनि पडिले बोलावे । 2 कां विवेचन करणें सोडावे
तेवीचि , तुवाही जाणावे , । ऐसा भावो ।।239।।
बहुतकरुनि , किरीटी ! । हाचि विषो इये गोठी ।
एऱ्हवी , कां आडवाटी । धाविजैल गा ? ।।240।।
आणि स्वमताचिया निर्धारा- । लागोनिया , धनुर्धरा ! ।
प्राप्ता मतांतरा । निर्वेचु कीजे ।।241।।
ऐसी हे अवधारी , । निरुपिति परी [3] , । 3 विवेचन करण्याची रीत
आतां ययावरी ।मुख्य जे गा ! ।।242।।
ते स्वमत , बोलिजैल , । अहिंसे रूप किजैल ।
जिया उठलिया , आतूल । ज्ञान दिसे ।।243।।
परी ते अधिष्ठिलेनि [4] आंगे , । जाणिजे आचरतेनि बगे [5] । 4 आचरणात आणणे 5 रीत
जैसी , कसवटी [6] सांगे । वानियाते [7] ।। 244।। 6 कसाच दगड 7 कमीपणा
तैसें , ज्ञानामनाचिये भेटी , । सरिसेचि अहिंसेचे बिंब उठी ।
तेचि ऐसे किरीटी ! । परिस आता ।।245।।
**तरी तरंगु नोलांडितु , । लहरी , पाये न फोडितु , ।**
**सांचलु [8] न मोडतु । पाणियाचा , ।।246।।** 8संथपणा
**वेगे आणि लेसा [9] । दिठी घालूनि आंविसा [10] ।** 9 जपून 10 आमिष
**जळी बकु जैसा । पाउल सुये , ।।247।।**
**कां , कमळावरी भ्रमर । पाय ठेविती हळुवार , ।**
**कुचुंबैल [11] केसर , । इया शंका , ।।248।।** 11 चुरडतील
**तैसे परमाणु पां ! गुंतले । जाणूनि , जीव सानुले , ।**
**तेथ , कारुण्यामाजी पाउले । लपवूनि चाले ।।249।।**
ते वाट कृपेची करितु , । ते दिशाचि स्नेहभरितु , ।
जीवातळी आंथरितु । आपुला जीवु ।।250।।
ऐसिया जतना । चालणे , जया अर्जुना ! ।
हे अनिर्वाच्य , परिमाणा [12] । पुरिजेना ।।251।। 12 मोजणे
पै , मोहाचेनि सांगडे [13] । लासी [14] पिली धरी तोंडे , । 13 भराने 14 मांजर
तेथ दातांचे आगरडे [15] । लागती जैसे , ।।252 ।। 15 टोक
कां , स्नेहाळु माये । तान्हयाची वास [16] पाहे । 16 वाट
तिये दिठी आहे , । हळुवार जे ।।253।।

| | |
|---|---|
| नाना , कमळदळे । डोलविजती [1] ढाळे [2] । | 1 हलवितात 2 हळुहळु |
| तो जेणे पाडे , बुबुळे । वारा घेपे ।।254।। | |
| तैसेनि मार्दवे पाय । भूमीवरी न्यसीतु [3] जाय । | 3 ठेवत |
| लागती , तेथ होय । जीवां , सुख ।।255।। | |
| ऐसिया लघिमा [4] चालता , । कृमि, कीटक , पंडुसुता ! । | 4 हळुवारपणे |
| देखे , तरी माघौता । हळुचि निघे ।।256।। | |
| म्हणे , पावो धडफडील । तरी स्वामीची निद्रा मोडैल । | |
| रचलेपणा पडैल । झोती , हन ।।257।। | |
| इया काकुळती । वाहणी [5] घे माघौती । | 5 मार्ग |
| कोणेही व्यक्ती । न वचे [6] वरी ।।258।। | 6 टाकून जाणे |
| जीवाचेनि नांवे , । तृणातेही नोलांडवे , । | |
| मग , न लेखितां जावे । हे के गोठी ! ।।259।। | |
| मुंगिये मेरु नोलांडवे , । मशका सिंधु न तरवे , । | |
| तैसें , भेटलिया न करवे । अतिक्रमु ।।260 ।। | |
| ऐसी जयाची चाली , । कृपाफळी फळा आली । | |
| देखसी जियाली । दया वाचे[7] ।।261।। | 7 वाणीत मुर्तीमंत दया |
| स्वये श्वसणेचि सुकुमार , । मुख मोहाचे माहेर , । | आहे असे वाटते |
| माधुर्या जाहले अंकुर । दशन तैसे ।।262।। | |
| **पुढा स्नेह पाझरे , । माघां चालती अक्षरे ।** | |
| **शब्द पाठी अवतरे , । कृपा आधी ।।263।।** | |
| तंव , बोलणेचि नाही , । बोलो म्हणे जरी काही , । | |
| तरी बोल कोणाहि । खुपेल कां ? ।।264।। | |
| बोलता अधिकुही निघे , । तरी कोण्हाही वर्मी न लगे । | |
| आणि कोण्हासि न रिघे , । शंका मनी ।।265।। | |
| मांडिली गोठी , हन मोडैल । वासिपैल कोणी उडैल । | |
| आइकोनि वोवांडिल [8] । कोण्ही जरी ।।266।। | 8 उपेक्षा करणे |
| तरी दुवाळी [9] कोणा नोहावी । भुवई कवणाची नुचलावी । | 9 क्लेश |
| ऐसा भावो जीवी , । म्हणौनि उगा ।।267 ।। | |
| मग प्रार्थिला , विपाये । जरी लोभे बोलो जाये , । | |
| तरी , परिसतया होये । मायबापु ! ।।268।। | |
| कां , नादब्रह्मचि मुसे [10] आले । कीं , गंगापय असलले [11]। | 10 रुपाला आलें 11 वाईट |
| पतिव्रते आले । वार्धक्य जैसे ।।269।। | पाणी |
| तैसें , साच आणि मवाळ , । मितले [12] आणि रसाळ । | 12 मोजके |
| शब्द जैसे कल्लोळ [13] । अमृताचे ।।270।। | 13 लाटा |

विरोधुवादुबळु,[1] । प्राणितापढाळु [2] ।
उपहासु , छळु [3] । वर्मस्पर्शु [4] ।।271।।
आटु [5] , वेगु [6] , विंदाणु [7] । आशा , शंका , प्रतारणु ।
हे संन्यासिले अवगुणु । जया वाचा , ।।272।।
आणि , तयाचि परी किरीटी ! । थाउ [8] जयाचिये दीठी ।
सांडिलिया, भ्रुकुटी । मोकळिया ।।273।।
कां , जे भूती वस्तु आहे । तिये रुपो शके विपाये ।
म्हणौनि , वासु न पाहे । बहुतकरुनी ।।274।।
ऐसाही कोणे एके वेळे , । भीतरले कृपेचेनि बळे ।
उघडोनिया डोळे । दृष्टी घाली , ।।275।।
तरी , चंद्रबिबौनि धारा । निघता , नव्हती गोचरा [9] , ।
परी एकसरे [10] चकोरा । निघती दोंदे ।।276।।
तैसे प्राणियांसि होये , । जरी तो कही वासु पाहे ।
तया अवलोकनाची सोये [11] । कूर्मीही नेणे ।।277।।
किंबहुना ऐसी । दिठी जयाची भूतांसी ।
करही देखसी । तैसेचि ते ।।278।।
तरी होऊनिया कृतार्थ । राहिले सिद्धांचे मनोरथ ।
तैसे जयाचे हात । निर्व्यापार ।।279।।
अक्षमे[12] आणि संन्यासिले [13]। कां निरिंधन[14] आणि विझाले ।
मुकेनि घेतले । मौन जैसे ।।280।।
तयापरी काही । जया करां करणे नाही ।
जे अकर्तयाच्या [15] ठायी । बैसो येती ।।281।।
आसुडैल [16] वारा , । नख लागेल अंबरा , ।
इया बुद्धी , करा । चळो नेदी ।।282।।
तेथ आंगावरिली उडवावी ।कां , डोळा रिगते झाडावी ।
पशुपक्ष्या दावावी । त्रासमुद्रा ।।283।।
इया केउतिया गोठी ? । नावडे दंडु , काठी ।
मग शस्त्रांचे किरीटी ! । बोलणे के ? ।।284।।
लीलाकमळे खेळणे । कां , पुष्पमाळा झेलणे ।
न करी , म्हणे, गोफणे । ऐसे होईल ।।285।।
हालवतील रोमावळी । यालागी आंग न कुरवाळी ।
नखांची गुंडाळी । बोटावरी ।।286।।
तंव ,करणेयाचाचि अभावो । परी,ऐसाही पडे प्रस्तावो [17] ।
तरी , हाता हाचि सरावो , । जे , जोडिजती ।।287।।

1 विरोधी ,वादावादी,उपरोधिक
2 त्रासदायक 3 टाकून बोलणे
4 वर्मावर बोट ठेवण
5 हट्टी 6 जोराने 7 कपटी
8 स्थिती
9 दिसत नाहीत
10 एकदम
11 योग्यता
12 असमर्थ 13 सन्यास घेतला
14 सर्पणरहित
15 सिद्धपुरुष
16 हिसका बसेल
17 प्रसंग

कां , नाभिकारा [1] उचलिजे । हातु , पडिलिया देइजे ।     1 अभय देण्यास
नातरी , आर्ताते स्पर्शिजे । अळुमाळु [2] ।।288।।     2 किंचित
हेही, उपरोधे [3] करणे । तरी आर्तभय हरणे [4] ।     3 जुलमाने 4 दूर होणे
नेणती चंद्रकिरणे । जिव्हाळा तो ।।289।।
पावोनि तो स्पर्शु । मळयानिळु खरपुसु [5] ।     5 खुसखुशित
येणे माने , पशु । कुरवाळणे ।।290।।
ते सदा रिते मोकळे । जैशी , चंदनांगे निसळे [6] ।     6 शुद्ध
न फळताही , निर्फळे । होतीचिना ।।291।।
आता असो हे वाग्जाळ [7] ; ।जाणे , ते करतळ ।     7 शब्द पांडित्त्य
सज्जनांचे शीळ [8] । स्वभाव जैसे ।।292।।     8 वागणूक
आतां , मन तयाचे । सांगो म्हणो जरी साचे , ।
तरी सांगितले कोणाचे । विलास हे ? ।।293।।
काइ शाखा नव्हे तरु ? । जळेवीण असे सागरु ? ।
तेज आणि तेजाकारु । आन काई ? ।।294।।
अवयव आणि शरीर । हे वेगळाले कीर ? ।
कीं , रसु आणि नीर । सिनानी आथी ? ।।295।।
म्हणौनि , हे जे सर्व । सांगितले बाह्यभाव , ।
ते मनचि गा सावयव , । ऐसे जाणे ।।296।।
जे बीज भुई खोविले , । तेचि वरी रुख जाहले , ।
तैसें , इंद्रियद्वारी फांकले । अंतरचि की ! ।।297।।
पै , मानसीचि जरी । अहिंसेची अवसरी [9] ।     9 आभाव
तरी कैची बाहेरी । वोसंडेल ? ।।298।।
आवडे ते[10] वृत्ती किरीटी ! । आधी मनौनीचि उठी ।     10 कोणतीहि
मग ते वाचे , दिठी , । करांसी ये ।।299।।
वाचूनि , मनीचि नाही , । ते वाचेसि उमटेल काई ? ।
बीवीण भुई । अंकुर असे ? ।।300।।
म्हणौनि , मनपण जै मोडे , । तै , इंद्रिय आधीचि उबडे [11] ।     11 पालथे
सूत्रधारेवीण साइखडे [12] । वावो [13] जैसे ।।301।।     12 कठपुतळी 13 व्यर्थ
उगमीचि वाळूनि जाये , । ते , वोघी कैसे वाहे ? ।
जीवु गेलिया आहे । चेष्टा देही ? ।।302।।
तैसें , मन हे पांडवा ! । मूळ या इंद्रियभावा ।
हेचि राहटे आघवां । द्वारी इही ।।303।।
परी जिये वेळी जैसे । जे होऊनि आंतु असें , ।
बाहेरी ते तैसे । व्यापाररुपे ।।304।।

यालागी साचोकारे, । मनी अहिंसा थावे [1] थोरे ।    1 बळावते
जैसी , पिकली द्रुती [2] आदरे [3] । बोभात [4] निघे ।।305।।    2 सुगंध 3 आरंभ करणे
म्हणौनि , इंद्रिये तेचि संपदा । वेचितां ही , उदावादा [5] ।    4 गर्जत 5 भांडवल
अहिंसेचा धंदा । करिते आहाती ।।306।।
समुद्री दाटे भरिते । तै , समुद्रचि भरी तरियांते [6] ।    6 खाडी
तैसे स्वसंपत्ति चित्ते । इंद्रिया केले ।।307।।
हे बहु असो ; पंडितु । धरुनि बाळकाचा हातु , ।
वोळी लिही , व्यक्तु [7] , । आपणचि ।।    7 साकार करतो
तैसें , दयाळुत्व आपुले । मने हातापाया आणिले , ।
मग तेथ उपजविले । अहिंसेते ।।309।।
याकारणे किरीटी ! । इंद्रियांचिया गोठी , ।
मनाचिये राहाटी , । रुप केले ।।310।।
ऐसा , मने , देहे , वाचा , । सर्व संन्यासु दंडाचा ।
जाहला , ठायी जयाचा । देखशील , ।।311।।
तो जाण , वेल्हाळ [8]। ज्ञानाचे वेळाउळ [9] ।    8 सुंदर 9 मंदीर
हे असो ; निखिळ । ज्ञानचि तो ।।312।।
जे अहिंसा काने ऐकिजे , । ग्रंथाधारे निरुपिजे , ।
ते पहावी हे उपजे , । तै , तोचि पाहावा ।।313।।
ऐसे म्हणितले देवे । ते बोले एक सांगावे ।
परी फाकला [10] , हे उपसाहावे [11] । तुम्ही मज ।।314।।    10 विस्तार झाला
म्हणाल , हिरवे चारी , गुरू । विसरे मागील मोहर [12] धरू ।    11 क्षमा करावी 12 मार्ग
कां , वारेलगे , पाखिरु । गगनी भरे ।।315।।
तैसिया , प्रेमाचिया स्फूर्ती । फावलिया रसवृत्ती ।
वाहविला मती । आकळेना [13] ।।316।।    13 न आवरणे
तरी तैसे नोहे , अवधारा । कारण असे विस्तारा , ।
येऱ्हवी , पद तरी अक्षरा । तिहीचेचि ।।317।।
अहिंसा म्हणता थोडी , । परी , ते तैचि होय उघडी , ।
जै , लोटिजती [14] कोडी [15] , । मतांचिया ।।318।।    14 खंडण करणे 15 शेकडो
येऱ्हवी , प्राप्ते मतांतरे । थातंबूनि आंगभरे [16] ।    16 निरसन न करिता
बोलिजैल , ते न सरे । तुम्हांपाशी ।।319।।    आंगच्या जोराने
रत्नपारखियांच्या गांवी । जाईल , गंडकीं [17] तरी सोडावी ।    17 कसाचा दगड
काश्मिरी [18] न करावी । मिडगण [19] जेवी ।।+320।।    18पांढरा स्फटिक
काइसा [20] , वासु कापुरा । मंद जेथ अवधारा , ।    19 स्तुती 20 कशी काय
पिठाचा विकरा [21] । तिये साते [22] ।।321।।    21 विक्री 22 बाजारात

म्हणौनि, इये सभे । बोलकेपणाचेनि ,क्षोभे, ।
लाग सरुं[1] ,न लभे[2] , । बोला , प्रभु ! ।।322।। — 1 जवळिक करणे 2 मिळत नाही
सामान्या आणि विशेषा । सकळै कीजेल[3] देखा । — 2 कालवाकालव केली
तरी कानाचेया मुखा- । कडे न्याल ना तुम्ही ।।323।।
शंकेचेनि गदळे[3] । जै , शुद्ध प्रमेय मैळे । — 3 घाण
तै , मागुतिया पाउली पळे । अवधान , ये ते ।।324।।
कां , करुनि बाबुळियेची बुंथी[5] । जळे जिये ठाती । — 5 शेवाळाची खोळ
तयाचे वास पाहाती । हंसु काई ? ।।325।।
कां , अभ्रापैलीकडे । जै येत चांदिणे, कोडे , ।
तै , चकोरे चांचुवडे । उचलितीना ।।326।।
तैसें , तुम्ही वास न पाहाल , ।ग्रंथु नेघा , वरी कोपाल , ।
जरी निर्विवाद नव्हैल । निरुपण ।।327।।
न बुझावितां मते , । न फिटे आक्षेपाचे लागते[6] । — 6 संबंध
ते व्याख्यान जी तुमते । जोडूनि नेदी ।।328।।
आणि माझे तंव आघवे । ग्रथन येणेचि भावे , ।
जे तुंम्ही संती होआवे । सन्मुख सदा ।।329।।
येऱ्हवी तरी , साचोकारे । तुम्ही गीतार्थाचे सोइरे ।
जाणोनि , गीता एकसरे । धरिली मिया ।।330।।
जे आपुले सर्वस्व द्याल । मग इयेते सोडवूनि न्याल ।
म्हणौनि , ग्रंथु नव्हे , वोल[7] । साचचि हे ।।331।। — 7 तारण
कां, सर्वस्वाचा लोभु धरा । वोलीचा[7] अव्हेरु करा ।
तरी , गीते , मज , अवधारा ,। एकची गती ।।+332।।
किंबहुना , मज । तुमचिया कृपा काज , ।
तियेलागी व्याज[8] ।ग्रंथाचे केले ।।333।। — 8 निमित्त
तरी तुम्हा रसिकाजोगे । व्याख्यान शोधावे लागे , ।
म्हणौनि , जी मतांगे । बोलो गेलो ।।334।।
तंव , कथेसि पसरु जाहला , । श्लोकार्थु दूरी गेला ।
कीजो क्षमा यया बोला , । अपत्या मज ।।335।।
आणि , घासांआंतिल हरळु[9] । फेडिता लागे वेळु , । — 9 खडा
ते दुषण नव्हे , खडळु[10] । सांडावा की ! ।।336।। — 10 खडा
कां , संवचोरा[11] चुकविता ,। दिवस लागलिया , माता । — 11 सभ्य दिणारा चोर
कोपावे ? कीं , जीविता , । जिताणे कीजे ![12] ।।337।। — 12 दृष्ट काढणे
परी यावरील हे नव्हे , । तुम्ही उपसाहिले तेचि बरवे ।
आतां अवधारिजो , देवे । बोलिले ऐसे ।।338।।

म्हणे उन्मेख सुलोचना । सावध होइ अर्जुना ! ।
करु तुज ज्ञाना । वोळखी आता ।।339।।
**तरी ज्ञान गा ते एथे । वोळखे तूं निरुते ।**
**अक्रोशेवीण जेथे । क्षमा असे ।।340।।**
अगाध सरोवरी । कमळिणी जियापरी ।
कां , सदैवाचिया घरी , । संपत्ति जैसी ।।341।।
पार्था ! तेणे पाडे , । क्षमा जयाते वाढे ।
तेही ' लक्षे [1] ' ते फुडे । लक्षण सांगो ।।+342।।
तरि , पढियंते [2] लेणे , । आंगी भावे जेणे ।
धरिजें , तेवी साहणे , । सर्वचि जया ।।343।।
त्रिविध , मुख्य आघवे [3] । उपद्रवांचे मेळावे ।
वरि पडिलिया , नव्हे । वांकुडा [4] जो ।।344।।
अपेक्षित पावे । ते जेणे तोषे मानवे , ।
अनपेक्षिताही करवे । तोचि मानु ।।345।।
जो मानापमानाते साहे , । सुखदुःख जेथ सामाये ।
निंदास्तुती नोहे । दुखंडु [5] जो ।।346।।
उन्हाळेनि जो न तपे । हिमवंती न कांपे ।
कायसेनिही न वासिपे [6] । पातलेया ।।347।।
स्वशिखरांचा भारु । नेणे जैसा मेरु ।
की धरा , यज्ञसूकरु [7] । वोझे न म्हणे ।।348।।
नाना , चराचरी भूती । दाटणी [8] नव्हे क्षिती [9] ।
तैसा , नाना द्वंद्वी प्राप्ती । घामेजेना ।।349।।
घेऊनि जळाचे लोट । आलिया नदीनदांचे संघाट [10] ।
करी वाड पोट , । समुद्र जेवी ।।350।।
तैसे जयाचिया ठायी । न साहणे , काहीचि नाही ।
आणि , साहतु असें , ऐसेही । स्मरण नुरे ।।351।।
आंगा जे पातले , । ते करुनि घाली आपुले , ।
तेथ साहतेनि नवले , । घेपिजेना ।।352।।
हे अनाक्रोश क्षमा । जयापाशी , प्रियोत्तमा ! ।
जाण , तेणे महिमा [11] । ज्ञानासि गा ।।353।।
तो पुरुष पांडवा ! । ज्ञानाचा वोलावा ।
आतां , परिस आर्जवा । रुप करुं ।।354।।
तरी आर्जव ते ऐसे, । प्राणाचे [12] सौजन्य जैसे , ।
आवडे [13], तयाही दोषे [14]। एकचि गा ।।+355 ।।

1 तेच ध्येय किं वा लक्ष ठेवून
2 अत्यंत आवडते
3 संपूर्ण
4 डगमगलेला
5 दोन वेगळ्या भावना नसतात
6 घाबरणे
7 वराह अवतार
8 भार 9 पृथ्वी
10 समुदाय
11 महत्व येते
12 प्राणतत्त्व
13 कोणाच्याही 14 संबंधी

कां , तोंड पाहूनि , प्रकाशु। न करी जेवी चंडांशु [1] ।    1 सूर्य
जगा एकुचि अवकाशु , । आकाश जैसे ।।356।।
तैसे जयाचे मन । माणुसाप्रती आन आन ।
नव्हे , आणि वर्तन , । ऐसे , पै , ते ।।357।।
जे जगेचि सनोळख , । जगेसी जुनाट सोयरिक ।
आपपर हे भाख । जाणणे नाही ।।358।।
भलतेणेसी मेळु । पाणिया ऐसा ढाळु [2] ।    2 वागणे
कवणेविखी आडळु [3] । नेघे चित्त ।।359।।    3 विकल्प
वारियाची धांव । तैसे सरळ भाव ।
शंका आणि हांव । नाही जया ।।360।।
मायेपुढे बाळका । रिगता , न पडे शंका ।
तैसे मन देता लोकां , । नालोची [4] जो ।।361।।    4 मागेपुढे पाहत नाही
फांकलिया इंदीवरा [5] । परिवारु [6] नाही धनुर्धरा ! ।    5 कमळ 6 मर्यादा
तैसा, कोन , कोपरा । नेणेचि जो ।।362।।
चोखाळपण रत्नाचे , । कां ,रत्नावरी किरणाचे , ।
तैसे , पुढा मन जयाचे , । करणे , पाठी ।।363।।
आलोचु [7] जो नेणे । अनुभवचि जोगावणे [8] ।    7 विचार 8 उपासना करणे
धरी , मोकली , अंतःकरणे । नव्हेचि जया ।।364।।
दिठी नव्हे मिणधी [9] । बोलणे नाही संदिग्धी ।    9 कपटी
कवणेसी हीनबुद्धी । राहाटीजे ना ।।365।।
दाही इंद्रिये पांजळे । निःप्रपंचे निर्मळे ।
पांचही पालव [10] मोकळे । आठही पाहर ।।366।।    10 प्राण
अमृताची धार । तैसें , उजूं अंतर ।
किंबहुना , जो माहेर । या चिन्हांचा ।।367 ।।
तो पुरुष सुभटा ! । आर्जवाचा आंगवटा ।
जाण तेथेचि घरटा । ज्ञाने केला ।। 368।।
आतां , ययावरी । गुरुभक्तीची परी ।
सांगो गा अवधारी । चतुरनाथा ! ।।369।।
आघवीयाचि दैवा [11]। जन्मभूमि , हे सेवा ।    11 उत्तम गोष्टींमधे
जे , ब्रह्म करी जीवा । शोच्यातेहि [12] ।।370।।    12 शोकग्रस्त
हे आचार्योपास्ती [13] । प्रकटिजैल तुजप्रती ।    13 गुरुसेवा
बैसो दे एकपांती । अवधानाची ।।371।।
तरी , सकळ जळसमृद्धी । घेऊनि , गंगा निघाली उदधी ।
की , श्रुति हे महापदी । पैठी [14] जाहाली ।।372।।    14 स्थीर झाली

नाना , वेटाळूनि जीविते । गुणागुण उखिते [1] । 1 जसेच्या तसे
प्राणनाथा उचिते । दिधले प्रिया ।।373।।
तैसे सबाह्य आपुले , । जेणे गरुकुळी वोपिले [2] । 2 अर्पण केले
आपणपे केले । भक्तीचे घर ।।374।।
गुरुगृह जये देशी , । तो देशुचि वसे मानसी ।
विरहिणी कां जैसी । वल्लभाते ।।375।।
तियेकडोनि येतसे वारा । देखोनि , धांवे सामोरा ।
आड पडे [3] , म्हणे । ' घरा बीजे कीजो [4] ' । 3 सांष्टांग नमस्कार घालंणे
साचा प्रेमाचिया भुली , ।तया दिशेसीचि आवडे बोली । 4 आगत्याने बोलावतो
जीवु थानपती [5] करूनि घाली । गुरुगृही जो ।।377।। 5 मिरासदार
परी गुरुआज्ञा धरिले । देह गावी असे एकले ।
वासरुवा लाविले । दावे जैसे ।।378।।
म्हणे , ' कै हे बिरडे फिटेल [5] ? । कै तो स्वामी भेटेल ?। 6 गाठ सुटेल
युगाहुनि वडील [7] ,। निमिष [8] मानी ।।379।। 7 मोठे 8 क्षण
ऐसेया गुरुग्रामीचे आले , । कां , स्वये गुरुनीचि धाडिले , ।
तरी गतायुष्या जोडले । आयुष्य जैसे ।।380।।
कां , सुतकया अंकुरा-।वरी पडलिया पीयूषधारा ।
नाना , अल्पोदकीचा, सागरा । आला मासा ।।381।।
नातरी , रंके निधान देखिले । कां , आंधळिया डोळे उघडले ।
भणंगाचिया आंगा आले । इंद्रपद ।।382।।
तैसें , गुरुकुळाचेनि नांवे । महासुखे अति थोरावे ।
जे कोडेही पोटाळवे [9] । आकाश कां ! ।।383।। 9 कवटाळावे
पै , गुरुकुळी ऐसी । आवडी जया देखसी ।
जाण , ज्ञान तयापासी । पाइकी [10] करी ।।384।। 10 सेवा
आणि अभ्यंतरीलियेकडे [11] ।प्रेमाचेनि पवाडे [12] । 11 अंतःकरणपूर्वक
श्रीगुरुचे रुपडे । उपासी ध्यानी ।।385।। 12परमप्रेमाने
हृदयशुद्धीचिया आवारी । आराध्यु तो निश्चल ध्रुव करी ।
मग सर्व भावेसी परिवारी । आपण होय ।।386।।
कां,चैतन्याचिये पोवळी-। माजी [13] आनंदाचिया राउळी । 13 चैतन्याच्या चौथऱ्यात
श्रीगुरुलिंगा ढाळी [14] । ध्यानामृत ।।387।। 14 अभिषेक करितो
उदयिजतां बोधार्का , । बुद्धीची डाळ[15] सात्त्विका । 15 टोपली
भरोनिया , त्र्यंबका । लाखोली वाहे ।।388।।
काळशुद्धी , त्रिकाळी , । जीवदशा धूप जाळी ।
ज्ञानदीपे वोवाळी । निरंतर ।।389।।

सामरस्याची रससोय । अखंड अर्पितु जाय ।
आपण भराडा [1] होय । गुरु तो लिंग ।। 390।। — 1 पुजारी
नातरी , जीवाचिये सेजे । गुरु कांतु करुनि भुंजे ।
ऐसी प्रेमाचेनि भोजे । बुद्धी वाहे ।।391।।
कोणे एके अवसरी । अनुरागु भरे अंतरी ।
की तया नाम करी । क्षीराब्धी ।।392।।
तेथ ध्येयध्यान बहु सुख ।तेचि शेषतुका [2] निर्दोख । — 2 शेषशयनासारीखे
वरी जळाशयन देख । भावी गुरु ।।393।।
मग वोळगती [3] पाय । ते लक्ष्मी आपण होय । — 3 सेवा करणे
गरुड होऊनि उभा राहे । आपणचि ।।394।।
नाभी , आपण जन्मे । ऐसे गुरुमूर्तिप्रेमे ।
अनुभवी मनोधर्मे । ध्यानसुख ।।395।।
एकाधिये वेळे । गुरु माय करी , भावबळे ।
मग स्तन्यसुखे लोळे । अंकावरी ।।396।।
नातरी गा किरीटी ! । चैतन्यतरुतळवटी ।
गुरु धेनु आपण पाठी । वत्स होय ।।396।।
गुरुकृपास्नेहसलिली ।आपण होय मासोळी ।
कोणे एके वेळी ,। हेचि भावी ।।398।।
गुरुकृपामृताचे वडप [4] । आपण सेवावृत्तीचे होय रोप । — 4 दृष्टी
ऐसेसे संकल्प । विये मन ।।399।।
चक्षुपक्षेवीण । पिलु होय आपण ।
कैसे पै , अपारपण । आवडीचे ।।400।।
गुरते पक्षिणी करी । चारा घे चाचूवरी ।
गुरु तारु [5] धरी । आपण कास [6]।।401।। — 5 तारणारा 6आश्रय धरणारा
ऐसे प्रेमाचेनि थावे । ध्यानचि ध्यानाते प्रसवे ।
पूर्णसिंधु , हेलावे [7] । फुटती जैसे ।।402।। — 7 लाटा
किंबहुना , यापरी । श्रीगुरुमूर्ति अंतरी ।
भोगी , आता अवधारी । बाह्यसेवा ।।403।।
तरी जीवी ऐसे आवांके [8] । म्हणे , दास्य करीन निके । — 8 विचार
जैसेनि , गुरु कौतुके , । माग म्हणती ।।404।।
तैसिया साचा उपास्ती [9] । गोसावी प्रसन्न होती । — 9 उपासना
तेथ मी विनंती । ऐसी करीन ।।405।।
म्हणेन ,' तुमचा देवा , । परिवारु जो आघवा , ।
तेतुले रुपे होआवा । मीचि एकु ।।406।।

आणि उपकरती [1] आपुली । उपकरणे आथि जेतुली , ।
माझी रुपे तेतुली । होआवी स्वामी ' ।।407।।
ऐसा मागेन वरु । तेथ , ' हो म्हणती श्रीगुरु ' ।
मग तो परिवारु । मीचि होइन ।।408।।
उपकरणजात सकळिक । ते मीचि होईन एकैक ।
तेंव्हा उपास्तीचे कौतुक । देखिजैल ! ।।409।।
गुरु बहुतांची माये । परी एकलौति होऊनि ठाये ।
तैसे करुनि आण वाये । कृपे तिये ।।410।।
तया अनुरागा वेधु लावी [2] । एकपत्नीव्रत घेववी ।
क्षेत्रसंन्यासु करवी । लोभाकरवी ।।411।।
चतुर्दिक्षु वारा । न लाहे निघो बाहिरा ।
तैसा गुरुकृपे पांजिरा । मीचि होईन ।।412।।
आपुलिया गुणांची लेणी । करीन गुरुसेवे स्वामिणी ।
हे असो ; होईन गंवसणी । मीचि भक्तीसी ।।413।।
गुरुस्नेहाचिये वृष्टी । मी पृथ्वी होईन तळवटी ।
ऐसिया मनोरथांचिया सृष्टी । अनंता रची ।।414।।
म्हणे , श्रीगुरुचे भुवन । आपण मी होईन ।
आणि दास होऊनि करीन । दास्य तेथिचे ।।415।।
निर्गमागमी ,दातारे [3] । जे वोलांडिजती , उंबरे ।
ते मी होईन , आणि द्वारे । द्वारपाळु ।।416।।
पाउवा [4] मी होईन । तिया मीचि लेववीन ।
छत्र मी , आणि करीन । बारीपण [5] ।।417।।
मी तळ , उपरु ,जाणविता [6] ,। चंवरुधरु , हातु देता ।
स्वामीपुढे खोलता [7] । होईन मी ।।418।।
मीचि होईन सागळा [8] । करुं सुईन गुरुळा [9] ।
सांडिती , तो नेपाळा [10] । पडिघा [11] मीचि ।।419।।
हडप [12] मी वोळगैन [13] । मीचि उगाळु [14] घेईन ।
उळिग [15] मी करीन । आंघोळीचे ।।420।।
होईन गुरुंचे आसन । अळंकार परिधान ।
चंदनादि होईन । उपचार ते ।।421।।
मीचि होईन सुआरु [16] । वोगरीन उपहारु [17] ।
आपणपे श्रीगुरु । वोवाळीन ।।422।।
जे वेळी देवो अरोगिती [18] । तेव्हां , पांतीकरु [19] मीचि पांती [20] ।
मीचि होईन पुढती , । देईन विडा ।।423 ।।

1 उपयोगााची पूजापात्रे
2 वेधून घेइन
3 स्वामी
4 खडावा
5 छत्र धरण्याचे काम
6 इथे खळगा आहे, इथे उंचवटा आहे हें सांगणारा चोपदार
7 वाटाड्या 8 झारी धरणारा
9चूळेचे पाणी 10 चूळ 11 तस्त
12 पानदान 13 तयार करणे
14 थुंका 15 सेवा
16 स्वयंपाकी 17 अन्न वाढणारा वाढपी
18जेवतील 19 पंगतीला बसणारा 20 पंगत

ताट मी काढीन । सेज मी झाडीन ।
चरणसंवाहन [1] । मीचि करीन ।।424।। 1 पाय रगडणे
सिहासन होईन आपण । वरी गुरु करिती आरोहण ।
होईन पुरेपण । वोळगेचे ।।425।।
श्रीगुरुचे मन । जया देईल अवधान ।
तो मी पुढा होईन । चमत्कारु ।।426।।
तया श्रवणाचे आंगणी । होईल शब्दांचिया अक्षौहिणी [2] । 2 समुदाय
स्पर्श होईन घसणी । आंगाचिया ।।427।।
श्रीगुरुंचे डोळे । अवलोकने स्नेहाळे ।
पाहती , तिये सकळे । होईन रुपे ।।428।।
तिये रसने जो जो रुचेल । तो तो रसु म्यां होईजैल ।
गंधरुपे कीजेल । घ्राणसेवा ।।429।।
एवं , बाह्यमनोगत । श्रीगुरुसेवा समस्त ।
वेटाळीन वस्तुजात । होऊनिया ।।430।।
जंव देह हे असेल , ।तंव , वोळगी [3] ऐसी कीजेल । 3 सेवा
मग देहांती नवल । बुद्धि आहे ।।431।।
इये शरीरीची माती । मेळवीन तिये क्षिति [4] । 4 पृथ्वी
जेथ श्रीचरण उभे ठाती । श्रीगुरुंचे ।।432।।
माझा स्वामी कवतीके । स्पर्शीजति जिये उदके ।
तेथ लया नेईन निके । आपी आप ।।433।।
श्रीगुरु वोवाळिजती । कां, भुवनी जे उजळिजति ।
तयां दीपांचिया दीप्ती । ठेवीन तेज ।।434।।
चंवरी , हन, विंजणा । तेथ लयो करीन प्राणा ।
मग आंगाचा वोळंगणा [5] । होईन मी ।।435।। 5 सेवा करणारा
जिये जिये अवकाशी । श्रीगुरु असती परिवारेसी ।
आकाश लया आकाशी । नेईन तिये ।। 436।।
परी , जीतु , मेला न संडी , । निमेषु लोका न धाडी [6] , । 6 दुसऱ्याला संधी देणार नाही
ऐसेनि गणावया कोडी । कल्पांचिया ।।+437।।
येतुलेवरी धिवसा [7] । जयाचिया मानसा । 7 इच्छा
आणि करुनियांहि तैसा ,। अपारु जो ।।438।।
रात्र दिवस नेणे । थोडे बहु न म्हणे ।
म्हणियाचेनि दाटपणे । साजा [8] होय ।।439।। 8 आज्ञा मिळाल्याच्या गर्वाने
तो व्यापारु येणे नांवे । गगनाहूनि थोरावे । प्रसन्न
एकला करी आघवे । एकेचि काळी ।।440।।

हृदयवृत्ती पुढां । आंगचि घे दवडा [1] ।    1धाव
काज करी होडा । मानसेशी ।।441।।
एकादिया वेळां । श्रीगुरुचिया खेळा ।
लोण करी सकळा । जीविताचे ।।442।।
जो गुरुदास्येकृशु । जो गुरुप्रेमे सपोषु ।
गुरुआज्ञेनिवासु । आपणचि जो ।।443।।
जो गुरु कुळे सुकुलीनु , । जो गुरुबंधुसौजन्ये सुजनु , ।
जो गुरुसेवाव्यसने सव्यसनु , ।निरंतर ।।444।।
गुरुसंप्रदायधर्म । तेचि जयाचे वर्णाश्रम , ।
गुरुपरिचर्या नित्यकर्म । जयाचे गा ।। 445।।
गुरु क्षेत्र , गुरु देवता , । गुरु माता, गुरु पिता , ।
जो गुरुसेवेपरौता । मार्ग नेणे ।। 446।।
श्रीगुरुचे द्वार । ते जयाचे सर्वस्व सार ।
गुरुसेवकां सहोदर । प्रेमे भजे ।।447।।
जयाचे वक्त्र । वाहे गुरुनामाचे मंत्र ।
गुरुवाक्यांवाचूनि शास्त्र । हाती न शिवे ।।448।।
शिवतले गुरुचरणी । भलतैसे हो पाणी , ।
तया सकळ तीर्थे आणी । त्रैलोक्यीची ।। 449।।
श्रीगुरुचे उशिटे । लाहे जै अवचटे , ।
तै , तेणे लाभे , विटे । समाधीसी [1] ।।450।।    2 आत्मसमाधीचे महत्व वाटत
कैवल्यसुखासाठी । परमाणु घे [3] , किरीटी ! ।    नाही 3 धुळीचे कण मोक्षलाभा
उधळती पायांपाठी । चालता जे ।। 451।।    सारखे समजतो
हे असो ; सांगावे किती ! । नाही पारु गुरुभक्ती ।
परी गा उत्क्रांतमती [4] । कारण हे ।।452।।    4 बुद्धीची अफाट स्फुर्ती
जया इये भक्तीची चाड , । जया इये विषयीचे कोड , ।
जो हे सेवेवाचून गोड , । न मनी काही ।।453।।
तो तत्त्वज्ञानाचा ठावो । ज्ञाना तेणेचि आवो ।
हे असो ; तो देवो । ज्ञान [5] भक्तु ।।454।।    5 ज्ञानी
हे जाण पां साचोकारे । तेथ ज्ञान उघडेनि द्वारे ।
नांदत असे ,जगा पुरे [6]। इया रीती ।। 455।।    6 जगाला पुरुन उरते
जिये गुरुसेवेविखी । माझा जीव अभिलाखी ।
म्हणौनि सोयचुकी [7] । बोली केली ।।456।।    7 मार्ग सोडून
येऱ्हवी असता हाती खुळा [8] । भजनावधानी आंधळा ।    8 थोटा
परिचर्येलागी , पांगुळा- ।पासूनि मंदु ।।457।।
गुरुवर्णनी मुका । आळशी पोशिजे फुका ।
परि मनी आथी निका । सानुरागु [9] ।।458।।    9 प्रेम

तेणेचि पै कारणे । हे स्थूळ [1] पोसणे ।
पडले मज , म्हणे । ज्ञानदेवो ।।459।।
परि तो बोलु उपसाहावा । आणि वोळगे [2] अवसरु देयावा ।
आतां , म्हणेन जी बरवा । ग्रंथार्थुचि ।।460।।
परिसा, परिसा , श्रीकृष्णु । जो भूतभारसहिष्णु [3] ।
तो बोलतसे विष्णु । पार्थु ऐके ।।461।।
म्हणे शुचित्व गा ऐसे । जयापाशी दिसे ।
आंग, मन, जैसे । कापुराचे ।।462।।
कां , रत्नांचे दळवाडे [4] । जैसे सबाह्य चोखडे , ।
आंत बाहेरि एके पाडे , । सूर्यु जैसा ।।463।।
बाहेरी कर्मे क्षाळला । भीतरी ज्ञाने उजळला ।
इही दोही परी आला । पाखाळा [5] एका ।। 464।।
मृत्तिका आणि जळे । बाह्य येणे मेळे ।
निर्मळु ,होय , बोले । वेदाचेनी, ।।465।।
भलतेथ ,बुद्धीबळी, । रज आरिसा, उजळी ।
सौदणी [6] फेडी थिगळी [7] । वस्त्रांचिया ।। 466।।
ि कंबहुना यियापरी । बाह्य चोख अवधारी ।
आणि ज्ञानदीपु अंतरी । म्हणौनि शुद्ध ।।467।।
येऱ्हवी तरी पंडसुता ! । आंत शुद्ध नसतां ।
बाहेरि कर्म ,तो तत्त्वता । विटंबु [8] गा ! ।।468।।
मृत जैसा शृंगारिला , । गाढव तीर्थी न्हाणिला , ।
कडु दुधिया माखिला । गुळे जैसा ।।469।।
वोस गृही तोरण बांधिले , । कां , उपवासी अन्ने लिंपिले ।
कुंकुमसेंदुर केले । कांतहीनेने ।।470।।
कळस ढिमाचे [9] पोकळ । जळो वरील ते झळाळ ।
काय करूं चित्रिव [10] फळ । आंतु शेण !।।471।।
तैसे कर्म वरिचिलेकडां,। न सरे [11],थोर मोले [12] ,कुडा [13] ।
नव्हे मदिरेचा घडा । पवित्र , गंगे ।।472।।
म्हणौनि ,अंतरी ज्ञान व्हावे । मग बाह्य लाभेल स्वभावे ।
वरी ,ज्ञान , कर्मे संभवे , । ऐसे के जोडे [14] ? ।।473।।
यालागी बाह्य भागु । कर्मे धुतला चांगु ।
ज्ञाने फिटला वंगु [15] । अंतरीचा ।। 474।।
तेथ अंतर बाह्य गेले । निर्मळत्व एक जाहले ।
किंबहुना उरले । शुचित्वचि ।।475।।

1 या गोष्टीचा
2 सेवेला
3 भूतांचा भार सहन करणारा
4 स्वरूप
5 शुद्धता
6 कपडे धुण्याचे भांडे 7 डाग
8 फजिती
9 मुलामा
10 कृत्रीम
11 सर येत नाही12 मोठी किंमत असूनही 13 अंतर्मयी वाईट गोष्टीला
14 कसे शक्य आहे
15 मळ

म्हणौनि, सद्भाव जीवगत[1] । बाहेरी दिसती फांकत ।
स्फटिकगृहीचे डोलत । दीप जैसे ।।476।।
विकल्प जेणे उपजे , । नाथिली, विकृती निपजे ।
अप्रवृत्तीची बीजे । अंकुर घेती , ।। 477।।
ते आइके, देखे अथवा भेटे , । परी मनी काहीचि नुमटे ।
मेघरंगे न कांटे [2]। व्योम जैसे ।।478।।
येऱ्हवी इंद्रियांचेनि मेळे , । विषयांवरी तरी लोळे ।
परी विकाराचेनि , विटाळे । लिंपिजेना ।। 479।।
भेटलेया वाटेवरी । चोखी [3] आणि माहारी [4] ।
तेथ नातळे [5] , तियापरी । राहाटो जाणे ।। 480।।
**कां , पतिपुत्राते आलिंगी । एकचि ते तरुणांगी ।**
**तेथ पुत्रभावाच्या आंगी , । न रिंगे कामु ।। 481।।**
तैसे , हृदय चोख , । संकल्पविकल्पी सनोळख [6] , ।
कृत्याकृत्य विशेख[7] । फुडे जाणे [8] ।।482।।
पाणिये , हिरा न भिजे , । आधणी , हरळु न शिजें , ।
तैसी , विकल्पजाते , न लिंपिजे, । मनोवृत्ती ।।483।।
तया नांव शुचिपण । पार्था ! गा संपूर्ण ।
हे देखसी , तेथ जाण , । ज्ञान असे ।।484।।
आणि स्थिरता साचे । घर रिघाली जयाचे ।
तो पुरुष ज्ञानाचे । आयुष्य गा ! ।। 485।।
देह तरी वरिचिलीकडे । आपुलिया परी हिंडे , ।
परी बैसका न मोडे । मानसीची ।। 486।।
वत्सावरूनि धेनूचे । स्नेह , राना न वचे ।
नव्हती भोग सतियेचे । प्रेमभोग ।।487।।
कां , लोभिया दूर जाये , । परी जीव ठेविलाचि ठाये ।
तैसा , देहो चाळिता , नव्हे । चळु चित्ता ।।488।।
जातया अभ्रासवे । जैसे आकाश न धांवे ।
भ्रमणचक्री[9] न भंवे । धृव जैसा ।।489।।
पांथिकाचिया येरझारा । सवे, पंथु न वचे धनुर्धरा ! ।
कां , नाही जेवी तरुवरां । येणे जाणे ।।490।।
तैसा , चळणवळणात्मकी । असोनि ये पांचभौतिकी , ।
भूतोर्मी एकी [10]। चळिजेना ।। 491।।
वाहुटळीचेनि बळे । पृथ्वी जैसी न ढळे ।
तैसा उपद्रव उमाळे [11] । न लोटे जो ।। 492।।

1 अंतरीचे
2 मळणे
3 ब्राह्मण 4 महारीण
5 स्पर्श करीत नाही
6 ओळखीचे
7 शेवटपर्यंत 8 चांगले जाणतो
9 तारांगणांच्या भ्रमणाप्रमाणे
10 मनुष्याला स्वाभाविक अशा विकारांनी
11 लोट

दैन्यदुःखी न तपे । भयशोकी न कंपे ।
देहमृत्यु न वासिपे [1] । पातलेनी ।। 493।।
आर्ति , आशा पडिभरे [2] । वय , व्याधी , गजरे [2] ।
उजु असतां  पाठिमोरे [3]। नव्हे चित्त ।। 494।।
निंदा , निस्तेज , दंडी [4], । कामलोभा , वरपडी [5] ।
परी रोमा नव्हे वांकुडी । मानसाची ।।495।।
आकाश हे वोसरो [6] । पृथ्वी वरि विरो , ।
परि नेणे मोहरो । चित्तवृत्ती ।। 496।।
हाती [7] हाला फुली [8] । पासवणा [9] जेवी न घाली ।
तैसा न लोटे , दुर्वाक्यशेली । शेलिला [10] सांता ।। 497।।
क्षीरार्णवाचिया कल्लोळी , । कंपु नाही मंदराचळी , ।
आकाश न जळे  , जाळी । वणवियाच्या ।। 498।।
तैशा , आल्या गेल्या ऊर्मी । नव्हे गजबज मनोधर्मी ।
किंबहुना , धैर्य क्षमी [11] । कल्पांतीही ।।499।।
परी स्थैर्य ऐसी भाष , । बोलिजे जे सविशेष ।
ते हे दशा गा , देख । देखणया ! ।।500।।
हे स्थैर्य निधडे । जेथ आंगे जीवे जोडे , ।
ते ज्ञानाचे उघडे । निधान साचे ।। 501।।
आणि इसाळु [12] जैसा घरा [13] । कां दंदिया [14] हतियेरा , ।
न विसंबे भांडारा ।बद्धकु [15] जैसा ।। 502।।
कां , एकलौतिया बाळका । वरि पडौनि ठाके अंबिका [16] ।
मधुविषी मधुमक्षिका । लोभिणी जैसी ।। 503।।
अर्जुना ! जो यापरी । अंतःकरण जतन करी ।
नेदी उभे ठाको द्वारी । इंद्रियांच्या ।। 504।।
म्हणे,काम बागुल [17] ऐकेल,। हे आशा सियारी [18] देखैल ।
तरी जीवा टेकैल । म्हणौनि बिहे ।। 505।।
बाहेरी धीट [19] जैसी । दाटुगा [20] पति कळासि [21] ।
करी टेहणी [22] तैसी , । प्रवृत्तीसी ।।+ 506।।
सचेतनी वाणेपणे [23] (सतेचेनि वाणिपणे) । देहासकट आटणे ।
संयमावरी करणे [24] । बुझूनि [25] घाली ।। 507।।
मनाचिया महाद्वारी । प्रत्याहाराचिया [26]ठाणांतरी [27]।
जो यमदम शरीरी । जागवी उभे ।। 508।।
आधारी नाभी कंठी , ।बंधत्रयाची घरटी ।
चंद्रसुर्य संपुटी [28] ।सूये चित्त ।।+509।।

1 भीणे
2 आवेश 3 अनुकुल असलेले
चित्त डळामळत नाही
4 तडाका  5 प्राप्त होता
6 नाहीसे होणे
7 हत्ती
8 फुलाने मारले असता 9 माघार
10 दुष्ट शब्द बोलणे
11  सहनशीलता
12 ब्रह्मराक्षस 13 पछाडलेला
माणुस 14 योद्धा 15 लोभी
16 आई
17 बागुलबोवा 18 डाकीण
19 ढालगज 20 दांडगा
21 निग्रह करणे 22 पहारा
23 कमीपणे
24 इंद्रिये 25 समजावणे
26 इंद्रियांचे नियमन
27 पहाऱ्याची जागा
28 सुषुम्ना नाडीत चित्ताला
स्थिर करितो

समाधीचे शेजेपासी । बांधोनि घाली ध्यानासी ।
चित्त चैतन्य समरसी । आंतु रते[1] ।।+ 510।। 1 आंत रमते
अगा, अंतःकरणनिग्रहो जो , । तो हा , हे जाणिजो ।
हा आथी , तेथ विजयो । ज्ञानाचा पै ।।511।।
जयाची आज्ञा आपण । शिरी वाहे अंतःकरण ।
मनुष्याकारे जाण । ज्ञानचि तो ।। 512।।

**इन्द्रियार्थेषु वैराग्यमनहंकार एव च ।**
**जन्ममृत्युजराव्याधिदु ःखदोषानुदर्शनम् ।।8।।**
**इंद्रियांच्या विषयांचे ठायी विरक्ति, तसेच अहंकार नसणे, आणि जन्म ,मृत्यु,जरा,व्याधि व दुःख हे आपल्या मागे लागलेले दोष आहेत अशी बुद्धी असणे**

आणि विषयांविखी । वैराग्याची निकी ।
पुरवणी मानसी ,की ,। जिती आथी ।। 513।।
वमिलिया अन्ना । लाळ न घोटी रसना ।
कां , आंग न सूये आलिंगना । प्रेताचिया ।। 514।।
विष खाणे नागवे , । जळत घरी न रिगवे , ।
व्याघ्रविरां न वचवे , । वस्ती जेवी ।। 515।।
धडाडीत लोहरसी । उडी न घालवे जैसी , ।
न करवे उशी , । अजगराची ।। 516।।
अर्जुना ! तेणे पाडे , । जयासी विषयवार्ता नावडे ।
नेदी , इंद्रियांचेनि तोंडे , । काहीच जावो ।।517।।
जयाचे मनी आलस्य , । देही , अतिकार्श्य[2] । 2 अति रोडपणा
शमदमी सौरस्य[3] । जयासि गा , ।।518।। 3 गोडी
तपोव्रताचा मेळावा । जयाचे ठायी पांडवा ! ।
युगांत जया गांवां -। आंतु येतां ।।519।।
बहु योगभ्यासी हांव । विजनाकडे धांव ।
न साहे जो नांव । संघाताचे[4] ।। 520।। 4 समुदाय
नाराचांची[5] आंथुरणे । पूयपंकी लोळणे । 5 बाणांची
तैसें , लेखी भोगणे । ऐहिकीचे ।। 521।।
आणि स्वर्गाते मानसे । ऐकोनि , मानी ऐसे ।
कुहिले पिशित[6] जैसे । श्वानाचे कां ।। 522।। 6 कुजलेले मांस
ते हे , विषयवैराग्य । जें , आत्मलाभाचे सभाग्य ।
येणे ब्रह्मानंदा योग्य । जीव होती ।। 523।।

ऐसा उभयभोगी त्रासु । देखसी जेथ बहुवसु , ।
तेथ जाण रहिवासु । ज्ञानाचा तूं ।।524।।
आणि सचाडाचिये [1] परी । इष्टापुर्ते करी । 1 फलाची इच्छा करणारा
परी केलेपण शरीरी । वसो नेदी ।। 525।।
वर्णाश्रमपोषके । कर्मे नित्यनैमित्तिके ।
तयामाजी काही न ठके । आचरता ।। 526।।
परि हे मिया केले , । कीं , हे माझेनि सिद्धी गेले ।
ऐसे नाही ठेविले । वासनेमाजी ।। 527।।
जैसे अवचितपणे । वायूसि सर्वत्र विचरणे ।
की , निरभिमान उदैजणे । सूर्याचे जैसे ।। 528।।
कां , श्रुति स्वभावतां बोले , । गंगा काजेवीण चाले , ।
तैसें , अवष्टंभहीन [2] भले । वर्तणे जयाचे ।। 529।। 2 अष्टसात्विक भाव विहीन
ऋतुकाळी तरी फळती , । परी , फळलो हे नेणती ।
तया वृक्षांचिये ऐसी वृत्ती । कर्मी सदा ।।530।।
एवं,मनी,कर्मी,बोली,। जेथ अहंकारा उखी [3] जाहली । 3 हकालपट्टी
एकावळीची [4] काढिली । दोरी जैसी ।। 531।। 4 एकपदरी माळ
संबंधेवीण जैसी । अभ्रे असती आकाशी ।
देही कर्मे तैसी । जयासि गा ।। 532।।
मद्यपाआंगीचे वस्त्र । कां , लेपाहातीचे [5] शस्त्र । 5 चित्र
बैलावरी शास्त्र । बांधले आहे ।। 533।।
तया पाडे देही । जया , मी आहे , हे सेचि [6] नाही । 6 आठवण
निरहंकारता पाही । तया नांव ।। 534।।
हे संपूर्ण जेथे दिसे । तेथेचि ज्ञान असे ।
इयेविषयी अनारिसे । बोलो नये ।। 535।।
जन्ममृत्युजरादुःखे । व्याधिवार्धक्यकलुषे ।
तिये आंगा न येता , देखे । दुरूनि जो ।। 536।।
साधकु विवसिया [7] । कां , उपसर्गु [8] योगिया । 7 हडळ 8 विघ्न
पावे उणेयापुरेया , । वोथंबा [9] जेवी ।। 537।। 9 वोळंबा
वैर जन्मांतरीचे । सर्पा , मनौनि न वचे ।
तेवी अतीता [10] जन्माचे । उणे , जो वाहे ।। 538।। 10 मागील
डोळा हरळ न विरे , । घाई कोत [11] न जिरे , । 11 शस्त्राचे टोक
तैसें , काळीचे न विसरे । जन्मदुःख ।। 539।।
म्हणे , पुयगर्ते रिगाला । अहा !, मूत्ररंध्रे निघाला , ।
कटा रे [12] ! मियां चाटिला । कुचस्वेदु ! ।।540।। 12 हाय, हाय

ऐसऐसिया परी । जन्माचा कांटाळा धरी ।
म्हणे , आतां , ते मी न करी । जेणे ऐसे होय ।। 541।।
हारी उमचावया [1] । जुंवारी जैसा ये डाया । 1 हारलेले परत मिळवण्याकरता
की , वैरा बापाचेया , । पुत्र जचे ।। 542।।
मारिलियाचेनि रागे । पाठीचा जेवी सूड मागे ।
तेणे आक्षेपे [2] लागे । जन्मापाठी ।। 543।। 2 हट्टाने
परी जन्मती ते लाज । न सांडी , जयाचे निज ।
संभाविता निस्तेज [3] । न जिरे जेवी ।। 544।। 3 अपमान
आणि मृत्यु पुढां आहे । तोचि कल्पांती कां , पाहे ! ।
परी , आजीचि होये । सावधु जो ।। 545।।
माजी अथांव [4] म्हणतां , ।थडियेचि पंडुसुता ! । 4 खोल पाणी
पोहणारा आइता [5] । कासे [6] जेवी ।। 546।। 5 तयारी 6 बळकट करणे
कां , न पवतां रणाचा ठावो , । सांभाळिजे जैसा आवो [7] । 7 डौल
वोडण सुईजे [8] , घावो । न लागताचि ।। 547।। 8 ढाल पुढे करणे
पाहेचा पेणा [9] वाटवधा [10]। तंव आजीची , होइजे सावधा । 9 उद्याचे मुक्कामी 10 वाटमारी
जीवु न वचतां , औषधा । धांविजे जेवी ।। 548।।
येऱ्हवी ऐसे घडे । जो जळत घरी सांपडे ।
तो मग न पवाडे [11] । कुहा [12] खणो ।। 549।। 11 समर्थ 12 विहीर
चोंढिये [13] पाथरु [14] गेला , । तैसेनि ,जो बुडाला । 13 खोल पाण्यात 14 दगड
तो बोंबेहीसकट निमाला । कोण सांगे ? ।।550।।
म्हणौनि , समर्थेसी वैर । जया पडिले हाडखाइर [14] । 14 हाडवैर
तो जैसा आठही पाहर । परजून असे ।।551।।
**नातरी , केळवली [15] नोवरी । कां , संन्यासी जियापरी ।** 15 लग्न ठरलेली मुलगी
**तैसा , न मरता जो करी , । मृत्युसूचना ।।552।।**
पै गा ! जो ययापरी । जन्मेचि , जन्म निवारी ।
मरणे , मृत्यु मारी , । आपण उरे ।।553।।
तया घरी ज्ञानाचे । सांकडे नाही साचे ।
जया जन्ममृत्युचे । निमाले शल्य ।।554।।
आणि तयाचिपरी , जरा । न टेकतां शरीरा , ।
तारुण्याचिया भरा- ।माजी , देखे ।।555।।
म्हणे , आजिच्या अवसरी , । पुष्टी जे शरीरी , ।
ते पाहे होईल काचरी , । वाळली जैसी ।।556।।
निदैव्याचे व्यवसाय , । तैसे , ठाकती हातपाय , ।
अमंत्र्या राजाची परी आहे , । बळा यया ।।+557।।

| | |
|---|---|
| फुलांचिया भोगा-। लागी प्रेम , टांगा ,[1] । | 1 मस्तकाला |
| ते , करेयाचा [2] गुडघा , । तैसे होईल ।।558।। | 2 उंटाचा |
| वोढाळाच्या [3] खुरी , । आखरुआते बुरी [4] । | 3 उनाड जनावर |
| ते दशा माझ्या शिरी । पावेल गा ।।559।। | 4 गोठ्यातील घाण |
| पद्मदळेसी , इसाळे [5] । भांडताति हे डोळे , । | 5 इर्शेने |
| ते होती पडवळे ।पिकली जैसी ।।560।। | |
| भंवईची पडळे [6] । वोमथती सिनसाळे [7] । | 6 पडदा 7 जुन्या सालीसारखी |
| उरु कुहिजैल , जळे । आंसुवाचेनि ।।561।। | लोंबतात |
| जैसे , बाभुळीचे खोड । गिरबडूनि [8] जाती सरड [9] । | 8 चिकट होतात 9 सरडा |
| तैसें , पिचडी [10] तोंड । सरकटिजैल [11] ।।562।। | 10 थुंकी 11 चिकट होईल |
| रांधवणी चुलीपुढे , । पऱ्हे [12] उन्मादती [13] खातवडे [14] । | 12 खळग्यात 13 बुडबुडे |
| तैसीचि , ये नाकाडे । बिडबिडती ।। 563।। | येतात 14 दुर्गंधीयुक्त उकीरडा |
| तांबूले वोठ राऊं [15] ! । हांसता दांत दाऊं ! । | 15 रंगवणे |
| सनागर [16] मिरऊ । बोल जेणे ।।564।। | 16 चांगले |
| तयाचि पाहे , या तोंडा । येईल जळंबटाचा [17] लोंढा । | 17 कफ |
| इया उमळती दाढा । दांतांसहित ।। 565।। | |
| कुळवाडी रिणे दाटली । कां , वांकडिया [18] ढोरे बैसली । | 18 झडीचा पाऊस |
| तैसी , नुठी काही केली । जीभचि हे ।।566।। | |
| कुसळे कोरडी । वारेने जाती बरडी [19] । | 19 माळरान |
| तैसी आपदा तोंडी । दाढीयेसी ।।567।। | |
| आषाढीचेनि जळे । जैसी झिरपती शैलांची मौळे [20] । | 20 शीखरे |
| तैसे , खांडीहूनि [21] लाळे । पडती पूर ।। 568।। | 21 दातांच्या फटीतून |
| वाचेसि अपवाडु [22] । कानी अनुघडु [23] । | 22 असमर्थ 23 दडे बसणे |
| पिंड गुरुवा [24] माकडु । होईल हा ।। 569।। | 24 मोठ्या |
| तृणाचे बुझवणे । आंदोळे वारेनगुणे । | |
| तैसे येईल कांपणे । सर्वांगासी ।। 570।। | |
| पायां पडती वेंगडी [25] । हात वळती मुरकुंडी [26] । | 25 पायात पाय अडकणे |
| बरवेपणा बांगडी [27] । नाचविजैल ।। 571।। | 26 वेडेवाकडे होणे 27 सोंग |
| मळमूत्रद्वारे । होऊनि ठाती खोकरे [28] । | 28 फुटकी |
| नवसिये होती इतरे । माझिया निधनी ।।572।। | |
| देखोनि थुंकिल जगु । मृत्युचा पडैल पांगु । | |
| सोइरिया उबगु । येईल माझा ।। 573।। | |
| स्त्रिया म्हणती विवसी [29] । बाळे जाती मूर्च्छी । | 29 पिशाच्च |
| किंबहुना, चिळसी [30] । पात्र होईन ।। 574।। | 30 कीळस |

उभळीचा [1] उजगरा [2] । सेजारियां साइलिया [3] घरा ।
शिणवील म्हणती म्हातारा । बहुतांते हा ।। 575।।
ऐसी वार्धक्याची सूचणी [4] । आपणिया तरुणपणी ।
देखे , मग मनी विटे । जो गा ! ।। 576।।
म्हणे , पाहे हे येईल , । आणि आतांचे भोगितां जाईल ।
मग काय उरेल । हितालागी ? ।।577।।
म्हणौनि , नाइकणे पावे । तंव आईकोनि घाली आघवे ।
पंगु न होतां जावे । तेथ जाय ।।578।।
दृष्टी जंव आहे । तंव पाहावे तेतुले पाहे ।
मूकत्वा आधी वाचा वाहे । सुभाषिते ।। 579।।
हात होती खुळे । हे पुढील मोटके कळे ।
तंव करूनि घाली सकळे । दानादिके ।। 580।।
ऐसी दशा येईल पुढे । तै , मन होईल वेडे ।
तंव चिंतूनि ठेवी चोखडे । आत्मज्ञान ।। 581।।
जे चोर पाहे झोंबती । तंव आजीचि रुसिजे [5] संपत्ती ।
कां , झांकाझांकी , वाती । नवचतां कीजे ।। 582।।
तैसें , वार्धक्य यावे । मग जे वायां जावे ।
ते , आतांचि आघवे । सवते [6] करी ।। 583।।
आतां , मोडूनि ठेली दुर्गे । कां , वळित धरिले [7] खगे ।
तेथ उपेक्षूनि [8] जो निघे । तो नागवला की !।। 584।।
तैसे , वृद्धाप्य होये ,। आलेपण [9] , ते वाया जाये ।
जे ,तो शतवृद्ध आहे , । नेणो कैचा ? ।।+585।।
झाडिलीची कोळे [10] झाडी , । तया न फळे जेवी बोंडी ।
जाहला अग्नि , तरी राखोंडी । जाळील काई ?।। 586।।
म्हणौनि , वार्धक्याचेनि आठवे । वार्धक्या जो नागवे ।
तयाच्या ठायी जाणावे । ज्ञान आहे ।। 587।।
तैसेचि , नाना रोग । पडिघाती [11] ना जंव पुढांआंग , ।
तंव , आरोग्याचे उपेग । करूनि घाली ।। 588।।
सपाच्या तोंडी । पडली जे उंडी ।
ते , लावूनि सांडी । प्रबुद्ध जेसा ।। 589।।
तैसा , वियोगे जेणे दुःखे , । विपत्ति , शोक , पोखे ।
ते स्नेह सांडूनि , सुखे । उदासु होय ।। 590।।
आणि जेणे , जेणे कडे । दोष सूतील तोंडे ।
तया कर्मरंध्री गुंडे । नियमाचे दाटी ।। 591।।

1 खोकल्याची ढास 2 जागरण
3 निजलेल्या
4 इशारा
5 दूर करणे
6 वेगळे
7 पक्षी परत फिरतात
8 अव्हेरून
9 जन्माला आल्याचे व्यर्थ होईल
10 तीळ काढलेले झाड
11 प्राप्त होणे

ऐसऐसिया आइती [1]। जयाची परी असती ।
तोचि तो ज्ञानसंपत्ती । गोसावी गा ।।592 ।।
आतां , आणीकही एक । लक्षण अलौकिक ।
सांगेन , आइक । धनंजया ! ।। 593।।

1 तयारी

**असक्तिरनभिष्वंगः पुत्रदारगृहादिषु ।**
**नित्यं च समचित्तत्वमिष्टानिष्टोपपत्तिषु ।। 9।।**

**कर्माचे ठायी अनासक्ति, बायकामुले व घर इत्यादिकांत लंपट न होणे, इष्ट किंवा अनिष्ट प्राप्त झाले तरी नेहमी चित्ताची एकसारखी वृत्ति असणे ,**

तरी जो देहावरी । उदासु ऐसिया परी ।
उखिता [2] जैसा बिढारी [3] । बैसला आहे ।। 594।।
कां , वृक्षाची साउली । वाटे जाता मीनली [4] ।
घरावरी तेतुली । आस्था नाही ।। 595।।
साउली सरिसीच [5] असे । परी असें , हे नेणिजे जैसे ।
स्त्रियेचे तैसे । लोलुप्य नाही ।। 596।।
आणि प्रजा जे जाली । तिये वस्ती कीर आली ।
कां , गोरुवे [6] बैसली । रुखातळी ।। 597।।
जो संपत्तीमाजी असतां । ऐसा गमे पंडुसुता ! ।
जैसा कां वाटे जाता । साक्षी ठेविला ।। 598।।
किंबहुना , पुंसा । पांजरियामाजी जैसा , ।
वेदाज्ञेसी तैसा । बिहूनि असे ।। 599।।
येऱ्हवी दारागृहपुत्री । नाही जया मैत्री ।
तो जाण पां , धात्री । ज्ञानासि गा ! ।। 600।।
महासिंधु जैसे । ग्रीष्मवर्षी सरिसे ।
इष्टानिष्ट तैसे ।जयाच्या ठायी ।। 601।।
कां , तिन्ही काळ होतां , । त्रिधा नव्हे सविता ।
तैसा सुखदुःखी चित्ता । भेदु नाही ।। 602।।
जेथ नभाचेनि पाडे । समत्वा उणे न पडे ।
तेथ ज्ञान रोकडे । वोळख तूं ।।+603।।

2 वाटसरु 3 घर
4 मिळाली
5 बरोबर सोबतीला असते
6 गुरे

**मयि चानन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी ।**
**विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि ।। 10 ।।**

**आणि माझ्या ठायी अनन्यभावाने न ढळणारी भक्ति ' विविक्त ' म्हणजे निवडक किंवा एकान्त जागी राहाणे, सामान्य जनांचा चव्हाटा न आवडणे .**

आणि मीवाचूनि काही । आणिक गोमटे नाही ।
ऐसा निश्चयोचि तिही । जयाचा केला ।। 604।।
शरीर , वाचा , मानस ,। पियाली कृतनिश्चयाचा कोश ।
एक मीवाचूनि वास । न पाहती आन ।। 605।।
किंबहुना , निकट निज । जयाचे जाहले मज ।
तेणे आपणयां आम्हां सेज । एकी केली ।। 606।।
रिगता वल्लभापुढे , । नाही आंगी जीवी सांकडे ।
तिये कांतेचेनि पाडे । एकसरला [1]जो ।। 607।। 1 एकसारखा झाला
मिळोनि मिळतचि असे , । समुद्री गंगाजळ जैसे ।
मी होऊनि , मज तैसे । सर्वस्वे भजती ।। 608।।
सूर्याच्या होण्या होइजे , । कां , सूर्यासवेचि जाइजे ।
हे विकलेपण [2] साजे [3] । प्रभेसि जेवी ।। 609।। 2 पराधीनपणा 3 शोभे
पै , पाणियाचिये भूमिके । पाणी तळपे कौतुके ।
ते लहरी म्हणती लौकिके । येऱ्हवी ते पाणी ।। 610।।
जो अनन्यु यापरी । मी जाहलाही माते वरी ।
तोचि तो मूर्तधारी । ज्ञान पै गा ! ।।611।।
आणि तीर्थे , धौते , तटे , । तपोवने चोखटे , ।
आवडती कपाटे [4] । वसवूं जया ।। 612।। 4 दरी
शैलकक्षांची कुहरे , । जळाशय परिसरे , ।
अधिष्टी जो आदरे , । नगरा नये ।। 613।।
बहु एकांतावरी प्रीती , । जया जनपदाची खंती ।
जाण मनुष्याकारे मूर्ती । ज्ञानाची तो ।। 614।।
आणिकही पुढती । चिन्हे गा सुमती ! ।
ज्ञानाचिये निरुति- । लागी सांगो ।। 615।।

**अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम् ।**
**एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा ।। 11।।**

**अध्यात्मज्ञान नित्य आहे अशी बुद्धि होणे, व तत्त्वज्ञानाच्या सिद्धान्तांचे परिशीलन, यांस ज्ञान म्हटले आहे. याखेरीज जे दुसरे ते अज्ञान होय.**

तरी परमात्मा ऐसे । जे एक वस्तु असे ।
ते जया दिसे । ज्ञानास्तव ।। 616।।
ते एकवाचूनि आने । जिये भवस्वर्गादि ज्ञाने ।
ते अज्ञान , ऐसा मने । निश्चयो केला ।। 617।।

स्वर्गा जाणे हे सांडी । भवविषयी कान झाडी ।
दे अध्यात्मज्ञानी बुडी । सद्भावाची ।।618।।
भंगलिये [1] वाटे । शोधूनियां अव्हांटे [2] । 1 फाटे फुटलेल्या 2 आडमार्ग
निघिजे जेवी नीटे । राजपंथे ।। 619।।
तैसे ज्ञानजातां करी । आघवेचि एकीकडे सारी ।
मग मन बुद्धि मोहरी । अध्यात्मज्ञानी ।। 620।।
म्हणे , एक हेच आथी , । येर जाणणे ते भ्रांती , ।
ऐसी निकुरेसी [3] मती । मेरु होय ।। 621।। 3 निश्चयासाठी
एवं निश्चयो जयाचा । द्वारी अध्यात्मज्ञानाचा ।
ध्रुव देवो गगनीचा । तैसा राहिला ।। 622 ।।
तयाचिया ठायी ज्ञान , । या बोला , नाही आन ।
जे , ज्ञानी बैसले मन । तेव्हांचि ,ते , तो ,मी ।। 623।।
तरी बैसलेपणे जे होये । बैसतांचि ,बोले न होये [4] । 4 म्हणता येणार नाही
तरी , ज्ञाना तया आहे । सरिसा , पाडु ।। 624।।
आणि तत्वज्ञान निर्मळ । फळे जे एक फळ ।
ते ज्ञेयही वरी सरळ । दिठी जया ।। 625।।
येऱ्हवी , बोधा आलेनि ज्ञाने , । जरी ,ज्ञेय न दिसेचि मने , ।
तरी ज्ञानलाभुही न मने , । जाहला सांता ।। 626।।
आंधळेनि हाती दिवा । घेऊनि काय करावा ? ।
तैसा , ज्ञाननिश्चयो आघवा । वायांचि जाय ।। 627।।
जरि ज्ञानाचेनि प्रकाशे । परतत्त्वी दिठी न पैसे [4] । 5 पोचणे
ते स्फुर्तीचि असे । अंध होऊनी ।। 628।।
म्हणौनि , ज्ञान जेतुले दावी , । तेतुली , वस्तुचि आघवी , ।
ते देखे , ऐशी व्हावी । बुद्धि ,चोख ।। 629।।
यालागी ज्ञाने निर्दोखे । दाविले ज्ञेय देखे ।
तैसेनि उन्मेखे । आथिला जो ।। 630।।
जेवढी ज्ञानाची वृद्धी , । तेवढीच , जयाची बुद्धी ।
तो ज्ञान , हे शब्दी । करणे न लगे ।। 631।।
पै , ज्ञानाचिये प्रभेसवे । जयाची मती ज्ञेयी पावे ।
तो हातधरणिया [6] शिवे । परतत्त्वाते ।। 632।। 6 हातोहात
तोचि ज्ञान , हे बोलता । विस्मयो कवण पंडुसुता ? ।
काय सवितयाते , सविता । म्हणावे असे ! ।।633।।
तंव , श्रोते म्हणती , ' असो ; । न सांगे तयाचा अतिसो ।
ग्रंथोक्ती , तेथ आडसो [7] । घालितोसी कां ? ।। 634।। 7 अडथळा

तुझा हाचि आम्हा थोरु । वक्तृत्वाचा पाहुणेरु , ।
जे ज्ञानविषो फारु ,। निरोपिला ।। 635।।
रसु होआवा अतिमात्रु [1] , । हा घेतासि कविमंत्रु, । 1 पाल्हाळ लवतोस
तरि , अवंतूनि शत्रु , । करितोसि कां गा ? ।।636।।
ठायी बैसतिये वेळे , । जें , रससोय घेऊनि पळे , ।
तियेचा , येरु वोडव [2] मिळे । कोणा अर्था ? ।।637।। 2 इतर आदरसत्कार
आघवाचि विषयी भादी [3] , । परी सांजवणी [4] टेको नेदी । 3 चांगली 4 दूध काढावयाला
ते खुरतोडे [5] नुसधी , । पोषी कवण ?।। 638।। 5 लाथाळ गाय
तैसी,ज्ञानी मती न फांके ,। येर ,जल्पती नेणो केतुके , ।
परि ते असो ; निके । केले तुवां ।।639।।
जया ज्ञानलेशोद्देशे [6] । किजती योगादि सायासे । 6 ज्ञानाच्या एका थेंबाकरता
ते धणीचे [7] आथी तुझिया ऐसे । निरुपण ।। 640।। 7 तृप्तीने
अमृताची सातवांकुडी [8] । लागो कां अनुघडी [9] । 8 सतत सात दिवस झड
सुखाच्या दिवसकोडी । गणिजतु कां ? ।।641।। 9 एकसारखी
पूर्णचंद्रेसी राती । युग एक असोनि , पहाती ,।
तरी काय न पाहात आहाती । चकोर ते ? ।।642।।
तैसें , ज्ञानाचे बोलणे , । आणि येणे रसाळपणे , ।
आतां , पुरे कोण म्हणे ! । आकर्णिता ? ।। 643।।
आणि सभाग्यु पाहुणा ये , । सुभगाचि वाढती होये , ।
तै , सरो नेणे रससोये[10] । ऐसे आथी ।। 644।। 10 स्वयंपाक करणे थाबतच नाही
तैसा जाहला प्रसंगु । जे ज्ञानी आम्हांसि लागु ।
आणि तुजही अनुरागु । आथी तेथ ।। 645।।
म्हणौनि,यया वाखाणा-।पासी [11] से आली चौगुणा [12]। 11 निरुपणामध्ये 12 चौपट स्पूर्ती आली
ना म्हणो नयेसि , देखणा । होसी [13] , ज्ञानी ।। 646।। 13 डोळस आहेस
तरी आतां , ययावरी । प्रज्ञेच्या माजघरी ।
पदे साच करी । निरुपणी ' ।।647।।
या , संतवाक्यासरिसे । म्हणतिले निवृत्तिदासे ।
' माझेहि जी ऐसे । मनोगत ।।648।।
यावरी आता तुम्ही । आज्ञापिला स्वामी ।
तरी वायां वागू मी ? । वाढो नेदी '' ।। 649।।
एवं , इये अवधारा । ज्ञानलक्षणे अठरा ।
श्रीकृष्णे धनुर्धरा । निरूपिली ।। 650।।
मग म्हणे , या नांवे । ज्ञान एथ जाणावे ।
हे स्वमत , आणि आघवे । ज्ञानियेही , म्हणती ।। 651।।

करतळावरी वाटोळा । डोलतु देखिजे आंवळा ।
तैसें , ज्ञान आम्ही डोळा , । दाविले तुज ।। 652।।
आतां , धनंजया ! महामती ! । अज्ञान ऐसी वदंती ।
तेही सांगो व्यक्ती , । लक्षणेसी ।। 653।।
येऱ्हवी , ज्ञान फुडे जालिया । अज्ञान जाणवे धनंजया ! ।
जे ज्ञान नव्हे , ते अपैसया , । अज्ञानचि ।। 654।।
पाहे पां ! दिवसु आघवा सरे , । मग रात्रीची वारी उरे , ।
वाचूनि , काही तिसरे । नाही जेवी ।। 655।।
तैसें , ज्ञान जेथ नाही , । तेचि अज्ञान पाही , ।
तरी सांगो , काही काही । चिन्हे तिये ।। 656।।
तरी , संभावने [1] , जिये । जो मानाची वाट पाहे , । 1 प्रतिष्टेसाठी
सत्कारे होये , । तोषु जया ।। 657।।
गर्वे , पर्वताची शिखरे , । तैसा , महत्त्वावरूनि नुतरे ।
तयाचिया ठायी पुरे , । अज्ञान आहे ।। 658।।
आणि , स्वधर्माची मांगळी [2] । बांधे , वाचेच्या पिंपळी [3] । 2 सुंभाची दोरी 3 पिंपळाचे तोरण
उभिला जैसा , देउळी । जाणोनि कुंचा ।।+659।।
घाली विद्येचा पसारा , । सुये , सुकृताचा डांगोरा , ।
करी , तेतुले मोहरा । स्फीतीचिया [4] ।। 660।। 4 किर्तीकरता
आंग वरिवरी चर्ची , । जनाते अभ्यर्चितां [5] वंची , । 5 पूजा पाठाने
जो जाण पां ! अज्ञानाची । खाणी एथ ।।661।।
आणि,वन्ही वनी विचरे [6] । तेथ जळती जैसी जंगमे,स्थावरे । 6 पसरणे
तैसें , जयाचेनि आचारे , । जगा दुःख ।।662।।
कौतुके जे जे जल्पे । ते साबळाहूनि [7] तीख रुपे । 7 भाला
विषाहूनि संकल्पे , । मारकु जे ।। 663।।
तयाते बहु अज्ञान । तो अज्ञानाचे निधान ।
हिंसेसि आयतन [8] । जयाचे जिणे ।। 664।। 8 घर
आणि , फुंके , भाता फुगे , । रेचिलिया , सवेचि उफगे , ।
तैसा , संयोगवियोगे । चढे , वोहटे ।। 665।।
पडली वारयाचिया वळसा , । धुळी चढे आकाशा , ।
हरिखा वळघे [9] तैसा , । स्तुतीवेळे ।। 666।। 9 स्तुतीने चढून जातो
निंदा मोटकी [10] आइके , । आणि , कपाळ धरूनि ठाके , । 10 अल्प
थेंबे विरे , वारेनि शोखे , । चिखलु जैसा ।। 667।।
तैसा , मानापमानी होये । जो कोण्हीचि उर्मी न साहे ।
तयाच्या ठायी आहे । अज्ञान पुरे ।।668।।

आणि जयाचिया मनी गांठी , । वरिवरी मोकळी वाचा , दिठी , ।
आंगे मिळे जीवे , पाठी , । भलतया दे ।। 669।।
व्याधाचे चारा घालणे , । तैसें , प्रांजळ जोगावणे [1] । 1 पोसणे
चांगाची अंतःकरणे । विरु [2] करी ।। 670।। 2 विरुद्ध करणे
गार शेवाळे गुंडाळली , । कां , निंबोळी जैसी पिकली , ।
तैसी , जयाची भली । बाह्य क्रिया ।। 671।।
अज्ञान तयाचिया ठायी । ठेविले असे पाही ।
या बोला आन नाही , । सत्य मानी ।। 672।।
आणि , गुरुकुळी लाजें , । जो गुरुभक्ती उभजे [3] । 3 खेद वाटतो
विद्या घेऊनि माजे । गुरुसीचि जो ।। 673।।
तयाचे नाम घेणे , । ते वाचे शुद्रान्न होणे ।
परी घडले , लक्षणे । बोलता इये ।। 674।।
आतां , गुरुभक्तांचे नांव घेवो , । तेणें , वाचेसि प्रायश्चित देवो ।
गुरुसेवका नांव पावो , । सुर्यु जैसा ।। 675।।
येतुलेनि पांगु [4] पापाचा । निस्तरेल हे वाचा । 4 हीनपणा
जो गुरुतल्पगाचा [5] । नामी जाला ।। 676।। 5 गुरुनिंदक
हा ठायवरी [6] । तया नामाचे भय हरी । 6 इतका
मग म्हणे अवधारी । आणिके चिन्हे ।। 677।।
तरि , आंगे , कर्मे ढिला , । जो मने विकल्पे भरला , ।
अडवीचा [7] अवगळला [8] । कुहा जैसा ।। 678।। 7 अरण्यातील 8 त्याग केलेली
तया तोंडी कांटिवडे । आंतु नुसधी हाडे ।
अशुचि तेणे पाडे । सबाह्य जो ।। 679।।
जैसे , पोटालागी , सुणे । उघडे , झांकले , न म्हणे ।
तैसें , आपले , परावे , नेणे । द्रव्यालागी ।। 680।।
इया ग्रामसिंहाचिया [9] ठायी । जैसा मिळणी ठावो अठावो नाही [10] । 9 कुत्रे 10 संगाला योग्य,अयोग्य जागा
तैसा , स्त्रीविषयी काही । विचारीना ।। 681।।
कर्माचा वेळु चुके , । कां , नित्य नैमित्तिक ठाके , ।
ते जया न दुखे । जीवामाजी ।। 682।।
पापी जो निसुगु । पुण्याविषयी अतिनिलागु ।
जयाचिया मनी वेगु । विकल्पाचा ।। 683।।
तो जाण निखिळा । अज्ञानाचा पुतळा ।
जो बांधोनि असे डोळा । वित्ताशेते [11] ।।684।। 11 धनाकडे
आणि स्वार्थे अळुमाळे । जो धैर्यापासोनि चळे ।
जैसे , तृणबीज ढळे । मुंगियेचेनि ।। 685।।

पावो सुदलिया [1] सवे , । जैसे थिल्लर कालवे [2] ,।
तैसा , भयाचेनि नांवे । गजबजे जो ।। 686।।
मनोरथांचिया धारसा [3] । वाहणे जयाचिया मानसा ।
पूरी पडिला जैसा , । दुधिया , पाही ।। 687।।
वायूचेनि सावाये । धू [4] दिगंतरा जाये ।
दुःखवार्ता होये । तैसे जया ।। 688।।
वाउधणाचिया [5] परी । जो आश्रो कहीचि न धरी ।
क्षेत्री , तीर्थी , पुरी , । थारो नेणे ।। 689।।
कां , मातलिया सरडा । पुढती बुडुख , पुढती शेंडा , ।
हिंडणवारा [6] कोरडा । तैसा जया ।। 690।।
जैसा , रोविल्याविणे , । रांजणु थारो नेणे , ।
तैसा , पडे तै राहणे , । एऱ्हवी , हिंडे ।। 691।।
तयाच्या ठायी उदंड । अज्ञान असे वितंड ।
जो चांचल्ये भावंड । मर्कटाचे ।। 692।।
आणि , पै गा धनुर्धरा ! । जयाचिया अंतरा ।
नाही वोढावारा [7] । संयमाचा ।। 693।।
लेंडिये [8] आला लोंढा । न मनी , वाळुवेचा वरवंडा ।
तैसा निषेधाचिया तोंडा । बिहेना जो ।। 694।।
व्रताते आड मोडी । स्वधर्मु पाये वोलांडी ।
नियमाची आस तोडी । जयाची क्रिया ।। 695।।
नाही पापाचा कंटाळा । नेणे पुण्याचा जिव्हाळा ।
लाजेचा पेंडवळा [9] । खणोनि घाली ।।696।।
कुळेसी जो पाठमोरा । वेदाज्ञेसी दुऱ्हा [10] ।
कृत्याकृत्यव्यापारा । निवाडु नेणे ।। 697।।
वसू [11] जैसा मोकाटु । वारा जैसा अफाटु ।
फुटला जैसा पाटु । निर्जनी [12] ।।698।।
आंधळे हातिरु मातले । कां , डोंगरी जैसे पेटले ।
तैसे विषयी सुटले । चित्त जयाचे ।। 699।।
पै,उबधडां [13] काय न पडे?। मोकाटु कोणा नातुडे [14] ? ।
ग्रामद्वारीचे आडे [15] । नोलांडी कोण ? ।।700।।
जैसे , सत्री अन्न जाले । कीं, सामान्या [16] बीक [17] आले ।
वाणसियेचे [18] उभले [19] । कोण न रिगे ? ।।701।।
तैसे जयाचे अंतःकरण । तयाच्या ठायी संपूर्ण ।
अज्ञानाची जाण । ऋद्धि आहे ।। 702।।

1 घातल्यावर 2 डबके
3 धारेत
4 धूर
5 वावटळ
6 निश्फळ भ्रमण करणारा
7 धरबांध
8 ओहोळ
9 मर्यादा
10 दूर
11 पोळ
12 अरण्यात
13 उकीरड्यावर 14 न सापडणे
15 वैश्येचा उंबरठा
16 वैश्येला 17तारुण्य आलें कीं
कोणीहा लुटावे 18 वाण्याचा
19 उंबरठा

आणि विषयांची गोडी । जो जीतु , मेला न संडी ।
स्वर्गीही  खावया जोडी । येथूनिची ।। 703।।
जो अखंड भोगा जचे । जया व्यसन काम्यक्रियेचे ।
मुख देखोनि विरक्ताचे । सचैल [1] करी ।। 704।।
विषो शिणोनि जाये , । परी , न शिणे , सावधु नोहे , ।
कुहीला [2] हाती खाये । कोढी [3] जैसा ।। 705।।
खरी [4]  टेको नेदी , उडे ।लातौंनि फोडे नाकाडे ।
तऱ्ही , जेवी न काढे । माघौता , खरु [5] ।।706।।
तैसा , जो विषयांलागी । उडी घाली जळतिये आगी ।
व्यसनाची आंगी । लेणी मिरवी ।। 707।।
फुटोनि पडे , तवं । मृग वाढवी हांव ।
परी न म्हणे ते माव [6] । रोहिणीची [7] ।।708।।
तैसा , जन्मोनि मृत्युवरी । विषयी त्रासितां बहुती परी ।
तऱ्ही , त्रासु नेघे , धरी । अधिक प्रेम ।। 709।।
पहिलिये बाळदशे , । आई ,बा , हेचि पिसे , ।
ते सरे , मग स्त्रीमांसे । भुलोनि ठाके ।। 710।।
मग स्त्री भोगिता थांवो , । वृद्धाप्य लागे येवो ।
तेंव्हा तोचि प्रेमभावो, । बाळकांसि आणी ।।711।।
आंधळे व्याले   जैसे , । तैसा,  बाळे परिवसे [8] ।
परी, जीवे मरे , तो न त्रासे । विषयाचि जो ।। 712।।
जाण , तयाच्या ठायी । अज्ञानासि , पारु नाही ।
आतां , आणीक काही । चिन्हे सांगो ।। 713।।
तरी , देह हाचि आत्मा , । ऐसेया , जो मनोधर्मा ।
वळघोनिया [9] , कर्मा । आरंभु करी ।। 714।।
आणि , उणे , कां पुरे । जे जे काही आचरे ।
तयाचेनि आविष्करे , । कुंथो लागे ।।715।।
डोईये ठेविलेनि भोजे [10] । देवलविसे [11] जेवी फुंजे [12] ।
तैसा , विद्यावयसा माजें , । उताणा चाले ।। 716।।
म्हणे , मीचि एकु आथी , । माझ्याचि घरी संपत्ती ।
माझी आचरती रीती । कोणा आहे ! ।।717।।
नाही, माझेनि पाडे वाडु [13] । मी सर्वज्ञ एकचि रुढु ।
ऐसा , गर्वतुष्टीगंडु [14]। घेऊनि ठाके ।। 718।।
व्याधि लागलिया माणुसा , । नयेचि भोग दाऊ  जैसा , ।
निके[15] न साहे जो , तैसा । पुढिलांचे ।।719।।

1 सचैल स्नान
2 कुजलेले 3 कोड असलेला
4 गाढवीण
5 गाढव
6 भ्रांती  7 मृगजळ
8 मुलाबाळासकट राहतो
9 आरुढ होतो
10 मूर्ती 11 देवर्षी 12 फुगणे
13 समर्थ
14 गर्वाने व समाधानाने फुगणे
15 चांगले

| | |
|---|---|
| पै , गुण [1] तेतुला खाय । स्नेह [2] की जाळितु जाय । | 1 वात 2 तेल |
| जेथ ठेविजे , तेथ होय । मसी [3] ऐसे ।। 720।। | 3 काजळी |
| **जीवने [4] शिंपिला तिडपिडी [5] ,। विजिला [5] प्राण सांडी ,।** | 4 पाणी, 5 तडतड करणे |
| **लागला तरी , काडी । उरो नेदी ।। 721।।** | 6 वारा लागला |
| **आळुमाळ प्रकाशु करी । तेतुलेनीच उबारा धरी ।** | |
| **तैसिया दीपाचि परी , । सुविद्यु जो ।। 722 ।।** | |
| औषधाचेनि नांवे , अमृते [7] । जैसा नवज्वरु आंबुथे [8] । | 7 दूध 8 वाढतो |
| कां , विषचि होऊनि परते ,। सर्पा , दूध ।। 723।। | |
| तैसा , सद्‌गुणी मत्सरु , ।व्युत्पत्ती अहंकारु , । | |
| तपोज्ञाने अपारु । ताठा चढे ।। 724।। | |
| अंत्यु [9] राणिवे [10] बैसविला । आरे [11] धारणु [12] गिळिला । | 9 चांडाळ 10 राज्यावर |
| तैसा , गर्वे फुगला । देखसी जो ।। 725 ।। | 11 अजगर 12 खांब |
| जो लाटणे ऐसा , न लवे , । पाथरु तेवी , न द्रवे , । | |
| गुणियासि [13] नागवे [14] । फोडसे [15] जैसे ।। 726।। | 13 गारुडी 14 न आवरणे |
| किंबहुना , तयापाशी । अज्ञान आहे वाढीसी , । | 15 फुरसे |
| हे निकरे , गा तुजसी । बोलत असो ।। 727 ।। | |
| आणीकही धनंजया ! । जो गृहदेह सामग्रिया , । | |
| न देखे , कालचेया । जन्माते [16] , गा ! ।। 728।। | 16 मागील जन्माचा |
| कृतघ्ना उपकारु केला , ।कां , चोरा व्यवहारु दिधला , । | |
| निसुगु स्तविला । विसरे जैसा ।। 729।। | |
| वोढाळितां [17] लाविले [18] । ते ,तैसेच, कान, पूस [19], वोले । | 17 उनाडक्या करणारा |
| की पुढती वोढाळु आले । सुणे जैसे ।। 730।। | 18 तोडले 19 शेपुट |
| बेडुक , सापाचिया तोंडी । जातसे सबुडबुडी [20] , । | 20 सगळा |
| तो , मक्षिकांचिया कोडी [21] ,। स्मरेना काही ? ।। 731।। | 21 लोभ |
| तैसी , नवही द्वारे स्त्रवती , । आंगी देहाची लुती [22] जिती । | 22 कुष्ट |
| जेणे जाली , ते चित्ती । सलेना जया ।। 732।। | |
| मातेच्या उदरकुहरी । पचूनि विष्टेच्या दाथरी [23] । | 23 ढीगात |
| जठरी नवमासवरी । उकडला जो ।। 733।। | |
| ते गर्भीची जे व्यथा । कां , जे जाले उपजता , । | |
| ते काहीचि सर्वथा । नाठवी जो ।। 734।। | |
| मलमुत्रपंकीं , । जे लोळते बाळ अंकीं , । | |
| ते देखोनि , जो न थुंकी , । त्रासु नेघे ।। 735।। | |
| कालचि ना जन्म गेले , । पाहेचि , पुढती आले । | |
| ऐसे हे काही वाटले । नाही जया ।। 736।। | |

आणि , पै तयाची परी । जीविताचि फरारी [1] ।
देखोनि जो न करी । मृत्यचिंता ।। 737।।
जिणेयाचेनि विश्वासे , । मृत्यु एक एथ असें , ।
हे जयाचेनि मानसे । मानिजेना ।। 738।।
अल्पोदकीचा मासा । हे नाटे , ऐसिया आशा ।
न वचेचि [2] कां जैसा , । अगाध डोहां ।।739।।
कां , गोरीचिया [3] भुली । मृग , व्याधा दृष्टी न घाली ।
गळु न पाहतां , गिळिली । उंडी , मीने ।। 740।।
दीपाचिया झगमगा । जाळील , हे पतंगा ।
नेणवेचि , पै गा ! । जयापरी ।। 741।।
गव्हारु [4] निद्रासुखे , । घर जळत असे ते न देखे ।
नेणता , जेवीं, विखे । रांधिले अन्न ।। 742।।
तैसा , जीविताचेनि मिषे । हा मृत्युचि आला असे ।
हे नेणेचि , राजसे । सुखे जो गा ! ।। 743।।
शरीरीची वाढी , । अहोरात्रांची जोडी , ।
विषयसुखप्रौढी । साचचि मानी ।। 744।।
परी , बापुडा ऐसे नेणे , । जे वेश्येचे सर्वस्व देणे ।
तेचि ते नागवणे , । रुप एथ ।। 745।।
संवचोराचे साजणे [5] । तेचि ते प्राण घेणे ।
लेपा स्नपन [6] करणे । तोचि नाशु ।। 746।।
पांडुरोगे आंग सुटले , । ते ,तयाचि नांवे ,खुंटले [7] ।
तैसें , नेणे , भुलले । आहारनिद्रा ।। 747।।
सन्मुख शूला । धांवतया पाये चपळा , ।
प्रतिपदी ये जवळा । मृत्यु जेवी ।। 748।।
तेवी , देहा जंव जंव वाढु , । जंव , जंव दिवसांचा पवाडु [8] ।
जंव , जंव सुरवाडु [9] । भोगांचा या ।। 749।।
तंव , तंव अधिकाधिके । मरण आयुष्याते जिंके ।
मीठ जेवी उदके । घांसिजत असे ।। 750।।
तैसें , जीवित्व जाये । तयास्तव काळु पाहे ।
हे हातोहातीचे [10] , न होये । ठाउके जया ।। 751।।
किंबहुना , पांडवा ! । हा आंगीचा मृत्यु नित्य नवा ।
न देखे , जो मावा [11] । विषयांचिया ।। 752।।
तो अज्ञानदेशीचा रावो । या बोला महाबाहो ! ।
न पडे गा ! ठावो । आणिकाचा [12] ? ।। 753।।

1 भरभराट
2 सोडून जात नाही
3 पारध्याचे गोड गाणे
4 मूर्ख
5 सभ्यचोराची मैत्री
6 स्नान
7 ऱ्हास होणे
8 विस्तार
9 विपुलता
10 लवकर
11 भ्रांती
12 दुसरी कांहीं संज्ञा आठवते का?

पै , जीविताचेनि तोखे [1] । जैसा कां मृत्यु न देखे ।
तैसाचि , तारुण्ये पोखे [2] । जरा न गणी ।। 754।।
कडाडी [3] लोटला गाडा , । कां , शिखरौनि सुटला धोंडा , ।
तैसा न देखे , जो पुढा । वार्धक्य आहे ।। 755।।
कां,आडवोहळा पाणी आले । कां,जैसे म्हैसयाचे झुंज मातले ।
तैसें ,तारुण्याचे चढले । भुररे [4] जया ।। 756।।
पुष्टि लागे विघरो [5] । कांति पाहे निसरो ।
मस्तक आदरी [6] शिरो- । भागी कंप ।।757।।
दाढी साउळ [7] धरी , । मान , हालौनि वारी , [8] ।
तरी , जो करी । मायेचा पैसु [9] ।। 758।।
पुढील उरी आदळे । तंव न देखे , जेवी आंधळे ।
कां , डोळ्यावरले निगळे [10] । आळषी , तोषे ।।759।।
तैसें , तारुण्य आजिचे । भोगितां , वृद्धाप्य पाहेचे [11] ।
न देखे , तोचि साचें , । अज्ञानु गा ! ।। 760।।
देखे अक्षमे [12] , कुब्जे [13] । की , विटावूं [14] लागे , फुंजे ।
परी न म्हणे , पाहे [15], माझे । ऐसेचि भवे ।। 761।।
आणि , आंगी वृद्धाप्यतेची । संज्ञा [16] ये मरणाची , ।
परि , जया तारुण्याची । भुली , न फिटे ।। 762।।
तो अज्ञानाचे घर । हे साचचि घे उत्तर , ।
तेवीचि , परियेसी थोर । चिन्हें , आणिक ।। 763।।
तरि वाघाचिये अडवे [17] , । एक वेळ आला चरौनि दैवे , ।
तेणे विश्वासे , पुढती धावें , । वसू जैसा ।। 764।।
कां , सर्पघराआंतु , । अवचटे , ठेवा आणिला स्वस्थु [18] ।
येतुलियासाठी निश्चितु , । नास्तिकु होय ।। 765।।
तैसेचि , अवचटे हें , । एकदोनी वेळां लाहे , ।
एथ रोग एक आहे , । हे मानीना जो ।। 766।।
वैरिया नीद आली , । आंता द्वंद्वे [19] माझी सरली ।
हे मानी , तो सपिली[20] । मुकला जेवी ।। 767।।
तैसी , आहारनिद्रेची उजरी [21] । रोग निवांतु , जोवरी ।
तंव , जो न करी , । व्याधी चिंता ।। 768।।
आणि स्त्रीपुत्रादिमेळे । संपत्ति जंव , जंव फळे , ।
तेणे रजे [22] , डोळे । जाती जयाचे ।। 769।।
सवेचि [23] वियोगु पडैल , । विळौनि [24] विपत्ति येईल , ।
हे दुःख पुढील , । देखेना जो ।। 770।।

1 सुखाने
2 भराने
3 कड्यावरून
4 भुरळ
5 कमी होणे
6 सुरवात होते
7 पांढरी होते 8 नको म्हणते
9 विस्तार
10 चिपड
11 उद्या
12 आंधळा 13 कुबडा
14 वेडावणे 15 उद्या
16 खूण
17 अरण्यातून
18 सुरक्षितपणे
19 भांडण
20 पिल्लासकट
21 व्यवस्थितपणा
22 धूळ
23 तात्काळ 24 एका दिवसात

तो अज्ञान गा पांडवा ! । आणि , तोहि तोचि जाणावा , ।
जो , इंद्रिये अव्हासवा [1] । चारी एथ ।।771।। 1 हवे तसे
वयसेचेनि उवाये [2] , । संपत्तीचेनि सावाये [3] , । 2 तारुण्याचे उत्कर्षाने
सेव्यासेव्य जाये । सरकटितु [4] ।। 772।। 3 मदतीने 4 भरकटत जातो
न करावे , ते करी , । असंभाव्य , मनी धरी , ।
चिंतूं नये , ते विचारी । जयाची मती , ।।773।।
रिघे , जेथ न रिघावे , । मागे , जे न घ्यावे , ।
स्पर्शे , जेथ न लागावे , । आंग , मन , ।। 774।।
न जावे , तेथ जाये , । न पाहावे , ते जो पाहे , ।
न खावे , ते खाये , । तेवीचि तोषे , ।।775।।
न धराव , तो संगु , । न लागावे , तेथ लागु , ।
नाचरावा , तो मार्गु , । आचरे जो , ।।776।।
नायकावे , ते आइके , । न बोलावे , ते बके , ।
परि दोष होतील , हें , न देखे । प्रवर्तता ।।777।।
आंगा , मनासि , रुचावे । येतुलेनि , कृत्याकृत्य नाठवे , ।
जो , करणेयाचेनि नांवे , । भलतेचि करी , ।।778।।
परि पाप मज होईल , । कां , नरकयातना येईल , ।
हें , काहीचि पुढील । देखेना जो , ।।779।।
तयाचेनि आंगलगे । अज्ञान जगी दाटुगे , ।
जे , सज्ञानाहि संगे । झोंबो सके ।। 780।।
परी असो ; हे आइक । अज्ञान चिन्हे आणिक , ।
जेणे तुज सम्यक । जाणवे , ते ।। 781।।
तरी , जयाची प्रीती , पुरी । गुंतली देखसी घरी , ।
नवगंधकेसरी [5] । भ्रमरी , जैशी ।।782।। 5 नवीन उमलेल्या कमळाच्या केसरावर
साकरेचिया राशी । बेसली , नुठे माशी , ।
तैसेनि स्त्रीचित्त , आवेशी [6] । जयाचे मन ।। 783।। 6 व्यापून राहते
ठेला बेडुक कुंडी , । मशाक गुंतला शेंबुडी , ।
जैसा , ढोरु सबुडबडी [7] । रुतला पंकी ।। 784।। 7 सगळा
तैसें , घरीहूनि निघणे । नाही , जीवे , मने, प्राणे , ।
जया , साप होऊनि असणे । भाटी [8] , तिये ।।+ 785।। 8 माळरान
प्रियोत्तमाचिया कंठी । प्रमदा घे आटी [9] । 9 मीठी
तैशी , जीवेसी कोपटी [10] । धरूनि ठाके ।। 786।। 10 झोपडी
मधुरसोद्देशे । मधुकर जचे [11] जैसे । 11 श्रमणे
गृहसंगोपन तैसे । करी जो गा ।। 787।।

म्हातारपणी जाले । मा , आणिक एक विपाइले [1] ।
तयाचे कां जेतुले , । मातापितरां ।। 788।।
तेतूलेनि पाडे , पार्था ! । घरी जया प्रेम , आस्था ।
आणि , स्त्रीवाचूनि सर्वथा । जाणेना जो ।। 789।।
तैसा , स्त्रीदेही जो जीवे । पडोनिया सर्वभावे , ।
कोण मी ! काय करावे ? । काही नेणे ।। 790।।
महापुरुषाचे चित्त , । जालिया वस्तुगत [2] ।
ठाके व्यवहारजात , । जयापरी ।। 791।।
हानि , लाज न देखे , । परापवादु नाइके , ।
जयाची इंद्रिये एकमुखे । स्त्रिया केली , ।।792।।
चित्त आराधी स्त्रियेचे । आणि तियेचेनि छंदे नाचे ।
माकड गारुडियाचे । जैसे होय ।। 793।।
आपणपेही शिणवी , । इष्टमित्र दुखवी , ।
मग कवडाचि [3] वाढवी , । लोभी जैसा ।। 794।।
तैसा , दानपुण्ये खांची [4] , । गोत्रकुटुंबा वंची , ।
परी गारी भरी [5] स्त्रियेची । उणी हो , नेदी ।। 795।।
पूजिती दैवते जोगावी [6] । गुरुते बोले झकवी [7] ।
मायबापां दावी । निदारपण [8] ।। 796।।
स्त्रियेच्या तरी विखी [9] । भोगसंपत्ती अनेकी ।
आणी , वस्तु निकीं , । जे , जे देखे , । 797।।
प्रेमाथिलेनि भक्ते । जैसेनि भजिजे कुळदैवते , ।
तैसा , एकाग्रचित्ते । स्त्री जो उपासी ।।798।।
साच आणि चोख, । ते स्त्रियेसीचि अशेख [10] ।
येरांविषयी जोगावणुक [11] ! । तेही नाही ।।799।।
इयेते , हन , कोणी देखैल , । इयेसी वेखासे [12] जाईल , ।
तरी , युगचि बुडैल । ऐसे जया ।। 800।।
नायट्याभेणे , । न मोडिजे नागांची [13] आण ।
तैसी , पाळी उणखुण [14] । स्त्रियेची जो ।। 801।।
किंबहुना , धनंजया ! । स्त्रीचि सर्वस्व जया , ।
अणि तियेचिया जालिया- । लागी प्रेम ।।802।।
आणिकही जे समस्त । तियेचे संपत्तिजात [15] ।
ते जीवाहूनि आप्त । मानी जो कां ।।803।।
तो अज्ञानासी मूळ । अज्ञाना त्याचेनि बळ ।
हे असो; केवळ । तेचि रूप ।।804।।
आणि मातलिया सागरी , । मोकललिया तरी [16] , ।
लाटांच्या येरझारी , । आंदोळे जेवी , ।।805।।

1 एखादेच
2 ब्रह्मालीन
3 पैसा
4 कमी करणे
5 होसमौज
6 हेळसांड करणे 7 फसवणे
8 दरिद्रीपणा
9 विषयी
10 संपूर्ण
11 निर्वाहा पुरती देखील काळजी
12 विरुद्ध
13 देवीची
14 मनोगत
15 नातलग
16 मोकळी सोडलेली नाव

तेवी , प्रिय वस्तु पावे , । आणि , सुखे जो उंचावे ।
तैसाचि , अप्रियासवे , । तळवटु  घे ।। 806।।
ऐसेनि , जयाचे चित्ती । वैषम्यसाम्याची वोखती [1] ।        1 चिंत्ता
वाहे , तो महामती ! । अज्ञान गा ।। 807।।
आणि , माझ्या ठायी भक्ती । फळालागी जया आर्ती , ।
धनोद्देशे विरक्ती , । नटणे जेवी ।। 808।।
नातरी , कांताच्या मानसी । रिगोनि , स्वैरिणी जैसी ।
राहाटे जारेसी ।  जावयालागी ।।809।।
तैसी , माते, किरीटी ! । भजती गा !  पाउटी [2] ।        2 पायरी
करूनि , जो दिठी । विषो सूये ।। 810।।
आणि , भजिन्नलियासवे , । तो विषो जरी न पावे , ।
तरी सांडी ;  म्हणे , '' आघवे । टवाळु [3] हे  '' ।।811।।        3 खोटे
कुणबट कुळवाडी [4] । तैसा , आन , आन देव मांडी , ।        4 अडाणी शेतकरी
आदिलाची  परवडी  [5] , । करी तया ।। 812।।        5 पहिल्या देवाची हेळसांड करतो
तया गुरुमार्गा टेके , । जयाचा , सुगरवा  [6] देखे ।        6 थाटमाट
तरी , तयाचा मंत्र शिके , । येरु नेघे ।। 813।।
प्राणिजातेसी निष्ठुरु , । स्थावरी [7] , बहु भरु ।        7 दगड ,झाडे वगैरे
तेवीचि , नाही एकसरु [8] । निर्वाहो [9]  जया , ।। 814।।        8 एकनिष्ठ  9 वर्तन
माझी मूर्ति निफजवी , । ते , घराचे कोनी बैसवी , ।
आपण , देवो , देवी । यात्रे जाय ।। 815।।
नित्य आराधन माझें , । काजी [10] कुळदेवता भजे , ।        10 कार्याचे निमित्ताने
पर्वविशेषे  कीजे । पूजा , आना ।। 816।।
माझे अधिष्ठान घरी , । आणि , वोवसे [11] आनाचे करी , ।        11 व्रत
पितृकार्यावसरी , । पितरांचा होय ।। 817।।
एकादशीच्या दिवशी , । जेतुला पाडु आम्हासी , ।
तेतुलाचि , नागासी , । पंचमीच्या दिवशी ।।818।।
चौथ मोटकी पाहे , । आणि , गणेशाचाचि होये , ।
चावदसी म्हणे , ''  माये ! । तुझाचि वो दुर्गे  ''  ।। 819।।
नित्य नैमित्तिके कर्मे सांडी , । मग बैसे नवचंडी , ।
आदित्यवारी , वाढी । बहिरवा पात्री ।। 820।।
पाठी सोमवार पावे , । आणि , बेलेसी लिंगा धांवे , ।
ऐसा , एकलाचि आघवे । जोगावी [12]  जो ।। 821।।        12 उपासना करतो
ऐसा अखंड भजन करी , । उगा नोहे क्षणभरी , ।
अवघेन गांवद्वारी [13]  । अहेव [14]  जैसी ।।822।।        13 वैश्या 14 सौभाग्यवती

ऐसेनि जो भक्तु । देखसी सैरा धावतु , ।
जाण , अज्ञानाचा मूर्तु । अवतार तो ।। 823।।
आणि , एकांते चोखटे [1] । तपोवने , तीर्थे , तटे । — 1 पवित्र
देखोनि जो गा विटे , । तोहि , तोच ! ।। 824।।
जया जनपदी सुख , । गजबजेचे कवतिक , ।
वानूं [2] आवडे लौकिक । तोहि , तोचि ।। 825।। — 2 स्तुती केलेली
आणि , आत्मा गोचरु होये , । ऐसी जे विद्या आहे , ।
ते आइकोनि डौर वाहे [3] । विद्वांसु जो ।। 826।। — 3 उपहास करतो
उपनिषदांकडे न वचे , । योगशास्त्र न रुचे , ।
अध्यात्मज्ञानी जयाचे । मनचि नाही , ।। 827।।
आत्मचर्चा एकी आथी[4] , । ऐसिये बुद्धीची भिंती [5] , । — 4 आत्मज्ञानाची चर्चा असते
पाडूनि , जयाची मती । वोढाळ जाहली[6] , ।। 828।। — 5 अशा श्रद्धेला झापडे लाऊन
कर्मकांड तरी जाणे , । मुखोद्‌गत पुराणे , । — 6 मोकाट सुटली
ज्योतिषी तो म्हणे । तैसेचि होय , ।।829।।
शिल्पी अति निपूण ।सूपकर्मीही [7] प्रवीण , । — 7 स्वयंपाकात
विधि , आथर्वण [8] । हाती आथी [9] ।। 830।। — 8 अथर्ववेद 9 निष्णात
कोकीं [10] नाही ठेले [11] । भारत करी म्हणितले ,। — 10 कामशास्त्र 11 शिकावयाचे शिल्लक ठेवले नाही
आगम[12] आफाविले [13] । मूर्त होती ।। 831।।
नीतिजात सुझे , । वैद्यकही बुझे । — 12 मंत्रशास्त्र 13 प्राप्त केले
काव्यनाटकी दुजे । चतुर नाही ! ।। 832।।
स्मृतीची चर्चा । दंशु [14] जाणे गारुडियाचा । — 14 मर्म
निघंटु [15] , प्रज्ञेचा । पाइकी करी [16] ।। 833।। — 15 वैदिक कोश 16 सेवक करणे
पै , व्याकरणी चोखडा , । तर्की अतिगाढा ।
परी एक आत्मज्ञानी फुडा । जात्यंधु जो ।।834 ।।
ते एकवाचूनि , आघवा शास्त्री ।सिद्धांतनिर्माणधात्री [17] । — 17 सिंद्धांताने प्रमाणीत करु शकणारा
परी , जळो ते मूळनक्षत्री , । न पाहे गा ! ।। 835। ।
मोराआंगी , अशेषे । पिसे असती डोळसे ,।
परी , एकली दृष्टी नसे , । तैसें , ते गा ! ।।836।।
जरी परमाणूएवढे । संजीवनीमूळ जोडे , ।
तरी , बहु काय गाडे । भरणे[18] , येरे ? ।। 837।। — 18 गाड्या भरून जमा करणे
आयुष्येवीण लक्षणे[19] , । सिसेवीण अळंकरणें , । — 19 सौंदर्याची 32 लक्षणे
वोहरेवीण [20] वाधावणे [21] , । तो विटंबु गा ।। 838।। — 20 वधुवराशिवाय 21 वाजंत्री वाजवणे
तैसें , शास्त्रजात जाण , । आघवेचि अप्रमाण , ।
पार्था ! अध्यात्मज्ञानेवीण । एकलेनी ।। 839।।

यालागी , अर्जुना पाही , । अध्यात्मज्ञानाच्या ठायी ।
जया नित्यबोधु नाही । शास्त्रमूढा , ।।840।।
तया शरीर जे जाले , । ते , अज्ञानाचे बी विरूढले ।
तयाचे व्युत्पन्नत्व गेले । अज्ञानवेली ।। 841।।
तो जे , जे बोले , । ते अज्ञानचि फुलले ।
तयाचे पुण्य जे फळले , । ते अज्ञान गा ! ।। 842।।
आणि अध्यात्मज्ञान काही । जेणे मानिलेचि नाही , ।
तो , ज्ञानार्थु न देखे , काई । हे बोलावे असे ? ।।843।।
ऐलीचि थडी [1] न पवतां , । पळे जो माघौता , ।    1 अलिकडचा काठ
तया , पैलद्वीपीची वार्ता । काय होय ? ।। 844।।
कां , दारवंठाचि [2] जयाचे । शीर रोविले खांचे , ।    2 उंबरठा
तो केवी परिवरीचे [3] । ठेविले देखे ? ।।845।।    3 घरातील
तेवी , अध्यात्मज्ञानी जया । अनोळख , धनंजया ! ।
तया ज्ञानार्थु देखावया । विषो काई ? ।। 846।।
म्हणौनि आतां , विशेषे । तो ज्ञानाचे तत्त्व न देखे ।
हे सागावे आंखेलेखे [4] । न लगे , तुज ।।847।।    4 आकडे मांडुन
जेव्हां , सगर्भे [5] वाढिले । तेव्हाचि पोटीचे धाले [6] ।    5 गर्भवतीला 6 पोटातील
तैसे , मागिले पदे बोलिले , । तेचि होय ।। 848।।    जीव तृप्त होतो
वाचूनिया , वेगळे । रुप करणे [7] , हे न मिळे , ।    7 वर्णन करणे
जेवीं , अवंतिले [8] आंधळे , । ते दुजेनसी [9] ये ।। 849।.    8 आमंत्रण केले असता
एवं , इये उपरती [10] । अज्ञानचिन्हे मागुती ।    9 दुसऱ्याबरोबर 10 उलटी
अमानित्वादि प्रभृती । वाखाणिली ।। 850।।
जे ज्ञानपदे अठरा । केलिया येरी मोहरा , ।
अज्ञान या आकारा , । सहजे येती ।। 851।।
मागां , श्लोकाचेनि अर्धार्धे । ऐसे सांगितले श्रीमुकुंदे ।
ना , उफराटी इये ज्ञान पदे , । तेचि अज्ञान ।। 852।।
म्हणौनि , इया वाहणी [11] । केली म्यां उपलवणी [12] ।    11 पद्धत 12 विस्तार
वाचूनि , दुधा मेळऊनि पाणी , । फार कीजे ! ।।853।।
तैसें , जी न बडबडी , । पदाची कोर न सांडी , ।
मूळध्वनीचिये वाढी । निमित्त जाहलो ।। 854।।
तंव श्रोते म्हणती , '' राहे , । के परिहारा [13] ठावो आहे ! ।    13 निरसन करणे
बिहिसी कां वाये ? । कविपोषका ।। 855।।
तूते , श्रीमुरारी ,।आम्ही म्हणितले ,'' प्रगट करी ।
जे , अभिप्राय गव्हरी [14] । झांकिले ''' , आम्ही ।। 856।।    14 गुप्त ठेवलेले

'' ते देवाचे मनोगत , । दावित आहासी तू मुर्त , ।
हेही म्हणता , चित्त । दाटैल तुझे ।।857।।
म्हणौनि , असो ; हे न बोलो , । परि साविया गा तोषलो ।
जे ज्ञानतरिये [1] मेळविलो । श्रवणसुखाचिये ।। 858।। 1 ज्ञानरुपी नौका
आतां , इयावरी, । जे तो श्रीहरी ।
बोलिला , ते करी । कथन वेगा '' ।।859।।
इया संतवाक्यासरिसे । म्हणितले निवृत्तिदासे , ।
'' जी अवधारा तरी ऐसे । बोलिले देवे '' ।। 860।।
म्हणती तुवां पांडवा ! । हा चिन्हसमुच्चयो आघवा ।
आयकिला , तो जाणावा । अज्ञानभागु ।। 861।।
इया अज्ञानविभागा । पाठी देऊनि , पैं गा ! ।
ज्ञानविखी चांगा । दृढा होईजे ।। 862।।
मग निर्वाळिलेनि ज्ञाने । ज्ञेय भेटे ल मने ।
ते जाणावया अर्जुने । आस [2] केली ।। 863।। 2 इच्छा केली
तंव , सर्वज्ञांचा रावो । म्हणे जाणौनि तयाचा भावो , ।
'' परिसे ज्ञेयाचा अभिप्रावो । सांगो आंता ।। 864।।

**ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वाऽमृतमश्नुते ।**
**अनादिमत्परं ब्रह्म न सत्तन्नासदुच्यते ।। 12।।**

**आतां जे जाणिल्याने अमृत म्हणजे मोक्ष मिळतो ते तुला सांगतो. अनादि, सर्वांच्या पलीकडले ब्रह्म होय. त्याला सत् म्हणत नाहीत आणि असत् हि म्हणत नाहीत**

तरि ज्ञेय ऐसे म्हणणे । वस्तुते [3] , येणेचि कारणे , । 3 ब्रह्माला
जे , ज्ञानेवाचूनि कवणे । उपाये नये ।।865।।
आणि जाणितलेयावरौते । काहीच करणे नाही जेथे ।
जाणणेचि तन्मयाते [4] । आणी जयाचे ।।866।। 4 स्वरूपऐक्य
जे जाणितलेयासाठी , । संसार , काढूनियां काठी [5] , । 5 कुंपण
जिरोनि जाइजे पोटी । नित्यानंदाच्या ।। 867।।
ते ज्ञेय गा ऐसे । आदि जया नसे ।
परब्रह्म आपैसे । नाम जया ।। 868।।
जे नाही म्हणो जाईजें , । तंव , विश्वाकारे देखिजें , ।
आणि , विश्वचि ऐसे म्हणिजें , । तरि , हे माया ।।869।।
रूप वर्ण व्यक्ती । नाही दृश्य दृष्टा स्थिती ।
तरी कोणे कैसे आथी ? । म्हणावे पां ! ।।870।।

आणि , साचचि जरी नाही , । तरि महदादि कोणे ठाई ।
स्फुरत , कैचे काई । तेणेवीण , असे ? ।।871।।
म्हणौनि , आथी , नाथी , हे बोली , । जे देखोनि , मुकी जाहली ।
विचारेसी मोडली । वाट जेथे ।।872।।
जैसी , भांडघटशरावी [1] , । तदाकारे , असे पृथ्वी । 1 मातीचा डेरा,परळ
तैसें सर्व होऊनिया सर्वी । असे जे , वस्तु ।।873।।

**सर्वतः पाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम् ।**
**सर्वत : श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ।। 13।।**

**त्याला सर्व बाजूनि हात-पाय आहेत; सर्व बाजूनि डोळे,डोकी व तोंडे आहेत; सर्व बाजूनि कान आहेत; आणि तेच या लोकी सर्व व्यापून राहिले आहे**

आघवांचि देशी काळी , । नव्हतां , देशकाळां वेगळी ।
जे क्रिया स्थूळास्थूळी [2] , । तेचि , हात जयाचे ।। 874।। 2 स्थुळ व सूक्ष्म वस्तुपासून
तयाते याकारणे , । विश्वबाहु ऐसे म्हणणे , ।
जे सर्वचि सर्वपणे । सर्वदा करी ।। 875।।
आणि , समस्तांही ठाया , । एके काळी , धनंजया ! ।
आले असें , म्हणौनिया , जया । विश्वांघ्रिनाम [3] ।।876।। 3 सर्वत्र पाय असलेला हे नांव
पै , सवितया आंग डोळे , । नाहीत वेगळे , वेगळे , ।
तैसें , सर्वद्रष्टे सकळे । स्वरुपे जे ।। 877।।
म्हणौनि , विश्वतश्चक्षु [4] । हा अचक्षुच्या ठायी पक्षु । 4 ज्याचे सर्वत्र डोळे आहेत
बोलावया दक्षु । जाहला वेदु ।। 878।। असा
जे सर्वांचे शिरावरी । नित्य नांदे सर्वांपरी , ।
ऐसिये स्थितीवरी , । विश्वमूर्धा [5] म्हणिपे ।।879।। 5 ज्याची सर्वत्र डोकी आहेत
पै गा ! मूर्ति तेचि मुख । हुताशना जैसे देख , । असा
तैसें , सर्वपणे अशेख । भोक्ते जें , ।। 880।।
यालागी तया , पार्था ! । विश्वतोमुख [6] हे व्यवस्था [7] । 6 सर्वबाजुंनी ज्याला मुखे
आली वाक्पथा । श्रुतीचिया ।। 881।। आहेत असा 7 प्रकार
आणि वस्तुमात्री गगन । जैसे असे संलग्न , ।
तैसे , शब्दजाती कान [8] । सर्वत्र जया ।। 882।। 8 सर्व शब्दमात्रांना
म्हणौनि , आम्ही तयाते । म्हणो , सर्वत्र आइकते । आवरून असते
एवं , जे सर्वांते । आवरूनि [9] असे ,।।883।। 9 व्यापून
एऱ्हवी तरी महामती ! । विश्वतश्चक्षु इया , श्रुती ।
तयाचिया व्याप्ती ,। रुप केले ।। 884।।

वाचूनि , हस्त ,नेत्र , पाये , । हे भाष तेथ के आहे ? ।
सर्व शून्याचा न साहे । निष्कर्षु जे ? ।।885।।
पै , कल्लोळाते कल्लोळे । ग्रसिजत असे , ऐसे कळे , ।
परी , ग्रसिते, ग्रासावेगळे । असे काई ? ।।886।।
तैसें , साचचि जे एक , । तेथ के व्याप्यव्यापक [1] ? ।
परी बोलावया नावेक [2] । करावे लागे ।। 887।।
**पै , शून्य जै दावावे जाहले , । तै , बिंदुले एक पाहिजे केले ।**
**तैसें , अद्वैत सांगावे बोले , । तै , द्वैत कीजे ।। 888।।**
एऱ्हवी तरी पार्था ! । गुरुशिष्यसत्पथा ।
आडळु [3] पडे सर्वथा । बोल खुंटे ।। 889।।
म्हणौनि गा श्रुती , । द्वैतभावे अद्वैती , ।
निरुपणाची वाहती । वाट [4] केली ।। 890।।
तेचि आतां अवधारी , । इये नेत्रगोचरे आकारी ।
ते ज्ञेय गा जयापरी । व्यापक असे ।। 891।।

1 व्यापणारे आणि व्यापले जाणारे 2 क्षणभर
3 अडथळा
4 निरुपणाची पद्धत

**सर्वेंद्रियगुणाभासं सर्वेंद्रियविवर्जितम् ।**
**असक्तं सर्वभृच्चैव निर्गुणं गुणभोक्तृ च ।। 14।।**

**त्यांत सर्व इंद्रियांच्या गुणांचा आभास होणारा असून त्याला कोणतेच इंद्रिय नाही; ते सर्वांपासून असक्त म्हणजे विलग असूनहि सर्वांचे धारण करणारे; आणि निर्गुण असूनहि गुणांचा उपभोग घेणारे आहे.**

तरी ते गा किरीटी ! ऐसे , । अवकाशी आकाश जैसे , ।
पटी पटु होऊनि असे । तंतु जेवी ।।892।।
उदक होऊनि उदकीं , । रसु जैसा , अवलोकी ।
दीपपणे दीपकी । तेज जैसे ।। 893।।
कर्पूरत्वे , कापुरी । सौरभ्य असे जयापरी , ।
शरीर होऊनि शरीरी । कर्म जेवी ।। 894।।
किंबहुना पांडवा ! । सोनेचि सोनयाचा रवा [5] ।
तैसे जे या सर्वां । सर्वांगी असे ।। 895।।
परी रवेपणामाजिवडे , । तंव , रवा ऐसे आवडे [6] , ।
वाचूनि [7] , सोने सांगडे [8]। सोनया , जेवी ।। 896।।
पै गा ! वोघुचि वाकुंडा । परि पाणी उजू , सुहाडा ! ।
वन्हि आला लोखंडा , । लोह नव्हे की ! ।। 897।।
घटाकारे , वेटाळे । तेथ , नभ गमे वाटोळे ।
मठी [9] तरी चौफळे । आये [10] दिसे ।। 898।।

5 लगड
6 भासते
7 शिवाय 8 सारखे
9 झोपडे 10 आकार

तरी ते अवकाश जैसे । नोहिजतीचि कां आकाशे ।
जे , विकार होऊनि , तैसे । विकारी नोहे ।। 899।।
मन , मुख्य इंद्रिया , । सत्त्वादि गुणां ययां ।
सारिखे , ऐसे धनंजया ! । आवडे कीर ।।900।।
पै , गुळाची गोडी , । नोहे , बांधया सांगडी [1] ।
तैसी गुण इंद्रिये फुडी [2] । नाही तेथ ।।901।।
अगा ! क्षीराचिये दशे । घृत क्षीराकारे असें , ।
परी क्षीरचि नोहे जैसे । कपिध्वजा ! ।।902।।
तैसें , जे इये विकारी , । विकार नोहे , अवधारी ।
पै , अकारा नाम भोवरी [3] । येर सोने ते सोने ।। 903।
इया , उघड मऱ्हाटिया , । ते वेगळेपण धनंजया ! ।
जाण , गुण इंद्रिया- । पासोनिया ।। 904।।
नामरुपसंबंधु । जातिक्रियाभेदु ।
हा आकारासीच प्रवादु [4] , । वस्तुसि नाही ।। 905।।
ते गुण नव्हे कही , । गुणा तया संबंधु नाही ।
परी तयाच्याचि ठायी । आभासती ।। 906।।
येतुलेयासाठी ,। संभ्रांताच्या पोटी [5] ।
ऐसे जाय , किरीटी ! । जे , हेचि धरी ।। 907।।
तरी ते गा धरणे ऐसें , । अभ्राते जेवी आकाशे , ।
कां , प्रतिवदन जैसे । आरसेनि ।। 908।।
नातरी , सूर्य प्रतिमंडल [6] । जैसेनि धरी सलिल ।
कां , रश्मिकरी , मृगजळ । धरिजे जेवी ।। 909।।
तैसे गा ! संबंधेविण । यया सर्वांते धरी निर्गुण ।
परी ते वायां , जाण । मिथ्यादृष्टी ।। 910।।
आणि यापरी निर्गुणे । गुणाते भोगणे ।
रंका राज्य करणे । स्वप्नी जैसे ।। 911।।
म्हणौनि , गुणाचा संगु , । अथवा गुणभोगु , ।
हा निर्गुणी लागु , । बोलो नये ।। 912।।

1 आकारा सारखी
2 सारखी
3 बुगडी
4 संज्ञा
5 मोहग्रस्त झालेल्याच्या बुद्धिला
6 प्रतिबिब

**बहिरन्तश्च भूतानामचरं चरमेव च ।**
**सूक्ष्मत्वात्तदविज्ञेयं दूरस्थं चांतिके च तत् ।।15 ।।**

**ते सर्व भूतांच्या आंत व बाहेरहि आहे; अचर व चरहि आहे; सूक्ष्म असल्यामुळे ते अविज्ञेय आहे, आणि दूर असूनहि जवळ आहे .**

जे चराचर भूतां-। माजी असे पंडुसुता ! ।
नाना , वन्ही , उष्णता । अभेदे जैसी ।। 913।।
तैसेनि अविनाशभावे , । जे , सूक्ष्मदशे , आघवे ।
व्यापूनि असे , ते जाणावे । ज्ञेय एथ ।। 914।।
जे एक आंतुबाहेरी , । जे एक जवळ दुरी , ।
जे एकवाचूनि परी । दुजी नाही ।। 915।।
क्षीरसागरीची गोडी । माजी बहु , थडिये थोडी ।
हे नाही , तया परवडी [1] । पूर्ण जे गा ! ।। 916।। 1 प्रकारे
स्वेदजादिप्रभृती । वेगळाल्या भूती ।
जयाचिये अनुस्युती [2] , । खोमणे [3] नाही ।। 917।। 2 अखंड स्थिती 3 न्युनपणा
पै , श्रोते मुखटिळका [4] ! । घटसहस्त्रा अनेका-। 4 श्रोत्यांना भूषण असणाऱ्या
माजी बिंबोनि चंद्रिका । न भेदे जेवी ।। 918।।
नाना , लवणकणाचिये राशी । क्षारता एकचि जैसी ।
कां , कोडी एकीं [5] उसी । एकची गोडी ।। 919।। 5 कोट्ट्यावधी

**अविभक्तं च भूतेषु विभक्तमिव च स्थितम् ।**
**भूतभर्तृ च तज्ज्ञेयं ग्रसिष्णु प्रभविष्णु च ।। 16।।**
**ते तत्त्वतः अविभक्त म्हणजे अखंड असतांहि , सर्व भूतांत जणू काय नानात्वाने विभागून राहिलेले आहे; व सर्व भूतांना धारण करणारे, ग्रासणारे व उत्पन्न करणारेहि तेच समजले पाहिजे .**

तैसे , अनेकी भूतजाती । जे आहे एकी व्याप्ती [6] , । 6 एकानेच व्यापून ठेवले आहे
विश्वकार्या , सुमती ! । कारण जे गा ।।920।।
म्हणौनि , हा भूताकारु । जेथोनि , तेचि तया आधारु , ।
कल्लोळा सागरु , । जियापरी ।। 921।।
बाल्यादि तिन्ही वयसी , । काया एकचि जैसी , ।
तैसें , आदिस्थितिग्रासी , । अखंड जे , ।।922।।
सायंप्रातर्मध्यान । होतां जातां दिनमान , ।
जैसे कां , गगन । पालटेना ।।923।।
आगा ! सृष्टिवेळे , प्रियोत्तमा ! । जया नांव म्हणती ' ब्रह्मा ' ।
व्याप्ति , जे विष्णुनामा , । पात्र जाहले , ।।924।।
मग आकारु हा हारपे । तेव्हां ' रुद्र ' जे म्हाणिपे , ।
तेही गुणत्रय जेव्हां लोपे । तै , जे शून्य , ।। 925।।
नभाचे शून्यत्व गिळून । गुणत्रयाते नुरऊन , ।
ते शून्य , ते महाशून्य । श्रुतिवचनसंमत ।। 926।।

**ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमस : परमुच्यते ।**
**ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य धिष्ठितम् ।। 17 ।।**
**त्यालाच तेजाचेहि तेज, व अंधकारापलीकडचे म्हणतात; ज्ञान, जे जाणावयाचे ते ज्ञेय, व ज्ञानगम्य म्हणजे ज्ञानानेच कळणारेहि तेच असून  सर्वांच्या हृदयात तेच अधिष्ठित झालेले आहे.**

जे अग्नीचे दीपन ,। जे चंद्राचे जीवन , ।
सूर्याचे नयन । देखती जेणे , ।। 927।।
जयाचेनि उजियेडे । तारांगण , उभडे [1] ।     1 प्रकाशलेले आहे
महातेज [2] , सुरवाडे [3] । राहाटे जेणे ।। 928।।     2 सूर्य 3 सुखी होतात
जे आदीची आदी , । जे वृद्धीची वृद्धी , ।
बुद्धीची जे बुद्धी , । जीवाचा जीवु , ।।929।।
जे मनाचे मन , । जे नेत्राचे नयन , ।
कानाचे कान , । वाचेची वाचा , ।।930।।
जे प्राणाचा प्राण , । जे गतीचे चरण , ।
क्रियेचे कर्तेपण । जयाचेनि ।। 931।।
आकारु जेणे आकारे , । विस्तारु जेणे विस्तारे , ।
संहारु जेणे संहारे , । पंडुकुमरा !  ।।932।।
जे मेदिनीची मेदिनी [4] , ।जे पाणी पिऊनि असे पाणी , ।     4 पृथ्वी
तेजा दिवेलावणी । जेणे तेजे , ।।933।।
जे वायूचा श्वासोश्वासु , । जे गगनाचा अवकाशु , ।
हे असो ;  आघवाची आभासु , । आभासे जेणे , ।।934।।
किंबहुना पांडवा  ! । जे आघवेचि असे आघवा , ।
जेथ नाही रिगावा । द्वैतभावासी ।। 935।।
जे देखलियाचिसवे । दृश्य , द्रष्टा हे आघवे ।
एकवाट कालवे , ।सामरस्ये , ।।936।।
मग तेचि होय ज्ञान ; । ज्ञाता , ज्ञेय, हन ।
ज्ञाने गमिजे स्थान , । तेहि तेची ।। 937।।
जेसे, सरलियां लेख [5] , । आंख [6]  होती एक , ।     5 हिशोब 6 रक्कम
तैसें , साध्यसाधनादिक । ऐक्यासि ये ।। 938।।
अर्जुना !  जिये ठायी । न सरे द्वैताची वही [7] ।     7 व्यवहार
हे असो , जे हृदयी । सर्वांच्या असे , ।। 939।।

**इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं चोक्तं समासत : ।**
**मद्भक्त एतद्विज्ञाय मद्भावायोपपद्यते ।। 18 ।।**
**याप्रमाणे क्षेत्र, तसेच ज्ञान व ज्ञेय म्हणजे काय हे संक्षेपाने सांगितले. हे जाणिले म्हणजे माझा भक्त माझ्या स्वरूपाला येऊन पोचतो .**

एवं , तुजपुढा । आदि क्षेत्र सुहाडा ! ।
दाविले फाडोवाडां [1] ।विवंचुनी ।। 940।। 1 स्पष्टपणे
तैसेचि , क्षेत्रापाठी । जैसेनि देखसी दिठी , ।
ते ज्ञानही किरीटी ! । सांगितले ।। 941।।
अज्ञानाही कौतुके । रूप केले निके ।
जंव आयणी [2] तुझी टेके । पुरे म्हणे ।। 942।। 2 बुद्धी
आणि आतां हे रोकडे । उपपत्तीचेनि पवाडे ।
निरुपिले उघडे । ज्ञेय पै गा ! ।। 943।।
हे आघवीच विवंचना [3] । बुद्धी भरोनि अर्जुना ! । 3 विवेचन
मत्सिद्धिभावना । माझिया येती ।। 944।।
देहादि परिग्रही , । संन्यासु करूनिया जिही , ।
जीवु माझ्या ठाई । वृत्तिकु केला , ।। 945।।
ते माते किरीटी ! । हेचि जाणौनिया शेवटी ।
आपणपयां साटोवाटी [4] । मीचि होती ।। 946।। 4 मोबदला
मीचि होती , परी । हे मुख्य गा ! अवधारी , ।
सोहोपी सर्वांपरी । रचिली आम्ही ।।+ 947।।
कडां , पायरी कीजें , । निराळी , माचु बांधिजें[5] , । 5 चढण्यास आधार नसेल असे
अथावी [6] , सुइजे । तरी , जैसी ।। 948।। स्थान तर म चाण बांधावे 6 खोल पाण्यात
एऱ्हवी , अवघेचि आत्मा , । हे सांगो जरी वीरोत्तमा ! ।
परी तुझिया मनोधर्मा , । मिळेल ना ।। 949।।
म्हणौनि , एकचि संचले [7] । चतुर्धा आम्ही केले । 7 बनलेले
जें अदळपण [8] देखिले , । तुझिये प्रज्ञे ।। 950।। 8 असमर्थतता
पै , बाळ जै जेवविजें , । तै , घासुं विसा ठायी कीजें , ।
तैसें , एकचि हे चतुर्व्याजें , । कथिले आम्ही ।। 951।।
एक क्षेत्र , एक ज्ञान , । एक ज्ञेय , एक अज्ञान , ।
हे भाग केले , अवधान । जाणौनि तुझे ।। 952।।
आणि ऐसेनही पार्था ! । जरी हा अभिप्रावो तुज हाता ।
नये , तरी हे व्यवस्था । एक वेळ सांगो ।। 953।।
आंता चौठायी न करूं , । एकही म्हणौनि न सरुं ।
आत्मानात्मया [9] धरूं । सरिसा पाडु ।। 954 ।। 9 आत्मा व अनात्मा
परि तुवां येतुले करावे , । मागो ते आम्हां देआवे ।
जे , '' कानचि नांव ठेवावे । आपण पै गा ! '' ।। 955।।

या श्रीकृष्णाचिया बोला , । पार्थु रोमांचितु जाहला ।
तेथ देवो म्हणती , '' भला । उचंबळेना '' ।। 956।।
ऐसेनि , तो येता वेगु । धरूनि , म्हणे श्रीरंगु , ।
'' प्रकृतिपुरुषविभागु । परिसे , सांगो ।। 957।।
जया मार्गाते जगी , । सांख्य म्हणती योगी , ।
जयाचिये भाटिवेलागी [1] । मी कपिल जाहलो ।। 958।। 1 स्तुती करण्याकरता
तो आइक निर्दौखु । प्रकृतिपुरुषविवेकु ।
म्हणे आदिपुरुखु । अर्जुनाते ।। 959।।

**प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादि उभावपि ।**
**विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसंभवान् ।। 19 ।।**
**प्रकृति व पुरुष ही दोन्हीहि अनादि असे समज. विकार व गुण हे सर्व प्रकृतीपासून उद्भवतात असे जाण .**

तरी पुरुष अनादि आथी । आणि तैचि लागोनि प्रकृति ।
संसरिसी [2] दिवोराती । दोनी जैसी ।। 960।। 2 बरोबर चालतात
कां , रूप नोहे वायां [3], । परी रूपा लागली , छाया । 3 आभासात्मक
निकणु [4] वाढे धनंजया ! । कणेसी , कोंडा ।। 961।। 4 दाणे येण्याचे आधिचे कणीस
तैसी जाण जवटे [5] । दोन्ही इये एकवटे । 5 जुळे
प्रकृतिपुरुष प्रकटे । अनादिसिद्धे ।। 962।।
पै , क्षेत्र येणे नांवे । जे सांगितले आघवे , ।
तेचि एथ जाणावे । प्रकृति हे गा ।। 963।।
आणि क्षेत्रज्ञ ऐसे । जयाते म्हणितले असें , ।
तो '' पुरुष '' हे अनारिसे [6] । न बोलो , घेई ।। 964।। 6 वेगळे
इये आनाने नांवे , । परि , निरुप्य आन नोहे , ।
हे '' लक्षण '' न चुकावे । पुढतपुढती ।। 965।।
तरी केवळ जे सत्ता , । तो पुरुष , गा पंडुसुता ! ।
प्रकृतीते समस्तां ।' क्रिया ' नाम ।। 966।।
बुद्धि , इंद्रये , अंतःकरण , । इत्यादि विकारभरण ।
आणि ते तिन्ही गुण । सत्त्वादिक , ।।967।।
हा आघवाचि मेळावा , । प्रकृती जाहला , जाणावा ।
हेचि हेतु संभवा । कर्माचिया ।। 968।।

**कार्यकारणकर्तृत्वे हेतु : प्रकृतिरुच्यते ।**
**पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुरुच्यते ।। 20 ।।**
**कार्य म्हणजे देह, व करण म्हणजे इंद्रिये, यांच्या कर्तृत्वास प्रकृति कारण आहे असे म्हणतात; आणि कर्ता नसूनहि सुखदुःखाचा उपभोग घेण्यास पुरुष (क्षेत्रज्ञ )कारण आहे असे म्हंटले आहे .**

तेथ इच्छा आणि बुद्धि , । घडवी अहंकारेसी आधी ।
मग तिया लाविती वेधी [1] । कारणाच्या ।। 969।।
तेचि कारण ठाकावया [2] । जे सूत्र धरणे , उपाया ।
तया नांव धनंजया ! । कार्य , पै गा ! ।। 970।।
आणि , इच्छा मदाच्या थावी [3] । लागली , मनाते उठवी , ।
ते , इंद्रिये राहाटवी । हें , ' कर्तृत्व ' , पै गा ! ।। 971।।
म्हणौनि , तीन्ही या , जाणा । कार्यकर्तृत्वकारणा , ।
प्रकृति मूळ , हे राणा । सिद्धांचा म्हणे ।। 972।।
एवं , तिहीचेनि समवाये , । प्रकृति कर्मरूप होये ।
परी जया गुणा , वाढे , त्राये [4] । त्याचि सारिखी ।। 973।।
जें सत्त्वगुणे अधिष्ठिजें , । ते सत्कर्म म्हणिजे ।
रजोगुणे निफजे । मध्यम ते ।। 974।।
जे कां केवळ तमे , । होती जिये कर्मे , ।
निषिद्धे , अधमे , । जाण तिये ।। 975।।
ऐसेनि संतासंते [5] । कर्मे प्रकृतीस्तव होते , ।
तयापासोनि निर्वाळते [6] । सुखदुःख गा ! ।। 976।।
असंती दुःख उपजें , । सत्कर्मी सुख निफजे , ।
तया दोहीचा बोलिजे । भोगु पुरुषा ।। 977।।
सुखदुःखे जंववरी । निफजती सचोकारी [7] , ।
तंव प्रकृति उद्दमु करी , । पुरुष भोगी ।। 978।।
प्रकृतिपुरुषांची कुळवाडी [8] । सांगता , असंगडी [9] , ।
जें , आंबुली [10] जोडी , । आंबुला [11] खाय ।। 979।।
आंबुला आंबुलिये । संगती , ना सोये [12] ।
कीं , आंबुली जग विये । चोज [13] ऐका ।। 980।।

1 नादाला
2 प्राप्त करण्यास
3 इच्छा व अहंकार यांचे आश्रयाने
4 बळ
5 बरेवाईट
6 उत्पन्न होते
7 सत्य आहेत असा भास होतो
8 व्यापार 9 असामान्य
10 पत्नी 11पती
12 मेळ
13 कौतुक

**पुरुषः प्रकृतिस्थो हि भुंक्ते प्रकृतिजान् गुणान् ।**
**कारणं गुणसंगोऽस्य सदसद्योनिजन्मसु ।। 21।।**

**कारण प्रकृतीत पुरुष अधिष्टित झाला म्हणजे प्रकृतीच्या गुणांचा तो उपभोग घेतो; आणि प्रकृतीच्या गुणांचा हा संयोग पुरुषाला बऱ्यावाईट योनीत जन्म घेण्यास कारण होतो .**

जे,अनंगु [14] ,तो पेंधा [15],। निकवडा [16],नुसधा[17], ।
जीर्णु , अतिवृद्धा- । पासोनि वृद्धु , ।। 981।।

14 अंगहीन 15 पांगळा
16 दरिद्री17 एकटा

तया आडनांव ' पुरुषु ' । एऱ्हवी , स्त्री ना नपुंसकु , ।
किंबहुना एकु , । निश्चयो नाही ।। 982।।
तो अचक्षु , अश्रवणु , । अहस्तु , अचरणु , ।
रुप ना वर्ण्ु , । नाम आथी ।। 983।।
अर्जुना ! काहीचि जेथ नाही , । तो प्रकृतीचा भर्ता पाही ! ।
की भोगणे ऐसयाही । सुखदुःखाचे ! ।।984।।
तो तरी अकर्ता , । उदासु , अभोक्ता , ।
परी इया पतिव्रता । भोगविजे ।। 985।।
जियेते अळुमाळु । रूपा गुणाचा चाळढाळु [1] । 1 हालचाल
ते भलतैसाही खेळु । लेखा [2] आणी ।। 986।। 2 आकाराला
मा , इये प्रकृती तंव । गुणमयी हेचि नांव , ।
किंबहुना , सावेव । गुण तेचि हे ।। 987।।
हे प्रतिक्षणी नित्य नवी , । रूपा गुणाचीच आघवी ।
जडातेही माजवी । इयेचा माजु ।। 988।।
नामे , इये प्रसिद्धे , । स्नेहो इया स्निग्धे , ।
इंद्रिये प्रबुद्धे [3] । इयेचेनि ।। 989।। 3 तरबेज
कायि,मन, हे नपुंसक । कीं , ते भोगवी तिन्ही लोक ।
ऐसे , ऐसे अलौकिक । करणे इयेचे ।। 990।।
हे भ्रमाचे महाद्वीप , । हे व्याप्तीचे रुप , ।
विकार उमप [4] । इया केले ।। 991।। 4 अमर्याद
हे कामाची मांडवी , । हे मोहवनीची माधवी [5] । 5 वसंत काळ
इये प्रसिद्धचि , दैवी । माया हे नाम ।। 992।।
हे वाङमयाची वाढी , । हे साकारपणाची जोडी , ।
प्रपंचाची धाडी [6] । अभंग हे ।। 993।। 6 हल्ला
कळा एथूनि जालिया । विद्या इयेच्या केलिया ।
इच्छा , ज्ञान , क्रिया , । वियाली हे ।। 994।।
हे नादाची टांकसाळ । हे चमत्काराचे वेळाउळ [7] । 7 मंदीर
किंबहुना , सकळ । खेळु इयेचा ।। 995।।
जे उत्पत्ति , प्रलयो होत । ते इयेचे सायंप्रात ।
हे असो ; अद्भूत । मोहन [8] हे ।।996।। 8 भुरळ
हे अद्वयाचे दुसरे [9] । हें निःसंगाचे सोयरे । 9 द्वैत
हे निराळेसि [10] घरे । नांदत असे ।। 997।। 10 आश्रय नसलेल्या
इयेते येतुलावरी । सौभाग्यव्याप्तीची थोरी ।
म्हणौनि , तया आवरी , । अनावराते ।। 998।।

तयाच्या तंव ठायी , । निपटूनि काहीचि नाही ।
की तया आघवेही । आपणचि होय ।। 999।।
तया स्वयंभाची संभुती , [1] । तया अमूर्ताची मूर्ती , ।     1 उत्पत्ती
आपण होय , स्थिती । ठावो , तया ।।1000।।
तया अनार्ताची आर्ती , । तया पूर्णाची तृप्ती , ।
तया अकुळाची जाती-। गोत , होय ।। 1001।।
तया अचर्चाचे चिन्ह , । तया अपाराचे मान [2] , ।     2 माप
तया अमनस्काचे मन , । बुद्धीही , होय ।। 1002।।
तया निराकाराचा आकारु , । तया निर्व्यापाराचा व्यापारु , ।
निरहंकाराचा अहंकारु , । होऊनि ठाके ।।1003।।
तया अनामाचे नाम , । तया अजाचे जन्म , ।
आपण होय कर्म-। क्रिया तया ।।1004।।
तया निर्गुणाचे गुण , । अचरणाचे चरण , ।
तया अश्रवणाचे श्रवण , । अचक्षुचे चक्षु , ।। 1005।।
तया भावातीताचे भाव , । तया निरवयवाचे अवयव , ।
किंबहुना , होय सर्व । पुरुषाचे हे ।।1006।।
ऐसेनि इया प्रकृती । आपुलिया सर्व व्याप्ती , ।
तया अविकाराते विकृती-। माजी कीजे ।।1007।।
तेथ पुरुषत्व जे असें , । ते ये इये प्रकृतिदशे ।
चंद्रमा अंवसे । पडिला , जैसा ।।1008।।
विदळ [3] , बहु चोखा । मीनलिया वाला एका , ।     3 हिणकस धातु
कसु होय पांचका [4] । जयापरी ।।1009।     4 पाच आणे कस
कां , साधूते गोंधळी [5] । संचरोनि सुये मैळी , ।     5 पिशाच्च
नाना , सुदिनाचा , आभाळी । दुर्दिनु किजे ।। 1010।।
जेवी पय [6] पशूच्या पोटी , । कां , वन्हि जैसा काष्टी , ।     6 दूध
गुंडूनि घेतला पटी , । रत्नदीपु ।।1011।।
राजा पराधीनु जाहला , । कीं , सिंहु रोगे रुंधला [7] ।     7 व्यापला
तैसा , पुरुष प्रकृती आला , । स्वतेजा मुखे ।। 1012।।
जागता नरु , सहसा [8]। निद्रा पाडूनि जैसा , ।     8 अचानक
स्वप्नीचिया सोसा । वश्यु कीजे ।। 1013।।
तैसें , प्रकृति जालेपणे , । पुरुषा गुण भोगणे ।
उदास [9] , अंतुरीगुणे [10] । आतुडे जेवी ।। 1014।।     9 तटस्थ 10 स्त्री
तैसे अजा नित्या , होये । आंगी जन्ममृत्युचे घाये [11] ।     11 घाव
वाजती , जै लाहे । गुणसंगाते ।।1015।।

परी ते ऐसे पंडुसुता !, । तातले [1] लोह पिटिता । 1 तापलेले
जेवी वन्हिसीचि घाता [2] । बोलती , तया ।। 1016।। 2 अग्नीलाच लागतात
कां , आंदोळलिया उदक , । प्रतिभा होय अनेक ।
ते , नानात्व म्हणती लोक । चंद्री जेवी ।। 1017।।
दर्पणाचिया जवळिका , । दुजेपण जैसे ये मुखा , ।
कां , कुंकुमे स्फटिका । लोहितत्व [3] ये ।। 1018।। 3 तांबडेपणा
तैसा , गुणसंगमे , । अजन्मा हा जन्मे ।
पावतु , ऐसा गमे , । एऱ्हवी नाही ।। 1019।।
अधमोत्तमा योनी । यासि , ऐसिया मानी , ।
जैसा संन्यासी होय स्वप्नी । अंत्यजादि जाती ।। 1020।।
म्हणौनि , केवळा पुरुषा । नाही होणे, भोगणे , देखा ! ।
येथ , गुणसंगुचि अशेखा-। लागी मूळ ।। 1021।।

**उपद्रष्टानुमन्ता च भर्ता भोक्ता महेश्वरः ।**
**परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन्पुरुषः परः ।।22।।**

**हा जो प्रकृतीच्या गुणांचा उपद्रष्टा म्हणजे जवळ बसून पहाणारा, अनुमोदन देणारा, भर्ता म्हणजे प्रकृतीच्या गुणात भर घालणारा, आणि उपभोग घेणारा त्यासच या देहांतील परपुरुष, महेश्वर आणि परमात्मा असे म्हणतात.**

हा प्रकृतिमाजी उभा । परी , जुई जैसा बोथंबा [4] , । 4 आश्रय देणारा खांब
इया प्रकृति , पृथ्वी नभा , । तेतुला पाडु [5] ।। 1022।। 5 अंतर
प्रकृतिसरितेच्या तटी । मेरु होय हा किरीटी ! ।
माजी बिंबे , परी लोटी , । लोटो नेणे ।। 1023।।
प्रकृति होय जाये , । हा तो असतुचि आहे ।
म्हणौनि , आब्रह्मचे होये , । शासन हा ।। 1024।।
प्रकृति , येणे जिये , । याचिया सत्ता जग विये , ।
इयालागी इये । वरयेतु [6] हा ।। 1025।। 6 नवरा
अनंत काळे किरीटी ! । जिया मिळती इया सृष्टी , ।
तिया रिगती ययाच्या पोटी , । कल्पांतसमयी ।। 1026।।
हा महद्ब्रह्मगोसावी , । ब्रह्मगोळ लाघवी [7] , । 7 आश्चर्यकारक
अपारपणे मवी । प्रपंचाते ।। 1027।।
पै , या देहामाझारी , । परमात्मा ऐसी जे परी ।
बोलिजे , ते अवधारी । ययातेचि ।। 1028।।
अगा , प्रकृतिपरौता । एकु आथी पंडुसुता ! ।
ऐसा प्रवादु , तो तत्त्वता । पुरुष हा , पै ।। 1029।।

**य एवं वेत्ति पुरुषं प्रकृतिं च गुणैः सह ।**
**सर्वथा वर्तमानोऽपि न स भूयोऽभिजायते ।।23।।**

**पुरुष निर्गुण आणि प्रकृतिच काय ती गुणासहवर्तमान, याप्रमाणे जो जाणितो तो कसाहि वागत असला तरी त्याला पुनर्जन्म घडत नाही .**

जो निखळपणे येणे , । पुरुषा यया जाणे , ।
आणि गुणाचे करणे । प्रकृतीचे ते , ।।1030।।
हे रुप , हे छाया , । पैल जळ , हे माया , ।
ऐसा निवाडु , धनंजया ! । जेवी कीजें , ।।1031।।
तेणे पाडे अर्जुना ! । प्रकृतिपुरुषविवंचना ।
जयाचिया मना । गोचर जाहली , ।। 1032।।
तो शरीराचेनि मेळे । करुं कां कर्मे सकळे , ।
परी आकाश धुई न मैळे , । तैसा असे ।। 1033।।
आथिलेनि देहे , । जो न घेपे देहमोहे , ।
देह गेलिया , नोहे । पुनरपि तो ।। 1034।।
ऐसा ,तया एकु । प्रकृति पुरुषविवेकु ।
उपकारु अलौकिकु । करी, पै गा ! ।। 1035।।
परी हाचि अंतरी । विवेक , भानूचिया परी ।
उदैजें , ते अवधारी , । उपाय बहुत ।। 1036।।

**ध्यानेनाऽऽत्मनि पश्यन्ति केचिदात्मानमात्मना ।**
**अन्ये सांख्येन योगेन कर्मयोगेन चापरे ।। 24।।**

**काही लोक आपण होउनच आपल्या ठायी आत्म्याला पहातात; काही सांख्ययोगाने आणि काही कर्मयोगाने .**

कोणी एकु सुभटा !। विचाराचा आगिटां [1] ।
आत्मानात्मकिटा [2] । पुटे देऊनि , ।। 1037।।
छत्तीसही वानी भेद । तोडोनियां , निर्विवाद ।
निवडिती शुद्ध । आपणपे ।। 1038।।
तया आपणपयाच्या पोटी , । आत्मध्यानाचिया दिठी , ।
देखती गा किरीटी ! । आपणपेचि ।। 1039।।
आणिक , पै , दैवबगे [3] । चित्त देती सांख्ययोगे , ।
एक ते अंगलगे [4] , । कर्माचेनी ।। 1040।।

1 आगीने
2 आत्मा व अनात्मारुपी हिणकस सोने
3 दैवबळाने
4 आश्रयाने

**अन्ये त्वेवमजानन्त ः श्रुत्वाऽन्येभ्य उपासते ।**
**तेऽपि चातितरन्त्येव मृत्युं श्रुतिपरायणा ः ।।25।।**

**ज्यांना याप्रमाणे स्वतः ज्ञान होत नाही असे कित्येक दुसऱ्याचे सांगणे ऐकून श्रद्धेने परमेश्वराचे भजन करितात. ऐकिलेली गोष्ट प्रमाण मानून वागणारे हे पुरुषहि मृत्यु तरून पलीकडे जातात.**

येणे येणे प्रकारे। निस्तरती साचोकारे [1] । — 1 खरेपणाने
हे भवा भेउरे [2] , । आघवेचि ।। 1041।। — 2 घाबरलेले
परी ते करिती ऐसें , ।अभिमानु दवडूनि देशे , ।
एकाचिया विश्वासे । टेकती , बोला ।। 1042।।
जे हिताहित देखती , । हानि , कणवा [3] घेपति , । — 3 कणव येते
पुसोनि , शिणु हरिती , । देती सुख ।। 1043।।
तयाचेनि मुखे जे निघे , । तेतुले आदरे चांगे , ।
ऐकोनियां आंगे , । मने होती ।। 1044।।
तया ऐकणेयाचि नांवे । ठेविती गा आघवे , ।
तया अक्षरासी , जीवे । लोण करिती ।। 1045।।
तेही अंती , कपिध्वजा ! । इया मरणार्णवसमाजा-।
पासूनि निघती , वोजा । गोमाटिया [4] ।। 1046।। — 4 चांगल्या मार्गाने
ऐसेसे हे उपाये । बहुवस एथे , पाहे ।
जाणावया होये । एकी वस्तु ।। 1047।।
आतां , पुरे हे बहुत , । पै , सर्वार्थाचे मथित ।
सिद्धांतनवनीत । देऊं तुज ।। 1048।।
येतुलेनि पंडुसुता ! । अनुभव लाहाणा आयिता ।
येर तंव तुज होतां , । सायास नाही ।। 1049।।
म्हणौनि , ते बुद्धि रचूं । मतवाद हे खांचूं ।
सोलीव [5] निर्वचूं । फलितार्थुची ।। 1050।। — 5 स्वच्छ

**यावत्संजायते किंचित्सत्त्वं स्थावरजंगमम् ।**
**क्षेत्रक्षेत्रज्ञसंयोगात्तद्विद्धि भरतर्षभ ।। 26।।**

**हे भरतश्रेष्ठा ! स्थावर किंवा जंगम जी कोणतीहि वस्तु निर्माण होते, ती क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांच्या संयोगा- पासून होते हे ध्यानात ठेव.**

तरी '' क्षेत्रज्ञ '' येणे बोले । तुज , आपणपे जे दाविले ।
आणि क्षेत्रही सांगितले । आघवे जे , ।। 1051।।
तया येरयेरांच्या मेळी । होईजे भूती सकळी , ।
अनिलसंगे सलिली , । कल्लोळ जैसे ।। 1052।।

कां , तेजा आणि उखरा [1] , । भेटी जालिया , वीरा ! ।
मृगजळाचिया पूरा , । रुप होय ।। 1052।।
नाना , धाराधरधारी [2] । झळंबलिया [3] वसुंधरी , ।
उठिजे जेवी अंकुरी । नानाविधी ।। 1053।।
तैसें , चराचर आघवे । जे काही '' जीवु '' नांवे , ।
ते , तो उभययोगे संभवे , । ऐसे जाण ।। 1055।।
इयालागी अर्जुना ! । क्षेत्रज्ञा प्रधाना -।
पासूनि , न होती भिन्ना । भूतव्यक्ती ।। 1056।।

1 माळरान
2 मेघातून पडणाऱ्या धारा
3 आदळणे

**समं सर्वेषु भूतेषु तिष्ठन्तं परमेश्वरम् ।**
**विनश्यत्स्वविनश्यन्तं यः पश्यति स पश्यति ।। 27।।**

**सर्व भूतांचे ठायी सारखाच रहाणारा, व सर्व भूते नाहीशी झाली तरी ज्याचा नाश होत नाही, अशा परमेश्वराला ज्याने पाहिले त्याने खरे तत्त्व ओळखिले म्हणावयाचे .**

पै , पटत्व तंतु नव्हे , । तरी तंतुसीचि ते आहे , ।
ऐसे खोली डोळा पाहे , । ऐक्य, हे गा ! ।। 1057।।
भूते आघवीचि होती , । एकाची एक आहाती , ।
परी तूं प्रतीती । यांची , घे पां ! ।।1058।।
यांची नामेही आनाने , । अनारिसी वर्तने , ।
वेषही सिनाने , । आघवेयांचे , ।।1059।।
ऐसे देखोनि , किरीटी ! । भेद सूसी हन पोटी , ।
तरी , जन्माचिया कोटी । न लाहसी निघो ।। 1060।।
पै , नानाप्रयोजनशीळे[4] , । दीर्घे , वक्रे , वर्तुळे , ।
होती एकाचीच फळे । तुंबिणीयेची [5] , ।। 1061।।
होतु कां , उजू , वांकुडे , । परी , बोरीचे हे न मोडे [6] ।
तैसी , भूते अवघडे [7] , । परी , वस्तु उजू ।। 1062।।
अंगारकणी [8] बहुवसी । उष्णता समान जैशी , ।
तैसा , नाना जीवराशी । परेशु [9] असे ।। 1063।।
गगनभरी धारा , । परी , पाणी एकचि वीरा ! ।
तैसा या भूताकारा । सर्वांगी तो ।। 1064।।
हे भूतग्राम विषम , । परी वस्तु ते एथ सम , ।
घटमठी व्योम , । जियापरी ।। 1065।।
हा नाशतां भूताभासु , । एथ आत्मा तो अविनाशु , ।
जैसा , केयुरादिकीं[10] कसु , । सुवर्णाचा ।। 1066।।

4 कारणाने
5 भोपळ्याचा वेल
6 नाही असे होत नाही
7 विचित्र
8 विस्तवाच्या ठिणग्या
9 परमात्मा
10 एक अलंकार

एवं, जीवधर्महीनु , । जो जीवेसी अभिन्नु , ।
देखे , तो सुनयनु । ज्ञानियांमाजी ।। 1067।।
ज्ञानाचा डोळा , डोळसा-। माजी डोळसु , तो वीरेशा ।
हे स्तुति नोहे , बहुवसा [1] । भाग्याचा तो ।। 1 खूप

**समं पश्यन् हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम् ।**
**न हिनस्त्यात्मनात्मानं ततो याति परां गतिम् ।।28।।**

**ईश्वर सर्वत्र सारखाच भरलेला आहे हे जाणून जो पुरुष आपण आपलाच घात करीत नाही, म्हणजे आपण होऊनच चांगल्या मार्गाला लागतो, तो त्यामुळे उत्तम गतीस पोचतो .**

हे गुणेंद्रिय धोकोटी [2] । देह धातूंची त्रिकुटी । 2 नाव्ह्याची पेटी
पांचमेळावा वोखटी [3] । दारुण हे ।। 1069।। 3 वाईट
हे उघड पांचवेउली [4] । पंचधां आगी लागली । 4 इंगळी
जीवपंचनना [5] सांपडली । हरिणकुटी [6] हे ।। ।। 1070।। 5 जीवरुपी सिंहाला
ऐसा असोनि इये शरीरी , । कोण नित्यबुद्धीची सुरी । 6 हरिणाचा येण्याजाण्याच
अनित्यभावाच्या उदरी । दाटीचिना [7] ? ।। 1071 रस्ता 7 खुपसणे
परी , इये देही असतां , । जो , नयेचि आपणया घाता [8] । 8 घात करणे
आणि , शेखी पंडुसुता ! , । तेथेचि मिळे ।। 1072।।
जेथ , योगज्ञानाचिया प्रौढी , । वोलांडूनियां जन्मकोडी , ।
' न निगो इया भाषा '' बुडी । देती योगी ।। 1073।।
जे आकाराचे पैल तीर , । जे नादाची पैल मेर ।
तुर्येचें [9] माजघर । परब्रह्म जे , ।।1074।। 9 ज्ञानरुपी चौथी अवस्था
मोक्षासकट गती [10] । जेथे येती विश्रांती । 10 अवस्था
गंगादि आपांपती [11] । सरिता जेवी ।। 1075।। 11 समुद्र
ते सुख येणेचि देहे । पाय पाखाळणिया [12] लाहे । 12 पाय धुण्यास
जो भूतवैषम्ये नोहे । विषमबुद्धी ।। 1076।।
दीपांचिया कोडी , जैसे । एकचि तेज सरिसे , ।
तैसा , जो असतुचि असें , । सर्वत्र ईशु ।। 1077।।
ऐसेनि समत्वे पंडुसुता ! । जिये जो देखत साता [13] । 13 असता
तो , मरण आणि जीविता , । नागवे फुडा [14] ।। 1078।। 14 खरोखर
म्हणौनि , तो दैवागळा [15] । वानीत असो वेळोवेळा , । 15 थोर नशीबाचा
जें , साम्यसेजे डोळा । लागला , तया ।। 1079।।

**प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वशः ।**
**यः पश्यति तथाऽऽत्मानमकर्तारं स पश्यति ।। 29।।**
**सर्व कर्मे सर्व प्रकारे केवळ प्रकृतीकडूनच केली जातात, आणि आत्मा हा अकर्ता म्हणजे काहीएक न करणारा आहे, हे ज्याने जाणिले त्याने खरे तत्त्व ओळखिले म्हणावयाचे .**

आणि मनोबुद्धिप्रमुखे । कर्मेंद्रिये अशेखे ।
करी प्रकृतीचि , हे देखे , । साच जो गा , ।।1080।।
घरीची राहटती घरी , । घर काही न करी , ।
अभ्र धांवे अंबरी , । अंबर ते उगे ।।1081।।
तैसी , प्रकृती आत्मप्रभा [1] । खेळे , गुणी विविधारंभा । — 1 आत्म्याच्या तेजाने
येथ आत्मा तो वोथंबा [2] । नेणे कोण ! ।।1082।। — 2 आश्रयाचा खांब
ऐसेनि येणे निवाडे , । जयाच्या जीवी उजिवडे [3] । — 3 प्रकाश पडला
'' अकर्तयाते '' फुडे [4] । देखिले तेणे ।। 1083।। — 4 खरोखर

**यदा भूतपृथग्भावमेकस्थमनुपश्यति ।**
**तत एव च विस्तारं ब्रह्म संपद्यते तदा ।। 30।।**
**जेव्हा सर्व भूतातील पृथक्त्व म्हणजे नानात्त्व एकत्वात दिसू लागेल , आणि या एकत्वापासूनच सर्व विस्तार झाला आहे असे दिसू लागेल तेव्हां ब्रह्म प्राप्त होते .**

एऱ्हवी , तैचि अर्जुना ! । होईजे ब्रह्मसंपन्ना , ।
जै , या भूताकृती भिन्ना , । दिसती एकी ।। 1084।।
लहरी जैसिया जळी , । परमाणुकणिका स्थळी , ।
रश्मीकरमंडळी । सूर्याच्या जेवीं , ।। 1085।।
नातरी , देही अवेव , । मनी आघवेचि भाव , ।
विस्फुलिंग , सावेव । वन्ही एकी , ।। 1086।।
तैसें , भूताकार एकाचे , । हे दिठी रिगे जै साचें , ।
तैचि ब्रह्मसंपत्तीचे । तारूं लागे ।। 1087 ।।
मग जया तयाकडे । ब्रह्मेचि दिठी उघडे ।
किंबहुना , जोडे । अपार सुख ।। 1088।।
येतुलेनि तुज पार्था ! । प्रकृतिपुरुषव्यवस्था ।
ठाये ठावो [5] प्रतीतिपथा-।माजी [6] जाहली ।। 1089।। — 5 व्यवस्थित पणे
अमृत जैसे ये चुळा , । कां , निधान देखिजे डोळा , । — 6 अनुभवाला आली
तेतुला जिव्हाळा [7] । मानावा हा ।। 1090।। — 7 लाभ
जी जाहलिये प्रतीती [8] ,। घर बांधणे [9] जे चित्ती । — 8 अनुभव 9 भरवसा ठेवणे
ते आतां ना , सुभद्रापती ! । '' इयावरी '' ।। 1091।।
तरी एक दोन्ही ते बोल , । बोलिजती सखोल , ।
देई मनाते वोल [10] । मग ते घेई ।। 1092।। — 10 तारण

ऐसे देवे म्हणितले , । मग बोलो आदरिले [1] । 1 आरंभ केला
तेथे , अवधानाचेचि केले । सर्वांग , येरे ।। 1093।।

**अनादित्वान्निर्गुणत्वात्परमात्माऽयमव्यय ः ।**
**शरीरस्थोऽपि कौन्तेय न करोति न लिप्यते ।। 31।।**

**अनादि व निर्गुण असल्यामुळे हा अव्यय परमात्मा शरीरांत राहूनहि हे कौंतेया ! काही करीत नाही व त्याला कोणत्याहि कर्माचा लेप म्हणजे बंध लागत नाही ,**

तरी परमात्मा म्हणिपे , । तो ऐसा जाण स्वरुपे , ।
जळी जळे न लिंपे , । सुर्यु , जैसा ।। 1094।।
कां , जे जळा आदी , पाठी , । तो असतुचि असे किरीटी ! ।
माजी बिंबे , ते दृष्टी । आणिकांचिये ।। 1095।।
तैसा , आत्मा देही । आथी म्हणिपे , हे कांही ।
साचे तरी नाही , । तो जेथिचा तेथे ।। 1096।।
आरिसां , मुख जैसे ,। " बिंबलिया " नाम असे , ।
देही वसणे तैसे । आत्मतत्त्वा ।। 1097।।
तया , देहा म्हणती भेटी । हे सपायी [2] निर्जीव गोठी [3] । 2 सर्वथा 3 खोट्या गोष्टी
वारिया वाळुवे गांठी । केही आहे ? ।। 1098।।
आगी आणि कापुसा । दोरा, सुवावा कैसा ? ।
केउता सांदा [4] आकाशा , । पाषाणेसी ? ।।+ 1099।। 4 जोड
एक [5] निघे पूर्वेकडे , । एक ते पश्चिमेकडे , । 5 एकजण
तिये भेटीचेनि पाडे [6] । संबंधु हा ! ।। 1100।। 6 प्रकार
उजियेडा आणि अंधारेया , । जो पाडु , मृता उभेया [7] , । 7 जीवंत असलेला
तोचि गा ! आत्मया , । देहा जाण ।। 1101।।
रात्री आणि दिवसा , । कनका आणि कापुसा , ।
अपाडु कां जैसा , । तैसाचि यासी ।। 1102।।
देह तंव पांचांचे जाले , । हे कर्माचे गुणी गुंथले ।
भंवतसे [8] चाकी सूदले [9] । जन्ममृत्युच्या ।। 1103।। 8 फिरत असते 9 घातले आहे
हे काळानळाच्या तोंडी । घातली लोणियाची उंडी ।
माशी पांखु पाखडी[10] , । तंव हे सरे ।। 1104।। 10 माशीच्या पंखाची हालचाल जेवढ्या वेळात होते
हे विपाये आगीत पडे , । तरी भस्म होऊनि उडे ।
जाहले श्वाना वरपडे [11] । तरी ते विष्टा ।। 1105।। 11 योग्यतेचे
या चुके दोही काजा , । तरी होय कृमीचा पुंजा ।
हा परिणामु कपिध्वजा ! । कश्मलु [12] , गा ! ।। 1106।। 12 घाण

या देहाची हे दशा , । आणि आत्मा तो एथ ऐसा , ।
पै , नित्य , सिद्ध आपैसा ,। अनादिपणे ।। 1107।।
सकळु ना निष्कळु [1] , । अक्रियु ना क्रियाशीळु , । 1 कलातीत
कृश ना स्थुळु , ।निर्गुणपणे ।। 1108।।
आभासु ना निराभासु , । प्रकाशु ना अप्रकाशु , ।
अल्प ना बहुवसु , । अरुपपणे ।। 1109।।
रिता ना भरितु , । रहितु ना सहितु , ।
मूर्तु ना अमूर्तु । शून्यपणे ।। 1110।।
आनंदु ना निरानंदु , । एक ना विविधु , ।
मुक्त ना बद्धु , । आत्मपणे ।। 1111।।
येतुला ना तेतुला , । आइता न रचिला , ।
बोलता ना उगला [2] ,। अलक्षपणे [3] ।। 1112।। 2 मुका 3लक्षात न येण्या-
सृष्टीचा होणा [4] न रचे , । सर्वसंहारे न वेचे , । जोगी स्थिती 4 होण्यात
आथी नाथी या दोहीचे । पंचत्व तो ।। 1113।।
मवे ना चर्चे , । वाढे ना खांचे , ।
विटे ना वेचे , । अव्ययपणे ।। 1114।।
एवं , रुप पै आत्मा । देही , जे म्हणती प्रियोत्तमा ।
ते मठाकारे व्योमा । नाम , जैसे ।। 1115।।
तैसें , तयाचिये अनुस्यूती [5] । होती जाती देहाकृती । 5 अखंड स्थिती
तो घे ना सांडी , सुमती ! , । जैसा , तैसा ।।1116।।
अहोरात्रे जैशी । येती जाती आकाशी , ।
आत्मसत्ते तैसी , । देहे , जाण ।। 1117।।
म्हणौनि , इये शरीरी । कांही करवी ना करी , ।
आयताही , व्यापारी [6] । सज्ज न होय ।। 1118।। 6 आपोआप तयार असलेले कर्म
यालागी , स्वरुपे । उणा पुरा न घेपे , ।
हे असो ; तो न लिंपे । देही , देहा ।। 1119।।

**यथा सर्वगतं सौक्ष्म्यादाकाशं नोपलिप्यते ।**
**सर्वत्रवस्थितो देहे तथाऽऽत्मा नोपलिप्यते ।। 32।।**
**ज्याप्रमाणे आकाश चोहोकडे भरले असून सुक्ष्म असल्याने त्याला कशाचाहि लेप लागत नाही, त्याप्रमाणे आत्मा देहात सर्वत्र रहात असून त्याला कशाचाहि लेप लागत नाही .**

अगा ! आकाश के नाही ?। हे न रिघेचि कवणे ठायी ?।
परी कायिसेनि कही । गादिजेना [7] ! ।। 1120।। 7 लिप्त होणे

तैसा , सर्वत्र सर्व देही , । आत्मा असतुचि असे पाही , ।
परी , संगदोषे एकेही । लिप्त नोहे ।। 1121।।
पुढतपुढती एथे , । हेचि लक्षण निरुते , ।
जें , जाणावे क्षेत्रज्ञाते । क्षेत्रविहिना ।। 1122।।
संसर्गे चेष्टिजे लोहे , । परी , लोह भ्रामकु नोहे , ।
क्षेत्रक्षेत्रज्ञां आहे , । तेतुला पाडु ।। 1123।।
दीपकाची अर्चीं [1] , । रहाटी वाहे घरीची , । 1 ज्योत
परी , वेगळीक कोडीची ।दीपा आणि घरा ।। 1124।।
पै , काष्ठाच्या पोटी । वन्हि असे किरीटी ! , ।
परी , काष्ठ नोहे या दृष्टी । पाहिजे हा ।। 1125।।
अपाडु नभा , आभाळा , । रवि आणि मृगजळा , ।
तैसाचि , हाही डोळा । देखसी जरी ।। 1126।।

**यथा प्रकाशयत्येक ः कृत्स्नं लोकमिमं रविः ।**
**क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत ।। 33।।**
**ज्याप्रमाणे एकटा सूर्य हे सर्व जग प्रकाशित करितो, त्याप्रमाणे हे भारता ! क्षेत्रज्ञ सर्व क्षेत्राला म्हणजे शरीराला प्रकाशित करीत असतो .**

हे आघवेचि असो ; एकु । गगनौनि जैसा अर्कु , ।
प्रगटवी लोकु ।नांवे नांवे [2] ।। 1127।। 2 वेळोवेळी
एथ क्षेत्रज्ञु तो ऐसा । प्रकाशकु , क्षेत्राभासा ।
यावरुते , हे ,न पुसा , । शंका नेघा ।।1128।।

**क्षेत्रक्षेत्रज्ञयोरेवमन्तरं ज्ञानचक्षुषा ।**
**भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुर्यान्ति ते परम् ।। 34।।**
**याप्रमाणे ज्ञानचक्षूने म्हणजे ज्ञानरुप डोळ्याने , क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांमधील भेद आणि सर्व भूतांच्या मूलभूत प्रकृतीचा मोक्ष ज्यांनी जाणिला ते परब्रह्मप्रत जातात ।**

शब्दतत्त्वसारज्ञा ! । पै , देखणे तेचि प्रज्ञा , ।
जे , क्षेत्र , क्षेत्रज्ञा । अपाडु देखे ।। 1129।।
इया दोहीचें अंतर । देखावया , चतुर ,।
ज्ञानियांचे द्वार । आराधिती ।। 1130।।
याचिलागी सुमती ! । जोडिती शांतिसंपत्ती ।
शास्त्रांची दुभती । पोसिती घरी ।। 1131।।

योगाचिया आकाशा । वळघिजे , येवढाचि धिवसा [1] ।
याचियाचि आशा । पुरुषासि गा ! ।। 1132।।
शरीरादि समस्त , । मानितातिं तृणवत ,।
जीवे , संतांचे होत , । वाहणधरु [2]।। 1133।।
ऐसैसियापरी, । ज्ञानाचिया भरोवरी [3] ।
करुनिया , अंतरी । निरुते [4] होती ।।
मग , क्षेत्रक्षेत्रज्ञांचे । जे अंतर देखती साचे ।
ज्ञाने उन्मेख [5] , तयांचे । ओवाळु [6] आम्ही ।। 1135।।
आणि महाभूतादिकी , । प्रभेदली अनेकी ।
पसरलीसे , लटिकी । प्रकृती जे हे , ।।1136।।
जे ,शुकनळिकान्याये[7] , । न लगती , लागली आहे , ।
हें , जैसे तैसें होये , । ठाउवे जया , ।।1137।।
जैसी , माळा ते माळा , ।ऐसीचि देखिजे डोळा , ।
सर्पबुद्धि टवाळा [8] , । उखी [9] होउनि ।। 1138।।
कां , शुक्ति ते शुक्ति , । हे साच होय प्रतीती , ।
रुपेयाची भ्रांती , । जाऊनिया ।। 1139।।
तैसी , वेगळी वेगळेपणे । प्रकृती , जे अंतःकरणे ।
देखती , ते मी म्हणे । ' ब्रह्म होती '' ।। 1140।।
जे आकाशाहूनि वाड , । जे अव्यक्ताची पैल कड , ।
जे भेटलिया,अपाडा पाड[10] । पडो [11] नेदी ।। 1141।।
अकारु जेथ सरे , । जीवत्व जेथ विरे , ।
द्वैत जेथ नुरे , । अद्वय जे ।। 1142।।
ते परम तत्त्व , पार्था ! । होती ते सर्वथा , ।
जे , आत्मानात्मव्यवस्था । राजहंसु ।।1143।।
ऐसा , हा जी आघवा , । श्रीकृष्णे , तया पांडवा ।
उगाणा [12] दिधला , जीवा । जीवाचिया ! ।। 1144।।
येर कलशीचे , येरी । रिचविजे जयापरी , ।
आपणपे तया श्रीहरी । दिधले तैसे ।। 1145।।
आणि, कोणा देता कोण ! । तो नर तैसा नारायण , ।
वरी , अर्जुनाते श्रीकृष्ण ।'' हा मी '' म्हणे ।। 1146।।
परी असो ते नाथिले ; । न पुसतां कां मी बोले ? ।
किंबहुना , दिधले । सर्वस्व देवे ।। 1147।।
कीं , तो पार्थु जी ! मनी । अझुनी तृप्ती न मनी [13] , ।
अधिकाधिक उतान्ही [14] । वाढवीतु असे ।। 1148।।

1 धेर्य
2 चरणसेवा करावयाला
3 प्रयत्न करून
4 निश्चिंत
5 बुद्धिचा प्रकटपणा
6 लोण उतरवु
7 पोपट नळीला जखडलेला नसता जखडलेला मानतो हा न्याय
8 मिथ्या बुद्धि
9 सत्य ज्ञान
10 भेदभाव 11 उरत नाही
12 बोध
13 तृप्त होत नाही
14 इच्छा

स्नेहाचिया भरोवरी [1] । आंबुथिला [2] , दीपु घे थोरी , ।
चाड अर्जुना अंतरी , । परिसतां तैसी ।। 1149।।
तेथ सुगरिणी आणि उदारे , । रसज्ञ आणि जेवणारे ।
मिळती , मग अवतरे । हातु [3] जैसा , ।।1150।।
तैसे जी होतसे देवा , । तया , अवधानाचिया लवलवा [4] ।
पाहतां , व्याख्यान चढले थांवा । चौगुणे ।। 1151।।
सुवाये [5] मेघु सांवरे [6] , । जैसा चंद्रे सिंधु भरे , ।
तैसा मातला रसु , आदरे [7] । श्रोतयांचेनि ।। 1152।।
आतां , आनंदमय आघवे ।विश्व कीजेल देवे , ।
ते राये '' परिसावे '' । संजयो म्हणे ।। 1153।।
एवं , जे महाभारती । श्रीव्यासे आप्रांतमती [8]।
भीष्मपर्वसंगती । म्हणितली कथा ।।।1154।।
तो श्रीकृष्णर्जुनसंवादु । नागरी बोली [9] विशदु ।
सांगोनि , दाऊं प्रबंधु । वोवियेचा ।। 1155।।
नुसधीचि शांतिकथा । आणिजेल कीर वाक्पथा , ।
जे शृंगाराच्या माथां । पाय ठेवी ।। 1156।।
दाऊ वेल्हाळे देशी नवी [10] । जे साहित्याते वोजावी [11] ।
अमृताते चुकी ठेवी [12] । गोडिसेपणे ।। 1157।।
बोल ओल्हावतेनि गुणे [13] । चंद्रासि घे उमाणे [14] ।
रसरंगी भुलवणे । नादु लोपी ।। 1158।।
खेचरांचियाही [15] मना । आणीन सात्त्विकाचा पान्हा ।
श्रवणासवे सुमना । समाधी जोडे ।। 1159।।
तैसा , वाग्विलास विस्तारु । गीतार्थेसी विश्व भरुं ।
आनंदाचे आवारूं । मांडू जगा ।। 1160।।
फिटो विवेकाची वाणी[16] । हो कानामनाची जिणी ।
देखो आवडे तो खाणी । ब्रह्मविद्येची ।। 1161।।
दिसो परतत्त्व डोळां । पाहो सुखाचा सोहळा ।
रिघो महाबोध सुकाळा-। माजी विश्व ।। 1162।।
हे निफजेल आतां आघवे । ऐसे बोलिजेल बरवे ।
जे अधिष्ठिला [17] असे परमदेवे । श्रीनिवृत्ती मी ।। 1163।।
म्हणौनि,अक्षरी सुभेदी [18] , । उपमा श्लोक कोंदाकोंदी [19] ।
झाडा देईन प्रतिपदीं । ग्रंथार्थासी ।। 1164।।
हा ठावोवरी [20] माते । पुरतया सारस्वते [21] ।
केले असे , श्रीमंते । श्रीगुरुराये ।। 1165।।

1 तेल वगैरे सामुग्रीने 2 उजाळतो
3 जेवण्याची इच्छा वाढते
4 लक्षपूर्वक ऐकण्याची उत्सुकता
5 अनुकुल वारा 6 जमतात
7 प्रतिसादाने
8 अमर्याद बुद्धिच्या
9 उत्तम प्रकारे
10 मराठीच भाषा अशा नवीन प्रकारे11 सजवीन 12मागे सारते13 शांत करण्याचा गुण
14 बरोबरी करतो
15 पिशाच्च
16 विवेकाचा बोलबोला होओ
17 अंगीकारला आहे
18 मर्म स्पष्ट करणारी
19 दाटी
20 या योग्यतेपर्यंत
21 विद्या

तेणे जी कृपासावाये [1] । मी बोले तेतुले सामाये [2] ।
आणि , मी ' तुमचिये सभे लाहे । गीता [3] ' , म्हणो ।। 1166।।
वरी तुम्हां संतांचे पाये । आजि मी लाधलो आहे ।
म्हणौनि , जी नोहे । अटकु [4] कांही ।। 1167।।
प्रभु ! काश्मिरी [5] मुके । नुपजे , हे काय कौतुके [6]।
नाही उणी , सामुद्रिके [7] । लक्ष्मीयेसी ।। 1168।।
तैसी , तुम्हां संतांपासी । अज्ञानाची गोठी कायसी ? ।
यालागी नवरसी । वरुषेन मी ।। 1169।।
किंबहुना , आतां देवा ! । अवसरु मज देयावा ।
ज्ञानदेव म्हणे , '' बरवा । सांगेन ग्रंथु '' ।। 1170।।

1 कृपेच्या बळावर 2 उचित
3 तुमच्या उपस्थितीमुळे
गीता पावलो
4 अडथळा
5 सरस्वतीच्या पोटी 6 चुकुन सुद्धा
सुद्धा 7 ज्योतीषीय सुलक्षणे

**इति श्रीमद्भवद्‌गीतासु उपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे क्षेत्रक्षेत्रज्ञयोगो नाम त्रयोदशोऽ ध्यायः ।।13।।**

## कठीण ओव्यांचा अर्थ

1. ज्या आत्मरुप श्रीगणेशाचे स्मरण केले असता तो अखिल विद्यांचे आश्रयस्थान होतो, त्या श्रीगुरुच्या चरणांस वंदन करू .
2. श्रीगुरुचे स्मरण केले असता कवीस सर्व शब्दसृष्टीच स्वाधीन होते आणि सर्व वाङमयशास्त्र त्याच्या जिव्हेस प्राप्त होतात .
3. त्याच्या वक्तृत्वास इतके माधुर्य येते की, ते आपल्या गोडीने अमृताच्या गोडीसही पलीकडे सर म्हणते. शांत, अद्भुत इत्यादी नवरस त्याच्या मुखातून निघणाऱ्या प्रत्येक अक्षराचे आज्ञाधारक सेवक होतात.
4. त्याच्या स्मरणाने गर्भितार्थरुप अभिप्राय वा रससंपत्तीस अभिव्यक्त करणारे भाव प्रकट होतात. तात्त्विक सिद्धांताचे प्रकार अभिव्यक्त करणारी मार्मिक खूण हस्तगत होते .
5. जेव्हा आपल्या अंतःकरणात श्रीगुरुचे चरण वास्तव्य करतात तेव्हा स्मरण होऊन ज्ञानरुपी भाग्योदय होऊन त्यास एवढे मोठे भव्य स्वरुप प्राप्त होते .
6. ज्याच्या चरणस्मरणाने असे सर्व लाभ होतात, त्या श्रीगुरुंच्या श्रीचरणाला वंदन करून मी हे घर्म कीर्तन करतो. आता या अध्यायात ब्रह्मदेवाचा पिता व लक्ष्मीचा पती असणारा भगवान श्रीकृष्ण परमात्मा असे म्हणाला .

18. क्षेत्राचा धनी कोण, हे कोणालाही उलगडले नाही पण अहंकार इतका प्रबळ आहे की घरोघरी याच विषयाचा काथ्याकुट चालु आहे.

21. पाखांडीपणा करून कित्येकांनी वस्त्रत्याग करून डोक्यावरचे सर्व केस काढून टाकले आहेत तरी पण त्यांचे वितंडवाद त्यानांच धूळ चारतात

67. या क्षेत्राच्या स्वरूपाचा निर्धार करण्यासाठी अनुष्टुभादी छंदात निरनिराळे प्रबंध ईर्ष्येने अद्यापपावेतो केले जात आहेत.

68. तसेच मंत्रद्रष्टे पवित्र ऋषी, वेदातील बृहत्सामसूत्र वर्णन करतात. पण त्यानांही हे क्षेत्र कसे आहे ते कळत नाही.

133 संकल्पविकल्पांच्या संगतीत सुख केव्हाही नसते ; पण संकल्पविकल्प नाहीसे झाले, कीं, ते सुख स्वयंसिद्धच आहे. तेव्हा, संकल्पविकल्प असणे आणि नसणे या दोनच कारणांमुळेच दुःख आणि सुख ही अनुक्रमे संभवतात.

320 कोणी जवाहीऱ्यांच्या गावात गेला तर त्याने कसवटीचा दगडच काढणे योग्य तेथे स्फटिक मण्यांची टिमकी वाजवण्यात काय अर्थ?

332. आणि जर का तुम्ही आपल्या ज्ञानसर्वस्वाला लोभीपणाने माझ्यापासून चोरून ठेवाल आणि या गीतेला अशीच माझ्या गहाणांत डांबून कुचंबत राहूं द्याल , तर या गीतेचा आणि माझा एकच परीणाम होईल !.

342. तशीच , अर्जुना, त्या पुरुषाच्याठायी क्षमा भराला येते; ही ' क्षमा' ओळखण्याची लक्षणे आतां तुला स्पष्टपणे सांगतो, ती ऐक.

355 कोणत्याही प्राण्यासंबंधी प्राणतत्त्व जसे एकाच प्रकारचे भलेपण दाखवते तसेच आर्जव हेही भेदभावरहित वर्तन ठेवते.

437 मी जीवन्त असलो कीं मेलो असलो, तरी हें गुरुसेवेचे व्रत कधीही सोडणार नाही. अशा सेवेच्या कल्पान्तकोटी झाल्या, एक क्षणभरसुद्धा ही सेवा दुसऱ्या कोणास करु देणार नाही.

506 ज्याप्रमाणे एखादा दांडगा नवरा आपल्या स्वैरपणे घराबाहेर धीटपणे जाणाऱ्या बायकोस बंदोबस्तात ठेवतो, त्याप्रमाणे ' आत्मनिनिग्रह ' करणारा ज्ञानी पुरुष आपल्या अंतःकरण वृत्तीला विषयाकडे जाऊ न देता त्यावर नित्य पहारा ठेवून दक्ष राहतो

509. मूलाधार, मणिपूर, आणि विशुद्ध या तीन चक्रांत वज्र, ओढियाण आणि जालंधर या तीन बंधाची गस्त ठेवून जो आपले चित्त इडा व पिंगला या दोन नाड्यांच्या संधीवर प्रविष्ट करतो.

510. समाधीच्या शय्येवर ध्यानाला जखडून निजवतो, आणि ज्याचे चित्त चैतन्याशी एकरुप होऊन रममाण होते

557. म्हातारपण आल्यावर हातपायांच्या हालचाली थंड पडतात. जसे कमनशिबी माणसाचा धंदा बसतो किंवा चांगला मंत्री नसल्यावर राजाचे बळ कमकुवत असते त्याप्रमाणे वृद्धाच्या अंगातील बळ-शक्ती क्षीण होते

585 तसे म्हातरपण येईल व जन्माला आलेपणा व्यर्थ जाईल; कारण शंभर वर्षे आयुष्य आहे (तेव्हा भर ज्वानीत मजा करु व पुढे परमार्थ करु असें म्हणणारा ) तो तरी शतायु आहे (कीं नाही) हें कोणास ठाऊक ?

603 ज्याप्रमाणे ' आकाश हे सर्व व्याप्त असताही कोणत्याच पदार्थाचा लेप त्यास लागत नाही त्याप्रमाणे नित्य समचित्त असणाऱ्या ज्ञानी पुरुषाचे ठायी सुखदुःख , इष्टानिष्ट इत्यादीबद्दल समदृष्टी असते म्हणून त्याचे ठायी उघड ज्ञान असते

659 मांग लोक जशी मोळाच्या दोरीला पिंपळाची पाने बांधून तिचे तोरण वेशीवर टांगतात तसा तो आपल्या दानादिक पुण्यकर्माचे तोरण भरघोस शब्दांनी सजवून उभारतो. जो जाणून बूजून देवळांतल्या खराट्याच्या दांड्यासारखा ताठ उभा असतो.

785. त्याप्रमाणे त्याचा जीव, मन व प्राण ही घराच्या गुंत्यातून बाहेर पडूंच शकत नाहीत. जसा साप माळजमीनीत धरणे धरून बसतो तसा जो घरात डांबून राहतो.

947. कड्याला जशी पायरी करावी, किंवा उंच होण्यासाठी जसा माचा बांधावा, अथवा पूर आला असता जशी तरण्यासाठी होडी लोटावी त्यातलाच हा प्रकार आहे .

1099 कापसाच्या दोऱ्याने आगीला कसे शीवावे. आकाशाला दगडाने कसे सांधावे?